## ताजमहल बॉम्बने उडविण्याची धमकी

**नवी दिल्ली :** आग्रा येथील ताजमहाल बॉम्बने उडवून देऊ, असा धमकीचा ई-मेल मिळाल्याने खळबळ उडाली आहे. बॉम्ब निकामी पथक ताजमहल परिसरात दाखल झाले असून, येथील सुरक्षा व्यवस्थेतही वाढ करण्यात आली आहे. पर्यटन विभागाला ईमेल प्राप्त झाला. त्याआधारे ताजगंज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे, अशी माहिती ताजमहल सुरक्षा एसीपी सय्यद अरीब अहमद यांनी सांगितले. ताज महलच्या सुरक्षा व्यवस्था आणखी मजबूत कडकोट करण्यात आली आहे.

# कृषीवल

रायगड, बुधवार, दि. ४ डिसेंबर २०२४

किंमत ४ ₹

**HIRING ALERT**
Looking For South Indian Cook
(Preffered Male Candidate)
Hotel : Outpost
Job Location : Alibaug
Salary As Per Industry Standards,
Age :- Below 40,
Relevant Experience : 4 to 6 years.
Interested candidates may connect immediately on 8010151284 / 7798467555 & email your latest resume on Sujit.patil@outpostalibaug.com& Pradeep.bhardwaj@Outpostalibaug.com and update your expected salary.

**आजचा अग्रलेख**
**अधिक मुले 'पिकवा'**

**वे|ध|क**

### खातेवाटपात जोरदार ताणाताणी

**मुंबई :** मुख्यमंत्री भाजपचाच होणार हे निश्चित आहे. शिवसेनेच्या वाट्याला उपमुख्यमंत्रीपद जाणार आहे. मागील सरकारमध्ये भाजपनं अनेक महत्त्वाची खाती आपल्याकडे ठेवली होती. त्या खात्यांसाठी आता शिवसेना आक्रमक झाली आहे. त्यामुळे खातेवाटपाचा तिढा कायम आहे. २०२२ मध्ये राज्यात शिवसेना, भाजपचं सरकार आलं. ४० आमदार असलेल्या शिवसेनेला भाजपनं मुख्यमंत्रीपद दिलं. त्याबदल्यात बरीचशी महत्त्वाची खाती भाजपनं स्वत:कडे ठेवली. अर्थ, गृह, महसूल, सार्वजनिक बांधकाम विभाग भाजपच्या मंत्र्यांकडे होते. आता याच चार खात्यांसाठी शिवसेना आग्रही आहे. मात्र, भाजपा ती खाती देण्यास तयार नाही.

### रेल्वेच्या धडकेत इसम ठार

**माणगाव :** माणगाव येथे तेजस एक्स्प्रेस रेल्वेची धडक लागून अनोळखी इसमाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सविस्तर वृत्त असे की, दि. ३ डिसेंबर रोजी सकाळी ९ वा. च्या सुमारास कोकण रेल्वे मार्गावरील स्टोन क्र. ३१/१ ते ३१/२ मध्ये डाऊन मार्गावर रेल्वे रुळावरती प्लास्टिक बाटल्या उचलत असताना तेजस एक्स्प्रेस ट्रेन क्र. २२११९ ची अनोळखी इसमास ठोकर लागली. या अपघातात मयताच्या डोक्यास तसेच दोन्ही हातापायाला, शरीराला गंभीर दुखापत होऊन शरीराचे तुकडे झाले. या अपघाताची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली असून, पुढील तपास पो.नि. निवृत्ती बोऱ्हाडे करीत आहेत.

## निवडणूक विभागाकडून वापर, लाखो रुपयांचे भाडे थकीत

# क्रीडा संकुलात प्रशासनाचा 'खेळ'

**प्रमोद जाधव**
**। अलिबाग ।**

लोकसभेनंतर विधानसभा निवडणुकीत मतमोजणी व स्ट्राँग रुम म्हणून जिल्हा क्रीडा संकुलाचा वापर करण्यात आला. मतमोजणी होऊन अनेक दिवस उलटून गेले; परंतु आजही या संकुलाच्या परिसरात जेवणाची पाकिटे, पाण्याच्या बाटल्या, खोके, फलक आदी अस्ताव्यस्त पडून आहेत. 'गरज सरो आणि वैद्य मरो' अशी अवस्था या संकुलाची झाली आहे. त्यामुळे हे संकुल उपेक्षित असल्याचे चित्र दिसून येत आहे. निवडणूक विभागाच्या या भूमिकेबाबत क्रीडाप्रेमींकडून नाराजीचे सूर उमटत आहेत.

**खेळाडू वंचित; नाराजी व्यक्त**

### पाच कोटींची गरज

जिल्हा क्रीडा संकुलाला अद्ययावत मल्टीपर्पज हॉलची गरज आहे. या हॉलमध्ये कबड्डी, खो-खोसारखे खेळ मॅटवर खेळविता येणार आहेत. प्रेक्षक गॅलरी, कार्यालयाला असलेली गळती, अशा अनेक दुरुस्तीच्या कामासह नूतनीकरणकरणेदेखील आवश्यक आहे. त्यासाठी पाच कोटींहून अधिक रुपयांची गरज आहे, अशी माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडे त्याचा प्रस्ताव पाठविण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

### जिल्हा क्रीडा संकुलाचे वीज बिल थकीत

जिल्ह्यातील खेळाडूंना हक्काचे व्यासपीठ मिळावे, यासाठी नेहुली या ठिकाणी जिल्हा क्रीडा संकुल बांधण्यात आले. मात्र, या क्रीडा संकुलाचे वीज बिल गेल्या दोन महिन्यांपासून थकीत असल्याचे समजते. सुमारे दोन लाख रुपयांचे बिल थकले आहे. निवडणुकीत केलेल्या वापरामुळे वीज बिल अधिक आल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे बिल कोण भरणार, याकडे लक्ष लागून राहिले आहे.






● (छायाचित्र : समीर मालोदे)

> कोरोना काळात कोव्हीड सेंटर म्हणून जिल्हा क्रीडा संकुलाचा वापर केला होता. आरोग्य विभागाकडे पुरेसा निधी नसल्याने जिल्हा नियोजनमधून निधी उपलब्ध करण्याची मागणी करण्यात आली आहे.
> – डॉ. मनीषा विखे, जिल्हा आरोग्य अधिकारी

> निवडणुकीच्या कामानंतर जिल्हा क्रीडा संकुल परिसरात काही कचरा पडलेला असेल, तर त्याची पाहणी करण्यासाठी तहसीलदार यांना पाठविले जाणार आहे. त्यानंतर पुढील कार्यवाही केली जाईल.
> – मुकेश चव्हाण, उपविभागीय अधिकारी, अलिबाग

अलिबाग हे जिल्ह्याचे ठिकाण आहे. जिल्ह्याच्या ठिकाणी क्रीडा संकुल उभारण्याच्या हालचाली गेल्या पंधरा वर्षांपूर्वी सुरु झाल्या. अलिबाग तालुक्यातील नेहुली येथे हे संकुल उभारण्यात आले. दोन टप्प्यात संकुलाचे काम करण्यात आले. पहिल्या टप्प्यात हॉस्टेल, सभागृह तसेच दुसऱ्या टप्प्यात स्वीमिंग पूल, कार्यालय, ट्रॅक बांधण्यात आले. त्यासाठी सुमारे आठ कोटी रुपयांचा निधी खर्च झाला. क्रीडा संकुलामुळे खेळाडूंना हक्काचे •› पान ५ वर

## मानकुळेतील पाणीप्रश्न पेटला

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**



जलजीवन योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील पाण्याचा प्रश्न मार्गी लागणार अशा बाता जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभाग कायम मारत आला आहे. मात्र, आजही मानकुळेतील हजारो नागरिकांसह महिलांना पाण्यासाठी पायपीट करावी लागत आहे. या गावांमधील पाणीप्रश्न पेटला असून, महिलांसह ग्रामस्थांनी आक्रमक होत मंगळवारी (दि.३) अलिबागमधील जिल्हाधिकारी कार्यालयावर पाण्यासाठी हंडा मोर्चा काढला.

- **महिलांसह ग्रामस्थ आक्रमक**
- **जिल्हाधिकारी कार्यालयावर हंडा मोर्चा**

अलिबाग तालुक्यातील मानकुळे, बहिरीचापाडा, नारंगीचा टेप, बंगला बंदर, गणेशपट्टी ही गावे खाडी किनारी असून, येथील असंख्य नागरिक मोलमजुरी करून त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवित आहेत. सुमारे साडेतीन हजार लोकवस्ती असलेल्या या गावांमधील नागरिकांना एमआयडीसीद्वारे पाणी देण्यासाठी तीन टाक्या बांधण्यात आल्या आहेत. तसेच गेल्या काही महिन्यांपासून लाखो रुपये किमतीचे जलजीवन योजनेचे काम सुरु केले आहे. पाईप टाकण्यात आले आहे. परंतु, अजूनपर्यंत पाण्याचा थेंबही या गावांतील नागरिकांना मिळालेला नाही. या भागात एमआयडीसीच्या आठ लाईन आहेत. मात्र, पाण्याचा थांगपत्ताच नसल्याचे सांगण्यात आले आहे. एमआयडीसीचे पाणी वेळेवर येत नाही. त्यामुळे रात्री आठ वाजल्यापासून एक वाजेपर्यंत पाण्यासाठी वाट पाहावी लागते. एक हंडा मिळविण्यासाठी एक तास प्रतीक्षा करावी लागत असल्याची खंत महिलांनी व्यक्त केली आहे. •› पान ५ वर

## राज्यात गुटखाबंदी केवळ कागदावर

**पनवेल, उरणमध्ये खुलेआम विक्री**

**। पनवेल। विशेष प्रतिनिधी ।**

महाराष्ट्रात खरोखर गुटखा विक्रीवर बंदी आहे का, असा प्रश्न पनवेल, उरण तालुक्यात खुलेआम सुरु असलेल्या गुटखा विक्रीमुळे विचारला जात आहे. पनवेल आणि उरण तालुक्यात शहरासोबतच ग्रामीण भागातल्या दुकानांमध्येही सर्रासपणे गुटखा विक्री केली जात असूनही त्याविरोधात अन्न व औषधे प्रशासनाकडून कठोर कारवाई केली जात नसल्याने नागरिकांकडून संताप व्यक्त केला जात आहे.

### अन्न व औषध प्रशासन हतबल

**अन्न व औषध प्रशासनाकडून गुटखा विक्रेत्यांवर वेळोवेळी कारवाई केली जाते. मात्र, या कारवाईपासून सामान्य विक्रेत्यांना गुटखा पुरवणारे मात्र लांबच आहेत. परजिल्ह्यातून गुटखा मागवून ते विक्रेत्यांना पुरवणारे कारवाईपासून बचावलेले आहेत. कारवाई फक्त सामान्य विक्रेत्यांवर केली जात असल्याने गुटखा वितरीत करणाऱ्यांना पकडण्याचे मोठे आव्हान अन्न व औषध प्रशासनावर आहे.**

महाराष्ट्रात जुलै २०१२ मध्ये गुटखाबंदी लागू करण्यात आली. शासनाच्या या निर्णयाचे सर्वत्र स्वागत करण्यात आले. गुटख्यामुळे अनेकांना तोंडाचा कर्करोग होऊन मृत्यू झाल्याच्या घटना घडल्या आहेत. लोकांनी गुटख्यापासून दूर राहावे यासाठी शासनाकडून जनजागृती केली जात आहे. •› पान ५ वर

### चारही आरोपींना पोलीस कोठडी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग समुद्रकिनारी झालेल्या हत्याकांड प्रकरणातील चारही आरोपींना पकडण्यास अलिबाग पोलिसांसह स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाला यश आले. या आरोपींना न्यायालयात हजर केले असता, त्यांना चार डिसेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. या गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक किशोर साळे करीत आहेत. गडबमधील तरुणावर चाकूने वार करून त्याची हत्या करण्यात आली होती. ही घटना ३० नोव्हेंबर रोजी रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास घडली होती.

## दारूच्या वाटपातून लोखंडी रॉडने हल्ला

**। महाड । प्रतिनिधी ।**

वाद कशावरून होईल हे काही सांगता येत नाही. असाच वाद महाड औद्योगिक क्षेत्रातील प्रिव्ही कंपनीच्या कंत्राटी कामगारांमध्ये झाला. दारू पिण्यास बसलेल्या तिघा तरुणांमध्ये दारूचे समान वाटप झाले नाही यावरून वाद झाला आणि या वादातून एकावर लोखंडी रॉडने हल्ला झाल्याने एक जण गंभीर जखमी झाला आहे. याबाबत महाड औद्योगिक पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महाड एमआयडीसीमधील प्रिव्ही कंपनीच्या आवारात वेल्डिंगचे काम करणाऱ्या कंत्राटी कामगारांमध्ये दि. २ डिसेंबर रोजी रात्री सात वाजण्याच्या सुमारास वाद झाला. जेवण करत असताना दारूचे समान वाटप झाले नाही यावरून मिथिलेश जवाहर सिंग याला राग आला. त्याने समोरील जेवण फेकून दिले. यातून मिथिलेश आणि प्रोसंजित या दोघांमध्ये वाद सुरू झाला. यातून मिथिलेशने शेजारी असलेल्या त्रिमूर्ती इंजिनिअरिंगमधून लोखंडी रॉड आणून मारहाण केली.



## धोकादायक इमारतीतून कारभार

**। पेण । मुस्कान खान ।**

पेण तालुका उपअभियंता ग्रामीण पाणीपुरवठा कार्यालयाची इमारत धोकादायक झाली असल्याने कर्मचाऱ्यांना जीव मुठीत घेऊन काम करावे लागत आहे. मात्र, संबंधित प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष झाले आहे. दरम्यान, एखादा मोठा अपघात झाल्यास यास जबाबदार कोण, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

शासनाच्या उदासीन धोरणामुळे आजही कित्येक सरकारी कार्यालये भाड्याच्या इमारतीमध्ये आहेत. त्यातीलच हे ग्रामीण पाणीपुरवठा कार्यालय आहे. या इमारतीच्या गॅलरीला पूर्णतः तडे गेले असून, ती केव्हाही पडण्याची शक्यता आहे. या कार्यालयात एक •› पान ५ वर

**जीव मुठीत घेऊन कर्मचारी करताहेत काम**

> सदरील इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट झाले आहे की नाही याबाबत मला कल्पना नाही. परंतु, इमारत मालकाला स्ट्रक्चरल ऑडिट करण्याच्या सूचना दिल्या आहेत.
> – आर.जे. पाचपोर, उपअभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा

### माणगावमध्ये जबरी घरफोड्या

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव तालुक्यात चोरांनी पुन्हा एकदा डोके वर काढले आहे. यामध्ये माणगाव शहरातील सुशिक्षित लोकांची सोसायटी समजल्या जाणाऱ्या माणगाव-पुणे म्हणजेच दिघी-पुणे हायवेवर असलेल्या अमित कॉम्प्लेक्स वसाहतीत चोरट्यांनी पुन्हा डोके वर काढत सुमारे पाच लाखांचा मुद्देमाल लंपास केल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या घटनेत माणगाव अमित कॉम्प्लेक्समधील सुमारे तीन फ्लॅट व एक बंगलो चोरट्यांनी फोडला आहे. त्यामध्ये प्रसार माध्यमांशी संवाद साधताना अमित कॉम्प्लेक्सच्या बी विंगमधील रहिवासी ज्योती शंकर यांच्या घरातील ३ •› पान ५ वर

## शेतकरी नको, व्यापारी बनुया

**मत्स्यव्यावसायिकांचा पेझारीत निर्धार**





**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

मत्स्यशेतीकडे वळलेल्या शेतकऱ्यांच्या पदरी घोर निराशा आली आहे. मत्स्यबीजाच्या वाढत्या किमती, रोगराईने मत्स्यव्यवसाय तोट्यात गेला आहे. यावर चिंतन विचारविनिमय व उपाय करण्यासाठी तलावधारकांची महत्त्वपूर्ण सभा म्हसोबा मंदिर, पेझारी ढोलपाडा येथे नुकतीच पार पडली. यावेळी मत्स्य व्यवसाय तोट्यात येण्यामागची कारणे शोधून उपाय यावर चर्चा करण्यात आली. केवळ शेतकरी नव्हे तर व्यापारी बनुया, असा एकमुखी निर्धार मत्स्य तलावधारकांनी केला.

या सभेत गेली १० ते १२ वर्षे तलावातील माशांचा दर २०० रुपये प्रतिकिलो होता, तो आता २४० रुपये प्रमाणे करण्याचे एकमताने ठरवण्यात आले आहे. दहा वर्षांपूर्वी कोंडा ६ ते ७ रुपये किलो दरात मिळत होता. आता कोंडा २५ ते ३० रुपये किलो •› पान ५ वर

## तरुणावर मद्यधुंद पर्यटकांचा हल्ला

**। म्हसळा । वार्ताहर ।**

रायगड जिल्ह्यात मद्यधुंद पर्यटकांची दादागिरी कमी होण्याचे नाव घेत नाही आहे. हरिहरेश्वर येथील घटना ताजी असतानाच सोमवारी रात्री भांडण सोडवण्यासाठी गेलेल्या तरुणावर मद्यधुंद पर्यटकांनी धारदार दगडाने हल्ला केल्याची गंभीर घटना घडली. या हल्ल्यात तरुण जखमी झाला आहे.

सलीम घंसार (४०) हा रात्री ९ च्या सुमारास माणगाव येथून म्हसळा येथे येत असताना घोनसे घाटात त्याला दोन वाहनांतील काही लोक ओव्हरटेक मारण्यावरून भांडण करत असल्याचे निदर्शनास आले. सलीम हे भांडण सोडवण्यासाठी गेला असता डस्टर या गाडीतील पाच मद्यधुंद पुणेकर पर्यटकांनी त्याला रस्त्यावर पाडून धारदार दगडाने मारहाण केली. या हल्ल्यात सलीम गंभीर जखमी झाल्याचे पाहून पर्यटकांनी तेथून माणगावच्या दिशेने पळ काढला. मात्र, माणगाव पोलिसांनी या पाच आरोपींना अटक केली. सलीमच्या चेहऱ्यावर गंभीर दुखापत झाल्याने त्याला म्हसळा येथून एमजीएम रुग्णालयात हलवण्यात आले. पकडण्यात आलेल्या आरोपींवर म्हसळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. •› पान ५ वर

- **दगडाने ठेचून केले गंभीर जखमी**

**सर्वाधिक मुहूर्त 'मे'मध्ये, तर सर्वात कमी 'जून'मध्ये**

# यंदा लग्नसराईची जोरात धामधूम

**। पनवेल । प्रतिनिधी ।**



तुळसी विवाह संपन्न झाल्यानंतर दरवर्षी ग्रामीण व शहरी भागात इच्छुकांच्या लग्नसराईची धामधूम सुरु होते. यंदा नोव्हेंबरपासून विवाह मुहूर्तास सुरुवात झाली असून, विवाहाचे जवळपास ६९ मुहूर्त असणार आहेत. यापैकी अनेक मुहूर्त हे डिसेंबर आणि मे या महिन्यात आहेत. वर्ष २०२३ मध्ये मे महिन्यात विवाहाचे तब्बल १५ मुहूर्त होते. त्यावेळी विवाहाची जोरदार धामधूम पहावयास मिळाली होती. यात यंदा ६९ मुहूर्त असल्याने यंदाही विवाहाची सर्वत्र जोरदार धामधूम पहावयास मिळणार एवढे मात्र निश्चित.

दिवाळी झाली की, तुळशी विवाहानंतर विवाह सोहळ्यास सुरुवात होत असते. नव्याने लग्नाच्या रेशीमगाठी जुळवण्यासाठी अनेकजण वधूवर सूचक मंडळात नोंदणी करत असतात. सर्वत्र लग्नाची लगबग सुरु असते. त्यानंतर लग्नाच्या वयात आलेल्या आपली मुलगी, मुलगा यांच्या विवाह सोहळ्यासाठी मुहूर्त पाहण्याचे काम आईवडिलांकडून जोरात सुरु होते. यंदाच्या वर्षी आणि जुळून आलेल्या रेशीमगाठी बांधण्यासाठी अर्थात लग्नासाठी तब्बल ६९ तारखा ग्रह नक्षत्रानुसार शुभ असल्याचे सांगण्यात येते. यातील सर्वाधिक मुहूर्त हे डिसेंबर आणि मे महिन्यात आहेत. तर, सर्वात कमी मुहूर्त हे जून महिन्यात आहेत.

हिंदू धर्मशास्त्रानुसार विवाह जुळविताना गुण आणि कुंडली पाहून विवाहाचा निर्णय घेण्याकडे आजही सर्वांचा कल असतो. तसेच मुहूर्त काढताना गुरु, शुक्र या ग्रहांचाही विचार केला जातो. लग्न सोहळा म्हटल्यावर वर आणि वधूसाठी आवश्यक खरेदीला वेग येण्यासह पूरक लहान-मोठ्या •› पान ५ वर

### असे असणार मुहूर्त

- डिसेंबर ३, ५, ६, ७, ११, १२, १४, १५, २०, २३, २४, २५.
- नववर्षात जानेवारी १६, १७, १९, २१, २२, २६.
- फेब्रुवारी ३, ४, ७, १३, १६, १७, २०, २१, २२, २३, २५.
- मार्च १, २, ३, ६, ७, १२, १५.
- एप्रिल १४, १८, १९, २०, २१, २२, २५, ३०.
- मे १, ५, ६, ७, ८, ९, १०, १३, १४, १६, १७, २०, २३, २४.
- जून २, ४, ५, ६, ८.

## वृद्धाची हत्या करणारे जोडपे गजाआड

**स्थानिक गुन्हे अन्वेषणची कारवाई**

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धनमधील एका ७२ वर्षीय वयोवृद्धाची हत्या करणाऱ्या जोडप्याला गजाआड करण्यात आले. रायगडच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने कारवाई करीत त्यांना ठाणे व चेंबूर येथून ताब्यात घेतले. वृद्धाच्या एकांतपणाचा फायदा घेत लुबाडण्याच्या उद्देशाने लगट करीत विवाह करण्याचे आमिष दाखविले. त्यानंतर साथीदाराच्या मदतीने संपविले. मात्र, अवघ्या काही तासातच त्यांना पकडण्यात यश आले.

रामदास खैरे असे या मयताचे नाव आहे. ते बँकेत नोकरीला होते. सेवानिवृत्तीनंतर श्रीवर्धनमधील कुंदन रेसिडेन्सीमध्ये एका खोलीत ते एकटेच राहात होते. त्यांचा मोबाईल बंद असल्याची माहिती स्थानिकांनी दिली. श्रीवर्धन पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रिकामे यांच्यासह त्यांच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. घराचा दरवाजा बाहेरून बंद होता. त्याला कुलूप लावलेले होते. अखेर पोलिसांनी आतमध्ये जाऊन पाहणी केली असता, रामदास खैरे मृतावस्थेत आढळून आले. त्यांच्या शरीरावर गंभीर जखमा दिसून आल्या. त्यामुळे त्यांचा कोणीतरी खून केल्याचा संशय बळावला.

घटनेचे गांभीर्य ओळखून पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब खाडे यांच्या नेतृत्वाखाली तपास करण्यात आला. सायबर गुन्हे शाखेची मदत घेण्यात आली. अखेर दोन संशयित व्यक्ती असल्याची माहिती पथकाला मिळाली. चेंबूर व ठाणे येथून •› पान ५ वर

# मुंबई-गोवा महामार्ग मृत्यूचा सापळा

**। कोलाड । वार्ताहर ।**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील नागोठणे ते कोलाड-इंदापूरदरम्यानच्या कामात धीम्या गती आल्याने कोलाड आंबेवाडी नाका येथे दिवसेंदिवस अपघाताची मालिका सुरुच असून, अपघाताची मालिका थांबाण्याचे नावच घेत नाही. या परिसरात रोज कोठे ना कुठे अपघात घडत आहेत. याला मुख्य कारण ठेकेदाराची चाललेली मनमानी व निकृष्ट दर्जाचे रस्ते यामुळे येथे अपघाताचे मुख्य कारण ठरत आहे. मुंबई-गोवा महामार्गाचे काम गेली १७ वर्षांपासून सुरु आहे. यावर्षी महामार्गाचे काम वेगात सुरु असले तरी ते ठरविक वेळेत पूर्ण होईल असे सांगता येत नाही; परंतु आंबेवाडी नाक्यावरील सर्वच काम अर्धवट स्थितीत आहे.

महामार्गावरील आंबेवाडी नाका येथील निकृष्ट दर्जाचे रस्ता, अर्धवट असणारे गटाराचे काम, रस्त्याला पडलेले खड्डे, अपूर्ण साईडपट्ट्या या विविध क्षेत्रातील कार्यकर्ते यांनी ठेकेदाराविरुद्ध आवाज उठावला, आंबेवाडी ग्रामपंचायत, कोलाड पोलीस ठाण्यात लेखी तक्रारी दिली. याविषयी कोलाड पोलीस ठाण्याचे सपोनि नितीन मोहिते, अंमलदार नरेश पाटील व आंबेवाडी ग्रामपंचायत यांनीही संबंधित ठेकेदार रस्त्याच्या समस्यांविषयी कल्पना दिल्या तरी आंबेवाडी नाका येथील रस्त्याच्या समस्या सुरुच आहेत. ठेकेदाराच्या मनमानीमुळे प्रवाशांचा नाहक बळी जात आहे. यामुळे आंबेवाडी नाक्यावर रस्त्याच्या समस्या त्वरित दूर झाल्या नाहीत तर संबंधित ठेकेदाराविरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा चंद्रकांत लोखंडे यांनी दिला आहे.

## वीजचोरांविरुद्ध गुन्हे दाखल

**। कल्याण । प्रतिनिधी ।**

महावितरणच्या टिटवाळा उपविभागात वीजचोरांविरुद्ध सातत्याने कारवाई सुरू आहे. गत नोव्हेंबर महिन्यात केलेल्या तपासणीत ८७ जणांकडे २४ लाख २० हजार रुपयांची वीजचोरी आढळली. या सर्व ८७ जणांविरूद्ध मुरबाड पोलीस ठाण्यात वीजचोरीचा गुन्हा दाखल झाला आहे.

कल्याण परिमंडलाचे मुख्य अभियंता चंद्रमणि मिश्रा आणि कल्याण मंडल दोनचे अधीक्षक अभियंता दिलीप भोळे, कल्याण ग्रामीण विभागाचे कार्यकारी अभियंता विनय काळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. मांडा-टिटवाळा शाखा कार्यालयांतर्गत टिटवाळा मंदिर परिसर, बल्याणी, बनेली, मांडा पश्चिम भागातील ४० तर गोवेली शाखेंतर्गत म्हारळ व वरप भागात ३३ जणांकडे तसेच खडवली परिसरात १४ जणांकडे वीजचोऱ्या आढळून आल्या. चोरीच्या विजेच्या देयक व दंडाच्या रकमेचा भरणा टाळणाऱ्या या ८७ जणांविरुद्ध दिलेल्या फिर्यादीनुसार मुरबाड पोलिसांनी गुन्ह्याची नोंद केली आहे.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

### SRM E-TENDER NOTICE

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.**

| Sr. No. | Tender/Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1. | **Tender No:-** EE/EHV (O &M) /DIVN/MHD/ Tech/E-Tender-40/2024-25 Dtd.04.12.2024 **RFx No.** 7000034434 | **Sub. :-** Invitation SRM E-tender for the work of attending emergency breakdown and planned maintenance activities of various 220 KV /100 KV EHV line under KTL S/Dn., Mahad under EHV(O&M) Dn., Mahad for the year 2024-25. | **Rs. up to 25,00,000/- (Including GST + 1% Labour CESS)** |

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/- + GST.

Bid submission is from 04.12.2024 @ 00:00 hrs to 10.12.2024 @23:59Hrs for above tender For further details visit our website:- **https://srmetender.mahatransco.in.**

**Contact Person:-** The Addl. Executive Engineer, (O) : Phone No.7373101089

Note: All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**-Sd/-**
**Executive Engineer, EHV(O&M) Dn. Mahad**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

### E –TENDER NOTICE

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** specification. **Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo :-7000034400**<br>**Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/ e-Tender-36/ 2024-2025.**<br>RFx e-tender for work of removing of dry grass, bush and providing of tractor of various 220KV & 100KV lines under EHV Lines S/Dn Panvel under EHV (O&M) Division Panvel..<br>**Tender amount Rs. 9,48,552/-,**<br>**EMD amount Rs. 9,486/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **03.12.2024, 18:00 Hrs. to 10.12.2024, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 10.12.2024 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **11.12.2024 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**

**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.

**Note :** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**EXECUTIVE ENGINEER E.H.V.(O&M) DN. PANVEL**



**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
कार्यकारी अभियंता (विद्युत) यांचे कार्यालय
रायगड विद्युत विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग रायगड,
सार्वजनिक बांधकाम आवार-पेण, ता. पेण, जि. रायगड, पिन - ४०२१०७

Email : elraigad.ee@mahapwd.gov.in / elraigad.ee@gmail.com
Website : www.mahapwd.gov.in
दुरध्वनी क्र. ०२१४३-२९९२८८

जा क्र. का.अ./राविवि/निविदा-१/४४३६/सन २०२४
दिनांक : २७.११.२०२४

**ई-निविदा सुचना क्र. १८ सन २०२४-२५**

संदर्भ : १. महाराष्ट्र शासन सा.बां.विभाग, मंत्रालय मुंबई शासन निर्णय क्र. सीएटी २०१७/प्र.क्र.८/इमारती-२ दिनांक २७ सप्टेंबर २०१८
२. महाराष्ट्र शासन सा.बां. विभाग, मंत्रालय मुंबई शासन निर्णय क्र. संकिर्ण २०२२/प्र.क्र. १०४/इमा-२ दिनांक ३०/०९/२०२४
३. मा. अधिक्षक अभियंता, प्रादेशिक विद्युत मंडळ मुंबई यांचे पत्र क्र. अअ(वि)/कार्या-२/५०४४/२०२४ दि.११.१०.२०२४

कार्यकारी अभियंता, रायगड विद्युत विभाग, सा.बां. रायगड, महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालयामागे, सा.बां. परिसर- पेण, ता. पेण, जि. रायगड, पिन कोड - ४०२१०७ दुरध्वनी क्र. ०२१४३-२९९२८८ हे संदर्भाचे अधिन राहुन महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, उर्जा व कामगार विभागाकडील नोंदणीकृत अनुज्ञाप्तीधारक कंत्राटदाराकडून खालील कामांकरीता ब- १ नमुन्यातील निविदा, ई-निविदा (ऑनलाईन) प्रणालीद्वारे मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मा. कार्यकारी अभियंता (विद्युत), रायगड विद्युत विभाग, सा.बां. रायगड व मा. अधिक्षक अभियंता, विद्युत प्रादेशिक मंडळ, मुंबई यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजीत रक्कम रू. | ई-निविदा उपलब्ध कालावधी | निविदापूर्व बैठक/ ठेकेदारांचा वर्ग/ इसारा रक्कम/कोरा निविदा शुल्क | ई-निविदा उघडणे |
|---|---|---|---|---|---|
| | | | **द्वितीय मागणी** | | |
| 1 | RAESD/OW/198/2024-25 Providing 62.5 kva DG set at Newly constructed building Hon. Additional Collector office Alibag, Tal - Alibag. Dist-Raigad. | रु.९,६०,०५१/- | दिनांक ०४.१२.२०२४ सकाळी १०.०० वाजेपासून दिनांक १४.१२.२०२४ सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत | १) निविदापूर्व बैठक नाही. २) लिफाफा क्र. १ मध्ये सादर करावयाच्या कागदपत्रांचा तपशील शासकीय संकेतस्थळावर अपलोड केलेल्या निविदा नमुन्यामध्ये सविस्तर दर्शविण्यात आलेला आहे. ३) इसारा रक्कम रू. ९७००/- ४) निविदा शुल्क रू. ५००/- अधिक १८% GST | दिनांक १६.१२.२०२४ सकाळी ११.०० |
| | | | **प्रथम मागणी** | | |
| 2 | RAESD/OW/155/2024-25 Providing Internal El. External El, Solar Ongrid system, Water pumps, DG set, CCTV system, Lift, Fire Fighting system at Revenue Bhavan Mahad, Dist-Raigad | रु.१६,६९८,८९७/- | दिनांक ०४.१२.२०२४ सकाळी १०.०० वाजेपासून दिनांक २८.१२.२०२४ सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत | १) दिनांक २०.१२.२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता मा. अधीक्षक अभियंता (विद्युत), मुंबई प्रादेशिक विद्युत मंडळ, सा.बां. विभाग मुंबई यांचे दालनात आयोजित करण्यात आलेली आहे. २) लिफाफा क्र. १ मध्ये सादर करावयाच्या कागदपत्रांचा तपशील शासकीय संकेतस्थळावर अपलोड केलेल्या निविदा नमुन्यामध्ये सविस्तर दर्शविण्यात आलेला आहे. ३) इसारा रक्कम रू. १५००००/- ४) निविदा शुल्क रु. १०००/- अधिक १८% GST | ई-निविदा दिनांक ३०.१२.२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता मा. अधीक्षक अभियंता (विद्युत) मुंबई प्रादेशिक विद्युत मंडळ, सा.बां. विभाग मुंबई यांचे कार्यालयात उघडण्यात येईल. निविदा खरेदीदारांनी दिनांक ३०.१२.२०२४ रोजी सकाळी ११.०० पूर्वी हार्डकॉपी सह ऑफ बीड यासह उपस्थित राहणे आवश्यक आहे. |
| 3 | RAESD/OW/139/2024-25 Providing Electrification, Fire Alarm system, AC units, CCTV system, water pumps & DG set at Bandhkam Bhavan Mahad, Dist-Raigad. | रु.३,७२८,२०१/- | दिनांक ०४.१२.२०२४ सकाळी १०.०० वाजेपासून दिनांक १९.१२.२०२४ सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत | १) निविदापूर्व बैठक नाही. २) लिफाफा क्र. १ मध्ये सादर करावयाच्या कागदपत्रांचा तपशील शासकीय संकेतस्थळावर अपलोड केलेल्या निविदा नमुन्यामध्ये सविस्तर दर्शविण्यात आलेला आहे. ३) इसारा रक्कम रू. ३७३००/- ४) निविदा शुल्क रू. ००/- अधीक १८% GST | दिनांक २३.१२.२०२४ सकाळी ११.०० |
| 4 | RAESD/OW/176/2024-25 Providing Internal & External El at Government Men Begger's Home Building at Pui-kolad, Tal-Roha Dist-Raigad | रु.४,४२४,७४६/- | दिनांक ०४.१२.२०२४ सकाळी १०.०० वाजेपासून दिनांक १९.१२.२०२४ सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत | १) निविदापूर्व बैठक नाही. २) लिफाफा क्र. १ मध्ये सादर करावयाच्या कागदपत्रांचा तपशील शासकीय संकेतस्थळावर अपलोड केलेल्या निविदा नमुन्यामध्ये सविस्तर दर्शविण्यात आलेला आहे. ३) इसारा रक्कम रू. ४४३००/- ४) निविदा शुल्क रू. ५००/- अधीक १८% GST | दिनांक २३.१२.२०२४ सकाळी ११.०० |
| 5 | RAESD/OW/235/2024-25 Providing 60 KVA DG set for EVM VVPAT storage Godown at Shitole, Tal-pen Dist-Raigad | रु.१,२२२,०६५/- | दिनांक ०४.१२.२०२४ सकाळी १०.०० वाजेपासून दिनांक १९.१२.२०२४ सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत | १) निविदापूर्व बैठक नाही. २) लिफाफा क्र. १ मध्ये सादर करावयाच्या कागदपत्रांचा तपशील शासकीय संकेतस्थळावर अपलोड केलेल्या निविदा नमुन्यामध्ये सविस्तर दर्शविण्यात आलेला आहे. ३) इसारा रक्कम रू. १२३००/- ४) निविदा शुल्क रू. ५००/- अधीक १८% GST | दिनांक २३.१२.२०२४ सकाळी ११.०० |

खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. https://mahatenders.gov.in (सदर निविदा सूचनामध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
२. कार्यकारी अभियंता, रायगड विद्युत विभाग, सा.बां. रायगड, महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालयामागे, सा.बां. परिसर-पेण, ता. पेण, जि. रायगड, पिनकोड-४०२१०७ दूरध्वनी क्र. ०२१४३-२९९२८८ या कार्यालयातील सूचना फलक.
३. वरील कामांकरीता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्यामध्ये नोंदणीकृत विद्युत ठेकेदार व उद्योग, उर्जा व कामगार विभागाकडील विद्युत अनुज्ञाप्तीधारक विद्युत ठेकेदार यासह ज्यांना तत्सम प्रकारचे काम यशस्वीपणे पुर्ण केल्याचा अनुभव आहे. असे कंत्राटदार निविदा सादर करु शकतात. (अनुभवाचे प्रमाणपत्र लिफाफा क्र. १ मध्ये जोडण्यात यावे.
४. इतर अटी व शर्ती ई-निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील. सदर कामांची एक अथवा सर्व ई-निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखुन ठेवलेले आहे.

सही/-
**(स.बं.कंट्टी)**
कार्यकारी अभियंता,
रायगड विद्युत विभाग,
सा.बां. पेण- रायगड.



### जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक गजानन शांताराम मशिलकर यांच्याकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे तशा आशयाची बोलणी आमच्या अशिलांच्या सोबत झालेली आहे. सदरची मिळकत हि निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| कुरकुंडी कोलटेंभी, ता. अलिबाग | २३८ | ०-२४-०० | ०.५३ |

वर वर्णन केलेली मिळकत ही या जाहिर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरिल मिळकतींचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीची विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. आशिष नरेंद्र म्हात्रे**
मु. पेझारी (पळी आंबेघर), पो. पोयनाड
ता. अलिबाग, जि. रायगड.
मोबा. नं. ९२७३२७३८४३/९६३७२७००१९



### जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मौजे अलिबाग, ता. अलिबाग येथील सिटी सर्व्हे नं. ६०१, ६०१/१, ६०१/२, ६०२ ह्या मिळकतीवर बांधलेल्या आसावरी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. जुनी बाजारपेठ अलिबाग ह्या इमारतीमधील अे विंग मधील पहिल्या मजल्यातील निवासी सदनिका क्र. १०१, क्षेत्र ७७९ चौ. फुट बिल्ट अप (अलिबाग नगरपरिषद रेकॉर्डप्रमाणे मालमत्ता ९४५ व जुना क्र. Z1MKT001236 व नविन मालमत्ता क्र. ALB000001234 ह्या निवासी सदनिकेचे विद्यमान मालक व कब्जेदार श्री. हेमंत गजानन भायदे, रा. आसावरी सोसायटी, बाजारपेठ अलिबाग यांजकडून माझे अशिल यांनी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले आहे. संदर्भित सदनिका मिळकतीच्या विक्री व्यवहाराची प्राथमिक बोलणी विद्यमान मालक व माझे अशिलांमध्ये झालेली असून बयाणापावती स्वाक्षरीत झालेली आहे. संदर्भित सदनिका मिळकत ही पुर्णतः निर्वेध, बोजाविरहीत व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर सदनिका मिळकतीचे विद्यमान मालक यांनी माझे अशिलांना दिलेला आहे. या उपरही सदर सदनिका मिळकतीमध्ये अन्य कोणाचेही, कसल्याही तऱ्हेचे हक्क, अधिकार व हितसंबंध असल्यास तसेच गहाण, दान, बक्षिस, करार, साठेकरार, अभिहस्तांकन झा-लेले असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ७ दिवसांच्या कालावधीत कागदोपत्री पुराव्यासह लेखी खालील पत्यावर कळविण्यांत यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही तोंडी/लेखी हरकत न आल्यास माझे अशिल व विद्यमान मालक वर नमूद सदनिका मिळकतीचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील. तदनंतर मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ०३/१२/२०२४

**डॉ. ॲड. निहा अनिस राऊत**
लब्बैक, इस्त्रायल आळी
सन्मान हॉटेल समोर अलिबाग
मो.नं. ९८२२०६८५२६

सदर सदनिका मिळकतीची जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यास हरकत नाही.
सही/-
श्री. हेमंत गजानन भायदे



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक किरण अनंत म्हात्रे यांचा अविभाज्य हिस्सा विकत घेण्याचे ठरविले आहे व तशी बोलणी केलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | ग.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| मांडवे तर्फ झिराड | ३/१/अ/१/३ | ०.४४.२०<br>पो.ख. ०.१२.००<br>एकुण ०.५६.२० | ०.७९ |

वर वर्णन केलेली मिळकतीपैकी किरण अनंत म्हात्रे यांचा अविभाज्य हिस्सा एवढे क्षेत्र हे सदर जाहिर नोटीसचा विषय आहे.

सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याचा दावा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांना केलेला आहे.

तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कोणाचाही कसलाही हक्क हितसंबंध बोजा अथवा गहाण, दान, लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी मेन्टेनस, मेहेर, कर्ज वगैरे बाबत कसलाही हक्क व हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकतीसंबंधाचा लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांचे आत आणून द्यावी. सदर मुदतीत हरकत न आल्यास सदरचा व्यवहार आमचे अशिल पूर्ण करतील व मागून येणारी हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही यांची नोंद घ्यावी. मागाहुन येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही हे सर्वांना कळावे.

**ॲड. निखिल राजाराम पाटील**
ॲकॉन क्लासिक फ्लॅट नं. १०६
जिल्हा न्यायालय रायगड समोर
ता. अलिबाग, जि. रायगड
मो. ९१४५५८७२००



### जाहीर नोटीस
**कार्यकारी दंडाधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, खालापुर यांचे न्यायालयात**

अर्ज क्रमांक :-१४३/२०२४

श्री. लहानु लक्ष्मण पवार,
रा.न्यु. एस. ई. आई. रोड कातकरी, वाडी — अर्जदार
शिवनगर, पो. मोहपाडा, ता. खालापुर, जि. रायगड.

विरुद्ध

जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत वासांबे — सामनेवाले

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी कै. शंकर गणु कातकरी यांचा दिनांक १९/०९/१९९५ रोजी मौजे रिसवाडी ता. खालापुर येथे घरीच आजारामुळे मयत झाले आहेत. ते मौजे रिसवाडी ता. खालापुर, जि.रायगड येथे राहत होते परंतु त्यांच्या मृत्यूची नोंद ग्रुपग्रापंचायत वासांबे यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याने, अर्जदार यांनी कै. शंकर गणु कातकरी यांच्या मृत्यूनोंदीचे आदेश जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी, ग्रुपग्रापंचायत वासांबे यांना करावेत त्यासाठी या मे. न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. याबाबत कोणत्याही व्यक्तीची हरकत असल्यास त्यांनी ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झालेपासुन १५ दिवसाच्या आत मे. न्यायालय खालापुर येथे हजर राहून हरकत घ्यावयाची आहे. याद्वारे असे जाहिर करण्यात येते की, हा कालावधी संपण्याआधी योग्य ती हरकत घेतली नाही तर हे मे. न्यायालय अर्जदार यांचा अर्ज मंजूर करेल व जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी, ग्रुपग्रापंचायत वासांबे यांना कै. शंकर गणु कातकरी यांचा मृत्यूदाखला देणेबाबत आदेश करील याची दखल घ्यावी.
आज दिनांक २९/११/२०२४ रोजी माझी सही न्यायालयाचे शिक्यासह दिली.

सही/-
**(सुधाकर राठोड)**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा**
**निवासी नायब तहसिलदार**
**खालापुर**



### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे पेढांबे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती, त्या मिळकतींच्या विद्यमान मालकांकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. /हि. नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| पेढांबे | १५३ | ०-४२-८०<br>पो.ख. ०-०४-२०<br>०-४७-००<br>पैकी व हेक्टर ३०.८० आर आकार ६.७१ | १०.८१ | दयानंद नारायण पाटील |
| पेढांबे | १५४ | ०-२९-६०<br>पो.ख.०-०३-००<br>०-३२-६० | ७.३१ | वनिता नरहरी मोकल<br>आनंद नरहरी मोकल<br>स्मिता महेंद्र जुवेकर<br>अतुल नरहरी मोकल |
| पेढांबे | १६७ | ०-२४-९०<br>पो.ख.०-०३-००<br>०-२७-९० | ७.१२ | हानिफ इब्राहिम पेरेकर<br>इम्तियाज इस्माईल पेरेकर<br>इरफान इस्माईल पेरेकर<br>नुरजहाँ इस्माईल कडवेकर<br>बशिर इब्राहिम पेरेकर<br>अफसरी मसरूर गोरमी<br>शबाना परवेज शिरसेकर<br>साबिरा इवाहिम पेरेकर<br>बानू इस्माईल पेरेकर |
| पेढांबे | १९६ | ०-१२-४०<br>पो.ख.०-०२-००<br>०-१४-४० | ३.५६ | अब्बास अमजदअली सैय्यद<br>कासमअली अमजदअली सैय्यद |
| पेढांबे | १९९ | ०-४४-१०<br>पो.ख.०-०६-१०<br>०-५०-२० | १२.७१ | आयशाबिवी इस्माईल दाखवे<br>फकिरमहंमद जैनुद्दिन लंबाते<br>आसिफ जैनुद्दिन लंबाते<br>रजिया नफिस गोरमे<br>सुलतान जावेद दांडेकर<br>मेहजबीन इम्रान अरब |

सदरच्या मिळकती या त्यांचे निर्वेध मालकी हक्कांच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा त्यांचे कोणत्याही भागावर कुणा व्यक्ती, व्यक्ती समुह, बँक, वित्तीय संस्था, पतसंस्था, पतपेढी, यांचा अथवा अन्य कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, विकसन करार, संयुक्त उपक्रम, भागिदारी, वारसाहक्क, लिज, लिएन, पॉन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, जाण्या-येण्याच्या वहिवाटीच्या रस्त्याचा हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतींचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत व त्यांचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही कोणतीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : ४/१२/२०२४

सही /-
**ॲड. गणेश गोविंद पाटील**
अे/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, बाम्हणआळी,
अलिबाग, रायगड, ४०१ २०१.



### पेण नगरपरिषद, पेण
**आरोग्य विभाग**
**ई-निविदा सूचना सन २०२४-२०२५**

पेण नगरपरिषद, पेण जि. रायगड यांजकडून सन २०२४-२०२५ आर्थिक वर्षासाठी Construction & Installation Of Machinery For Solid Waste Manegement Plant Under Sbm-2 At Waste Processing Plant, Pen या कामासाठी दिनांक ०४/१२/२०२४ ते दि. ११/१२/२०२४ पर्यंत अनुभवी व इच्छुक व्यक्ति/संस्था/कंपनी यांजकडून निविदा/दरपत्रक मागविणेत येत आहेत. सदर कामासाठी इसारा रक्कम रू. ९३,४९९/- मात्र निविदा व फॉर्म फी १०००/- मात्र इतकी राहिल. निविदा जमा करण्याचा दिनांक- १३/१२/२०२४ पर्यंत राहिल.

सदर संपुर्ण निविदा प्रक्रिया ई-निविदाद्वारे ऑनलाईन पद्धतीने संगणक प्रणालीवर होईल. सदर निविदा नोटीस प्रसिद्धी सूचना, आवश्यक असणारी कागदपत्रे, निविदा फॉर्म फी, इसारा रक्कम भरणे व शुद्धीपत्रक इत्यादी विषयी माहिती http:www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल. वरील कामाची निविदा www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन मिळेल.

सही /-
**प्रशासक तथा मुख्याधिकारी,**
**पेण नगरपरिषद, पेण**



### लिलावाचा मसुदा

दिनांक.१२/१२/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता मुरुड तालुक्यांतील जिल्हा परिषदेच्या मालकीच्या जागेत असणाऱ्या झाडांची ठिकाण खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | लिलावास पात्र झाडांची ठिकाण | झाडांची संख्या |
|---|---|---|
| १ | दरबार हॉल मध्ये (बांधकामातील झाडे वगळून) | ५२ |
| २ | पशु वैद्यकीय दवाखाना मुरुड श्रेणी-१ येथे | १८ |
| ३ | जिल्हा परिषद विश्रामगृहा जवळील | ०४ |
| ४ | बोर्ली येथील विश्रामगृह परिसरातील झाडे | २० |
| | एकूण | ९४ |

नारळांच्या झाडांच्या फळांचा लिलाव पंचायत समिती इमारतीतील डॉ. नाना साहेब धर्माधिकारी सभागृह येथे आयोजित करण्यांत आला आहे. तरी अधिक माहितीसाठी कार्यालयीन वेळेत पंचायत समिती मुरुड जंजिरा कार्यालयांशी संपर्क साधावा.

सही/-
**गट विकास अधिकारी (गट-अ)**
**पंचायत समिती मुरुड जंजिरा**



### जाहीर नोटीस
**कार्यकारी दंडाधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, खालापुर यांचे न्यायालयात**

अर्ज क्रमांक :-१४४/२०२४

श्री. लहानु लक्ष्मण पवार,
रा.न्यु. एस. ई. आई. रोड कातकरी, वाडी — अर्जदार
शिवनगर, पो. मोहपाडा, ता. खालापुर, जि. रायगड

विरुद्ध

जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी, — सामनेवाले
ग्रुप ग्रामपंचायत वासांबे

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी कै.लक्ष्मण गणु कातकरी यांचा दिनांक ११/०४/१९६७ रोजी मौजे रिसवाडी ता. खालापुर येथे घरीच आजारामुळे मयत झाले आहेत. ते मौजे रिसवाडी ता. खालापुर, जि.रायगड येथे राहत होते परंतु त्यांच्या मृत्यूची नोंद ग्रुपग्रापंचायत वासांबे यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याने, अर्जदार यांनी कै. लक्ष्मण गणु कातकरी यांच्या मृत्यूनोंदीचे आदेश जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी ग्रुपग्रापंचायत वासांबे यांना करावेत त्यासाठी या मे. न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. याबाबत कोणत्याही व्यक्तीची हरकत असल्यास त्यांनी ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झालेपासुन १५ दिवसाच्या आत मे. न्यायालय खालापुर येथे हजर राहून हरकत घ्यावयाची आहे.

याद्वारे असे जाहिर करण्यात येते की, हा कालावधी संपण्याआधी योग्य ती हरकत घेतली नाही तर हे मे. न्यायालय अर्जदार यांचा अर्ज मंजूर करेल व जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी, ग्रुपग्रापंचायत वासांबे यांना कै. लक्ष्मण गणु कातकरी यांचा मृत्यूदाखला देणेबाबत आदेश करील याची दखल घ्यावी.

आज दिनांक २९/११/२०२४ रोजी माझी सही न्यायालयाचे शिक्यासह दिली.

सही/-
**(सुधाकर राठोड)**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा**
**निवासी नायब तहसिलदार खालापुर**

## निवडक

### प्रदीप शिंदे सेवानिवृत्त

**नवीन पनवेल :** प्राथमिक आरोग्य केंद्र अजिवलीचे कनिष्ठ सहाय्यक प्रदीप बाळाराम शिंदे २९ वर्ष प्रदीर्घ सेवा करून शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाले. त्यांना प्राथमिक आरोग्य केंद्र अजिवली यांच्यातर्फे निरोप समारंभ देण्यात आला. यावेळी डॉ.सायली मानकर, डॉ. रेखा गायकवाड, दत्ता हिंदोळा, सुप्रिया कटारे, शरद बडे, नारायण आयरकर, संदेश गोवारी,राजाराम चव्हाण, पांडुरंग घुले, अशोक म्हात्रे, गायत्री कदम,सुनंदा रविढोणे, कल्पना शहासने आदी उपस्थित होते.

### जागतिक एड्स दिन साजरा

**उरण :** कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालय उरण यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात जागतिक एड्स दिन साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य के. शामा यांनी विद्यार्थ्यांनी चुकीच्या सवयीचा त्याग करून आहार व आरोग्य यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे असे सांगितले. वैद्यकीय अधिकारी डॉ. बाबासो काळेल यांनी एचआयव्ही एड्सची कारणे विद्यार्थ्यांसमोर विशद केली.

### जंतनाशक दिन मोहिम

**नवीन पनवेल :** पनवेल तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र -नेरे, वावंजे, अजिवली, आपटा, गव्हाण व उरण तालुक्यातील प्रा. आ. केंद्र कोप्रोली या सहा प्रा. आ. केंद्रातंर्गत ग्रामीण व शहरी भागात जंतनाशक मोहिम दिनांक ४ डिसेंबर रोजी व मॉपअप राऊंड १० डिसेंबर रोजी लाभार्थांना प्राथमिक शाळेत, अंगणवाडी केंद्रात आश्रम शाळा खाजगी शाळा, अनुदानित शाळा, विना अनुदानित शाळेत प्रत्यक्ष जंतनाशक गोळी खाऊ घालण्यात येणार आहे.

### घरपट्टी वाढीविरोधात रॅली

**तळा :** तळा नगरपंचायत प्रशासनाकडून नागरिकांना बजावण्यात आलेल्या वाढीव घरपट्टीच्या विरोधात तळा विकास आघाडीने शहरातून रॅली काढून मुख्याधिकाऱ्यांना निवेदन दिले.तळा नगरपंचायत हद्दीतील घरपट्टीमध्ये वाढ करण्याचा निर्णय नगर पंचायत प्रशासनाने घेतलेला आहे. त्या बाबतच्या नोटीस घरोघरी पोचवण्यात आल्या आहेत. रोजगाराच्या साधनाकडे पाहता आपण कोणत्याच करामध्ये वाढ करू नये अशी विनंती मुख्याधिकारी यांना करण्यात आली आहे.

### जासईमध्ये ग्रामसभा संपन्न


**उरण :** जासई ग्रामपंचायतीची ग्रामसभा सरपंच संतोष रामचंद्र घरत यांच्या अक्ष्यक्षतेखाली संपन्न झाली. ग्रामसभेमध्ये सर्व विषयांवर धोरणात्मक निर्णय घेवून विशेषता १५ वा वित्त आयोग आराखडा २०२५/२०२६ शासन मार्गदर्शक सुचनेनुसार प्रारूप आराखडा तयार करणे, स्वच्छ भारत अभियान, माझी वसुंधरा ०.५, मागासवर्गीयांच्या उन्नतीबाबतचे विषय आदी विषयांवर निर्णय घेण्यात आले. सदर सभेला ज्येष्ठ नागरिक व महिला उपस्थित होत्या.

# पक्षी अभ्यास केंद्र रखडले

**। रायगड । प्रतिनिधी ।**

मागील सरकारने गाजावाजा करून किहीम येथे आद्य पक्षी शास्त्रज्ञ डॉ. सलीम अली यांच्या नावाचे पक्षी अभ्यास व पर्यावरण अभ्यास केंद्र सुरू करण्याचे जाहीर केले होते. तीन वर्षांपूर्वी कामाला सुरुवातही झाली. ६० टक्के बांधकाम झाल्यानंतर अडीच वर्षांपूर्वी सत्तापालट झाल्याने केंद्राचे काम बंद पडले ते अद्याप सुरूच झालेले नाही. निदान नव्याने सत्तेवर आलेल्या सरकारने पक्षी केंद्राच्या बांधकामाकडे लक्ष घालून पूर्ण करावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

पर्यटन विभागामार्फत अलिबाग तालुक्यातील किहीम येथे पक्षी अभ्यासक सलीम अली यांच्या नावाने पक्षी अभ्यास केंद्र उभारण्याचा निर्णय घेण्यात आला होता. उद्धव ठाकरे यांचे सरकार स्थापन झाल्याबरोबर केंद्राचे कामही सुरू झाले होते; मात्र त्यानंतर सत्तांतर झाले आणि काम रखडले. एक पर्यटन क्षेत्र म्हणून एक वेगळी ओळख केंद्राच्या माध्यमातून होणार आहे. या जागेत २०२२ पासून केंद्राचे काम सुरू केल्याची माहिती जिल्हा परिषद बांधकाम विभागाकडून देण्यात आली आहे.

### पक्षी केंद्राची उद्दिष्टे

पर्यटन वाढीला अधिक चालना देणे, वेगवेगळ्या पक्ष्यांची माहिती लोकांपर्यंत पोहोचवणे, रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी किहीम येथील जुन्या जिल्हा परिषद शाळेमध्ये पक्षी अभ्यास केंद्र सुरू करण्यात येणार आहे. येथे त्यांनी भारतातील पक्ष्यांचा वावर, त्यांच्या सवयी, विविध प्रजाती, त्यांचे वैविध्य यांचा बारकाईने अभ्यास केला जाणार आहे. याबरोबरच स्थलांतरित पक्ष्यांचाही अभ्यास केला जाणार आहे.

### असे असेल संशोधन केंद्र

पक्षी केंद्रात सलीम अली यांच्याविषयी माहिती असणारे केंद्र बांधले जाणार आहे. सलीम अली यांनी पक्ष्यांविषयी लिहिलेल्या वेगवेगळ्या पुस्तकांचे ग्रंथालय, देशातील वेगवेगळ्या जातीच्या, कोकणातील वेगवेगळ्या पक्ष्यांची माहिती पर्यटक व स्थानिकांना मिळावी, यासाठी डिजिटल माहिती केंद्र, पक्ष्यांविषयी असलेल्या वेगवेगळ्या पुस्तकांसाठी विक्री, हे सर्व केंद्रात उपलबध असेल. अभ्यास केंद्राचे काम लवकर पूर्ण करावे, अशी मागणी पर्यावरणवाद्यांकडून केली जात आहे.

### पडीक शाळेची डागडुजी

पक्ष्यांबद्दल आकर्षण असलेल्या पक्षीप्रेमींबरोबर पर्यटनवाढीसाठी किहीम येथे जिल्हा परिषदेच्या शाळेत सलीम अली यांच्या नावाचे पक्षी सेंटर व अभ्यास केंद्र रायगड जिल्हा परिषद व वन विभागामार्फत उभे केले जाणार आहे. यासाठी किहीम गावातील जिल्हा परिषदेची शाळा २००७ पासून बंद आहे. शाळेच्या दोन इमारती असून सात वर्गखोल्या आहेत. त्यापैकी तीन वर्गखोल्या सुस्थितीत असून चार वर्गखोल्या नादुरुस्त आहेत. शाळेची जागा अंदाजे ३० गुंठे क्षेत्रामध्ये असून या ठिकाणी प्रकल्प सुरू केला जाणार आहे.

> “जिल्हा परिषद व वन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने किहीम येथे डॉ. सलीम अली यांच्या नावाचे पक्षी अभ्यास केंद्र उभे केले जाणार आहे. पक्षी अभ्यास केंद्रातून पर्यटनाला चालना मिळणार आहे. बांधकाम विभागाने इमारतीचे बहुतांश काम प्रमाणात पूर्ण केले आहे. काही दिवसांत स्पॉट व्हिजीटसंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांबरोबर चर्चा केली जाणार आहे. यात अन्य विभागांचाही सहभाग असल्याने सर्व विभागाच्या अडचणींचा विचार करून तोडगा काढला जाईल. - सत्यजित बडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रायगड.”

# अतिक्रमण विभागाची हातगाड्यांवर कारवाई



**अधीक्षक अरविंद पाटील यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आलेल्या कारवाईत १२ हातगाड्या तोडल्या**

**। पनवेल । वार्ताहर ।**

कळंबोली वसाहतीत अनधिकृत हातगाड्यांवर पालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकातर्फे कारवाई करण्यात आली.

अधीक्षक अरविंद पाटील यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आलेल्या कारवाईत शहरातील १२ हातगाड्या तोडण्यात आल्या असल्याची माहिती अधीक्षक पाटील यांनी दिली आहे. पालिकेच्या माध्यमातून कळंबोली वसाहतीत सध्या रस्ते आणि गटारांचे काम सुरु आहे. या कामामुळे रस्त्यावरील वाहतुकीत अडचणी येत असून अनेकदा वाहतूक कोंडी होत आहे. शहरात हातगाड्यांवर बेकायदेशीरपणे व्यवसाय करणारे व्यावसायिक जागा मिळेल त्या ठिकाणी व्यवसाय करीत आहेत. पालिकेच्या अतिक्रमण विभागाने हातगाड्यांवर कारवाई करून नागरिकांची वाहतूक कोंडीतून मुक्तता करावी अशी मागणी करण्यात आल्याने अतिक्रमण विभागामार्फत कारवाई करण्यात आली.

## पेणमधील ओम साई पदयात्रा मंडळातर्फे
# पेण ते शिर्डी पायी पदयात्रा!



**। हमरापूर । प्रतिनिधी ।**

पेण शहरातील ओम साई पदयात्रा मित्र मंडळ तर्फे पेण ते शिर्डी पायी पद्ययात्रेचे आयोजन करण्यात आले असून ही साई बाबांची पालखी पायी चालत शिर्डीकडे मार्गस्थ झाली.

गेली १६ वर्ष ओम साई पदयात्रा मित्र मंडळ पेण ते शिर्डी पर्यंत साई पालखीची सेवा करत आहेत. पेण येथून निघालेली ही बाबांची पालखी सोमवारी (दि. ६) सकाळी १० वाजता शिर्डीत पोहोचणार आहे. तसेच सोमवार ९ डिसेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता सेंच्युरीयन पार्क चिंचपाडा पेण येथे साईंचा भंडारा होणार आहे.

ओम साई पदयात्रा मित्र मंडळाचे सर्व्हेसर्वा कल्पेश ठाकूर, मितेश भानुशाली व त्यांचे २०० सभासद या पायी पदयात्रेत सामील झाले आहेत.

पेण-खोपोली मार्गे काम शेत, खेड मंचर, नारायणगाव, आळेफाटा मार्गे ती पायी दिंडी शिर्डीत पोहोचणार आहे.

# ध्यानधारणेचा घेतला अनुभव

**पनवेल :** आजच्या धाकाधकीच्या जीवनात प्रत्येक मनुष्य अनेक व्याधींनी ग्रस्त आहे. शारीरिक मानसिक अशा अनेक विषयानी त्रस्त आहे. तेजज्ञान फाऊंडेशनच्या शिबिरात उपस्थिताना तेजज्ञान ध्यानधारणेचा असीम अनुभव मिळाला. तेजज्ञान फाऊंडेशनच्या रजत महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने वाशी, पनवेल, अलिबाग येथे कार्यक्रमाचे आयोजन होत आहे. वाशीपासून याची सुरुवात झाली. अभिनेते अमोल देशमुख यांनी सरश्रीच्या पुस्तकांचे वाचन अनुभव सादर केले. डॉ. मकदुम, डॉ. सुन्नपवार यांनी विस्तृतपणाने आपले विचार मांडले. उपस्थित श्रोत्यांना दृकश्राव्य निवेदनसह ध्यानधारणा अनुभवता आली.

# ग्रामस्थांच्या समयसुचकतेमुळे जनावरांची सुटका

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ पोलीस ठाणे हद्दीत जनावरांची तस्करी करून त्यांना कत्तल करण्यासाठी विक्री केली जात असल्याचे स्थानिक शेतकरी आणि ग्रामस्थांमुळे पाच गोवंशिय जनावरांची सुटका झाली आहे.

डामसेवाडी येथील कातकरीवाडी मधून ग्रामस्थांनी आपल्या भागातील जनावरांची यशस्वी मुक्तता केली असून ती जनावरे आणि गाडी येथेच टाकून गाडी चालकाने पळ काढला आहे. दरम्यान, त्या पाच जनावरांची सुटका झाली असून पिकअप गाडीदेखील पोलिसांनी ताब्यात घेतली आहे.

कर्जत तालुक्यातील ठाणे जिल्हा हद्दीला लागून असलेल्या गावातील आणि आदिवासी पाड्यांमधील जनावरांची तस्करी हे तेथील शेतकऱ्यांसाठी मोठे संकट आहे.



त्या भागातून मागील काही वर्षात असंख्य गोवंशिय जनावरांची तस्करी झाली आहे. घराच्या बाहेर गोठ्यात बांधलेली जनावरेदेखील चोरून तस्करीसाठी नेली जात असल्याचे उघड झाले आहे.वर्षभर जनावरे पळवून नेण्याचे प्रकार सुरू असतात.

त्यामुळे नेरळ पोलिसांनी ठाणे जिल्ह्याचे हद्दीवर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे जाळे बसवले आहे. तरीदेखील अनेक वाटा शोधून जनावरांची तस्करी केली जात आहे. ठाणे जिल्ह्याच्या हद्दीवर असलेल्या भागातील भीमाशंकर नांदगाव रस्त्यावरून एक पीकअप गाडी जात असल्याचे स्थानिकांनी पाहिले.दुपारच्या सुमारास पिकअप गाडीला छप्पर टाकून संशयीतरीत्या वाहतूक सुरू असल्याचे ग्रामस्थांच्या लक्षात येताच ग्रामस्थांनी गाडी थांबविण्याचा प्रयत्न केला.

- **नेरळ पोलीस ठाण्यात केला गुन्हा दाखल**
- **वाहतूक करणारी गाडी पोलिसांनी घेतली ताब्यात**

त्यानंतर गाडीची तपासणी केली असता त्या गाडीमध्ये पाच गोवंशिय जनावरांना कत्तलीसाठी नेले जात असल्याचे आढळून आले. ग्रामस्थांनी त्या जनावरांबद्दल चौकशी करण्याचा प्रयत्न त्या गाडी चालकाकडे करण्यास सुरुवात केली असता गाडी चालक गाडी टाकून पळून गेला. ग्रामस्थांनी समयसुचकता दाखवून ताब्यात घेतलेल्या पिकअपमध्ये साधारण अडीच लाख रुपये किंमतीची जनावरे बांधून ठेवली होती.

त्या पिकअप गाडीमध्ये जनावरांना दाटीवाटीने भरुन ठेवले होते. तसेच त्या जनावरांच्या चारापाण्याची व्यवस्था करण्यात आली नव्हती. पोलिसांनी पाहणी केली असता त्या जनावरांची वाहतूक करण्यासाठी आवश्यक असलेला वैद्यकीय तपासणी पास देखील नव्हता. याबाबत नेरळ पोलीस ठाणे येथे महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम कलम ५ (ब) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून प्रभारी पोलीस अधिकारी शिवाजी ढवळे यांच्या मार्गदर्शन घेवून अधिक तपास पोलीस उप निरीक्षक वसावे हे करीत आहेत.

# मोर्बा रस्त्यावरील विद्युत पथदिवे बंद

## विद्युत तारा उघड्यावर, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव शहरातील नेहमी गजबजलेला मोर्बा रस्त्यावरील उपजिल्हा रुग्णालय ते दिनेश पवार यांच्या इमारतीच्या ५०० मिटर अंतरातील सुमारे २० विद्युत खांबावरील पथ दिवे गेल्या दोन महिन्यांपासून बंद आहेत. यामुळे परिसरात अंधाराचे साम्राज्य पसरले असून नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे.

दिघी-माणगाव-पुणे हा महामार्ग नव्याने तयार करण्यात आला आहे. त्यावेळी उपजिल्हा रुग्णालय ते दिनेश पवार यांच्या इमारती पर्यंत जमिनीखालून महामार्गावरील पथदिव्यांसाठी विद्युत जोडणी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळातर्फे एक वर्षांपूर्वी करण्यात आली होती. मात्र हे पथदिवे कधीच



कायम स्वरुपी प्रकाशले नाहीत. कधी मंद तर कधी बंद अशी अवस्था झाली होती. आता तर हे पथदिवे दोन महिने कायम स्वरुपी बंद अवस्थेत आहेत. हि जबाबदारी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांची असूनही त्यांनी या गैरसोयीकडे अक्षम्य दुर्लक्ष केले आहे.

याबाबतमाणगावनगरपंचायतीने वारंवार पत्रव्यवहार आणि फोनवरून संपर्क साधला असता उडवा उडवीची उत्तरे देण्यात येतात. तसेच प्रांताधिकारी माणगाव यांच्याकडेही याबाबत लेखी निवेदन देण्यात आले आहे. मात्र अद्यापही पथदिव्यांचा प्रकाश पडलेला नाही. विद्युत जोडणी करताना विद्युत तारा जमिनीखालून जोडण्यात आलेल्या नाहीत. त्या प्रवाहित तारा रस्त्यावरून खड्ड्याला चर न खोदता उघड्यावर ठेवण्यात आल्या आहेत. काही ठिकाणी त्या विद्युत तारा तुटलेल्या अवस्थेत आहेत. त्यामुळे विजेचा झटका लागून दुर्देवी घटना घडून नागरिकांचा मृत्यू ओढवला जाण्याची शक्यता आहे.

याबाबत महाराष्ट्र विद्युत नियामक मंडळाने ही आमची जबाबदारी नाही असे सांगून हात झटकले आहेत. काही ठिकाणी या विद्युत तारा वितळलेल्या आहेत. त्यामुळे सिद्धीनगर आणि खांदाड भागातील विद्युत पुरवठा वारंवार खंडित होत आहे. काही वेळा विद्युत दाब कमी जास्त होऊन इलेक्ट्रॉनिक वस्तू जळून नष्ट झाल्या आहेत. पथ दिवे सुरू नसल्याने रात्रीच्या अंधारात चाचपडत जावे लागते. तसेच छोटेमोठे अपघात आणि चोऱ्या होत असतात. काही ठिकाणी विद्युत उच्च दाबाच्या तारा उघड्यावर असल्याने भीतीचे वातावरण पसरले आहे.

# सकल मराठा समाजाचा वर्धापन दिन साजरा

## मराठा भूषण पुरस्कार उद्योजक रामचंद्र ढोबळे यांना प्रदान



**। पनवेल । वार्ताहर ।**

सकल मराठा समाज मंडळ, खांदा कॉलनीच्या वतीने ४ था वर्धापन दिन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी मराठा समाजासाठी उल्लेखनीय कार्य करणारे उद्योजक रामचंद्र ढोबळे यांना मराठा समाजाचे रायगड जिल्हा समन्वयक रामदास शेवाळे व विनोद साबळे यांच्या शुभहस्ते मराठा भूषण पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमाला खांदा कॉलनी सह पनवेल परिसरातील सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या मंडळींनी हजेरी लावली. मंडळाचे अध्यक्ष संतोष जाधव यांनी मंडळाच्या कार्याची तसेच संस्थेने समाजहितासाठी सुरु केलेल्या संस्थेच्या वेबसाईटची माहिती उपस्थितांना दिली. यावेळी उपस्थित विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. सकल मराठा समाज मंडळाच्या या उपक्रमामुळे समाज बांधणीच्या दिशेने सकारात्मक पाऊल उचलल्याचे समाधान कार्यक्रमाचे आभार व्यक्त करताना मंडळाचे सचिव सदानंद शिर्के यांनी आपल्या मनोगतात सांगितले.

# हरवलेला मुलगा कुटुंबाच्या स्वाधीन!

**। माणगांव । वार्ताहर ।**

शाहू संभाजी निकम (वय-१६ वर्ष,रा.कोगे,ता.करवीर,जि. कोल्हापूर) हा पहाटे तीन वाजताच्या सुमारास गस्त घालत असताना माणगांव पोलिसांना मिळून आला. पोलिसांनी त्याच्याकडे चौकशी केली असता तो हरवला असल्याचे त्यांनी पोलिसांना सांगितले. तेव्हा माणगाव पोलिसांनी त्याच्याकडून त्याचे वडील संभाजी महादेव निकम यांचा मोबाईल नंबर घेऊन माणगांव पोलिसांनी त्याच्या कुटुंबाला मुलगा माणगांव बसस्थानक येथे मिळाला असल्याचे सांगितले. पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली माणगांव पोलिसांनी मुलाला त्याचे वडील व मामा संजय पाटील यांच्या स्वाधीन केले.

## राष्ट्रीय स्मारकाची केवळ घोषणा
# माथेरानचे सुपुत्र हुतात्मा भाई कोतवाल यांच्या घराची पडझड



**। नेरळ । वार्ताहर ।**

देशाच्या स्वातंत्र्य समरात सहभागी होऊन आपल्या प्राणाची आहुती देणारे हुतात्मा विठ्ठलराव तथा भाई कोतवाल यांचे घर अनेक वर्षाच्या प्रतीक्षेनंतरदेखील राष्ट्रीय स्मारक बनले नाही.भाई कोतवाल यांच्या घराची स्थिती नाजूक असून त्या ऐतिहासिक घराचा एक भाग कोसळला आहे. दरम्यान, शासनानेदेखील हुतात्मा भाई कोतवाल यांचे घर राष्ट्रीय स्मारक करण्यासाठी एक कोटींचा निधी देण्याची घोषणा केली होती,मात्र अद्याप ती घोषणाच राहिली आहे.

ब्रिटिशांविरुद्ध लढताना दोन जानेवारी १९४३ मध्ये भाई कोतवाल यांना हुतात्मा व्हावे लागले. याच हुतात्मा भाई कोतवाल यांच्या कुटुंबाची वाताहत झाली आणि आज त्यांचा रक्ताचा कोणी राहिला नाही. त्यानंतरदेखील माथेरानमधील घोडके आळीमध्ये असलेले घर अनेक समस्यांनी व्यापलेले आहे. राष्ट्र निर्मिती मधील महत्वाचे केंद्र राहिलेले हुतात्मा भाई कोतवाल यांचे घर चारही बाजूंनी अडचणीत आहे. त्या घराचे राष्ट्रीय स्मारक व्हावे यासाठी अनेक प्रयत्न झाले आहेत.१५ वर्षांपूर्वी या घराची दुरुस्ती व्हावी आणि घरामध्ये राहत असलेले भाडेकरू यांना बाहेर काढण्यासाठी सुधागड बलिदान दिनी जोरदार आवाज उठविण्यात आला होता. त्यावेळी घराची दुरुस्ती करून देण्यात कर्जत तालुक्यातील भाई कोतवाल प्रेमींना यश आले होते. मात्र आजही घराच्या अनेक भागात भाडेकरू राहून आहेत. त्यांना बाहेर काढणे कोणाला जमत नाही आणि त्या घराचे राष्ट्रीय स्मारक करणे कठीण झाले आहे.

हुतात्मा भाई कोतवाल यांच्या घराची स्थिती त्यांच्या ११२ व्या जयंतीचे दिवशी पुन्हा एकदा समोर आली. घराची एका बाजूने पडझड झाली असून त्याच भागात भाडेकरू यांना घर ताब्यात ठेवले आहे. तसेच राहत असलेल्या भागातील छप्पर पावसाळ्यात आलेल्या वादळात मोडून गेले आहे. हुतात्मा भाई कोतवाल यांची १०१वी जयंती साजरी होत असताना माथेरान नगरपरिषद हद्दी मधील घराचे स्मारक करण्यात यावे अशी मागणी होती. यासाठी शासनाने आपल्या अर्थ संकल्पात एक कोटींचा निधी देण्याचे तत्कालीन अर्थ मंत्री अजित पवार यांनी २०१३ मध्ये अर्थसंकल्प जाहिर करताना घोषणा केली होती. हा निधी दहा वर्षे लोटली तरी माथेरान नगरपरिषदेकडे आलेला नाही.त्यामुळे राज्य सरकारने केवळ घोषणा केली की काय? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

### सरकार फक्त घोषणा करणार आहे काय...

२६ मार्च सन २०१२/१३ च्या अर्थसंकपात तत्कालीन वित्त मंत्री अजित पवार यांनी केलेल्या भाषणात वीर हुतामा भाई कोतवाल यांच्या माथेरान येथील रहात्या घराचे स्मारक करण्यात यावे. यासाठी ठराव क्रमांक ९४ नुसार या स्मारका साठी १ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला जाईल अशी घोषणा केली होती. परंतु हा निधी उपलब्ध झाला की नाही? हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.



### हुतात्मा हिराजी पाटील यांचे घरदेखील स्मारकाच्या प्रतिक्षेत

हुतात्मा भाई कोतवाल यांच्या सोबत २ जानेवारी १९४३ मध्ये ब्रिटिशांच्या गोळीचे शिकार बनलेले हिराजी गोमाजी पाटील यांचे कर्जत तालुक्यातील मानिवली गावातील घर देखील स्मारक होण्याची मागणी सरकार अद्याप पूर्ण करू शकले नाही. हुतात्मा भाई कोतवाल स्मारक आणि हिराजी पाटील स्मारक कधी पूर्ण होणार किंवा शासन जाहीर करणार आहे की नाही असा प्रश्न त्यांच्या बलिदानाला ८०वर्षे पूर्ण होत असतानादेखील कायम आहे.

# अधिक मुले 'पिकवा'

१९६० च्या दशकात भारतात सतत दुष्काळ पडत होते. धान्याची टंचाई असे. धान्य आयात करण्याइतका पैसा देशाकडे नव्हता. त्या काळात लालबहादूर शास्त्री यांनी देशातील लोकांना दर आठवड्यात सोमवारी उपास करण्याचे आवाहन केले होते. शास्त्रींबद्दल लोकांना आदर होता. त्यामुळे अनेक लोक उपास करीत असत. पुढे इंदिरा गांधींच्या काळात हरित क्रांती झाली. त्या सर्व काळातील एक घोषणा होती अधिक धान्य पिकवा. शेतकऱ्यांनी अधिकाधिक धान्य पिकवणे हे देशाच्या भल्याचे आहे असा त्या घोषणेचा अर्थ होता. अधिक उत्पादन घेतले की, शेतकऱ्यालाही आपोआप फायदा होईलच असे त्यामागचे गृहितक होते. प्रत्यक्षात शेती तितकी किफायतशीर कधीच नव्हती. पिकवलेल्या धान्याला योग्य भाव मिळत नव्हता. म्हणून तर शेतमालाला रास्त भाव ही घोषणा पुढे आली. १९८० च्या दशकात शरद जोशींच्या आंदोलनाला मोठा पाठिंबा मिळाला. अधिक धान्य पिकवा हा संदेश आपोआप मागे पडला. आज टोमॅटो, कांदे, ऊस यांचे अतिरिक्त उत्पादन झाले की त्याचे भाव पडतात. सोयाबीनने तर यंदा शेतकऱ्यांना मोठा फटका दिलाय. अधिक पीक म्हणजे आपोआप अधिक उत्पन्न वा अधिक नफा हे समीकरण योग्य नाही हे सर्वांना कळून चुकले आहे. या सर्वांची आता आठवण होण्याचे कारण म्हणजे सरसंघचालक मोहन भागवत यांनी सर्व जोडप्यांनी किमान तीन मुले जन्माला घालायला हवीत असा व्यक्त केलेला विचार. आपल्या देशाचा जननदर २.१ पेक्षाही खाली आला असून ही चिंतेची बाब आहे असे भागवतांना वाटते. जननदर म्हणजे लोकसंख्येत पडणारी निव्वळ भर. हल्ली तरुण कुटुंबांमध्ये एकच मूल जन्माला घालण्याकडे लोकांचा कल आहे. त्यामुळे हा जननदर खाली येत चालला असून पुढच्या काळात संतती होणे चालू ठेवण्यासाठी अडचणी येऊ शकतात. त्यामुळे कुटुंबांमध्ये किमान तीन मुले असावीत, जेणेकरून भावी पिढ्यांमध्ये स्त्री-पुरुषांचे प्रमाण स्थिर राहून संतती जन्माला येण्याचे चक्रही कायम राहील असा यामागचा दावा आहे.

## मुस्लिमांविरुध्दची बोंब

भागवत हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख आहेत. संघाचा केंद्र व राज्यातील सत्तेवर अप्रत्यक्षपणे कबजा आहे. भागवत आज जे बोलत आहेत ते उद्या धोरण वा कायदा म्हणून अमलात येऊ शकते. सबब त्याची दखल घेणे आवश्यक आहे. भागवतांनी थेट म्हटले नसले तरी त्यांचा थेट रोख हा हिंदू लोकसंख्येचे प्रमाण घटत असण्यावर आहे. मुस्लिमांची संख्या वाढत असल्याबद्दल भागवतांचे परिवारवाले सतत बोंब ठोकत असतात. ही बाब खरी नसल्याचे अनेक जाणकारांनी सिध्द करून दाखवले आहे. तरीही रेटून खोटे बोलणे चालूच आसते. लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात खुद्द नरेंद्र मोदींनी मुस्लिमांच्या कथित जादा लोकसंख्येचा अतिशय खालच्या पातळीवर जाऊन उल्लेख केला होता. राहुल गांधींची काँग्रेस सत्तेत आली तर हिंदू बायकांची मंगळसूत्रे काढून घेऊन जादा मुले जन्माला घालणाऱ्यांना - म्हणजे मुस्लिमांना- दिली जातील असा घाणेरडा प्रचार मोदींनी केला होता. म्हणजे मोदींच्या लेखी अधिक मुले जन्माला घालणे हे देशद्रोही किंवा दहशतवादाचे कृत्य होते. पण आता खुद्द भागवतच अधिक मुले जन्माला घालण्याचा विचार करावा असे हिंदूंना सुचवत आहेत. आपली लोकसंख्या कमी झाली तर आपल्या धर्माची संस्कृती नष्ट होईल अशी भीतीही ते दाखवत आहेत. थोडक्यात देश व धर्म संकटात असल्याने त्याच्या रक्षणासाठी हिंदूंनी अधिक मुले जन्माला घालावी असे भागवतांचे म्हणणे आहे. अधिक धान्य पिकवा याप्रमाणे अधिक मुले पिकवा किंवा जन्माला घाला असा यातला संदेश असून हे सर्व लोकांनी देशासाठी करायचे आहे असे त्यातले आवाहन आहे. हे पाहता पुढे जाऊन या तिनातले एक मूल रा.स्व. संघाला द्यायचे आहे व आवश्यक पडला तर त्यासाठी आम्ही कायदाही करू असे भागवतांनी सांगितले नाही हे नशीबच म्हणावे लागेल.

## घातक संदेश

गेल्या अनेक वर्षांपासून लोकसंख्येचा स्फोट ही आपल्या देशापुढची मुख्य समस्या आहे. देशातील गरिबीचे हे एक प्रमुख कारण आहे हे सर्वांना दिसते आहे. परिणामी, आज अगदी निरक्षर व मागास समाजातील कुटुंबांनीही अधिक मुले म्हणजे अधिक गरिबी हे पक्के समजले आहे. एका मुलाचे शिक्षण, आरोग्य यांचा खर्च करता करताच आईबापांच्या कमरेचे टाके ढिले होत आहेत. त्यामुळे लोक स्वतःहूनच एका मुलानंतर कुटुंबनियोजन करू लागले आहेत. मुलगा व मुलगी हा फरक झपाट्याने संपत चालला आहे. त्याचाही सुपरिणाम दिसून येऊ लागला आहे. यामुळे २०५० च्या आसपास आपल्या देशाचा जननदर दीडपेक्षाही खाली येईल असा अंदाज आहे. याचा अर्थ आज चार जोडप्यांना मिळून तेव्हा केवळ सहा मुले होतील. म्हणजे एका पिढीत दोन मुले किंवा नवीन जन्माला येणारी माणसे कमी होतील. त्याही पुढच्या पिढीत कदाचित सहा जोडप्यांना मिळून केवळ एकच मूल होईल. याचे अनेक परिणाम संभवतात. आज भारतात तरुणांची संख्या जगात सर्वाधिक आहे. २०५० नंतर नवीन जन्मांचे प्रमाण घटल्याने एकूण अर्थव्यवस्थेतील म्हाताऱ्यांची संख्या अधिक होऊ शकेल. पण या सर्व २५ वर्षांनंतरच्या बाबी आहेत. आज देशापुढचे प्रश्न भयंकर जटील व उग्र आहेत. ते सोडवण्यासाठी लोकसंख्या नियंत्रणात असणे हेच आवश्यक आहे. युरोपात स्वीडनसारखे कमी कमी लोकसंख्येचे देश आहेत. तेथे अधिक मुले जन्माला घालण्यासाठी पैशांची मदत केली जाते. पण हे देश अत्यंत श्रीमंत आहेत. भारताशी त्यांची तुलना होऊ शकत नाही. भागवतांना हिंदू संस्कृतीचे काय होणार याची खरी चिंता आहे. पण लोकांची पोटे भरण्यासाठी शेतकरी शेती करीत राहू शकत नाही. त्यानुसार स्वतःच्या आयुष्याची राखरांगोळी करून निव्वळ हिंदू भागवतांची हिंदू संस्कृती जगवण्यासाठी लोक अधिक मुले वाढवू शकणार नाहीत. असले संदेश देणे हे भारताच्या आणि पर्यायाने हिंदूंच्याही मुळावर उठणारे आहे.

विचार

# उत्तर प्रदेशमध्ये योगींची करामत

**ताज्या पोटनिवडणुकांमध्ये उत्तर प्रदेशमध्ये योगी आदित्यनाथ यांनी करून अखिलेश यादव यांना जमिनीवर आणले. लोकसभा निवडणुकीत यश डोक्यात गेल्याने महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे जे झाले, तेच उत्तर प्रदेशमध्ये अखिलेश यांचे झाले होते. भाजपच्या कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास परत मिळवण्यासाठी आणि दीड वर्षात होणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीसाठी हा निकाल उपयोगी पडणार आहे.**

महाराष्ट्रात लोकसभेच्या निवडणुकीत महाविकास आघाडीने महायुतीला धोबीपछाड दिली. तशीच धोबीपछाड या आघाडीने उत्तर प्रदेशमध्ये भाजप आणि त्याच्या मित्रपक्षांना दिली. मात्र तशीच परतफेड योगी आदित्यनाथ यांनी करून अखिलेश यादव यांना जमिनीवर आणले. विधानसभेच्या निवडणुकीपूर्वी यश डोक्यात गेल्याने महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे झाले, तेच उत्तर प्रदेशमध्ये अखिलेश यांचे झाले. देशभर निवडणुकीतील प्रचाराचे चलनी नाणे झाले असताना योगींनी उत्तर प्रदेशवरील पकड ढिली होऊ दिली नाही, हे उत्तर प्रदेशमधील पोटनिवडणुकांच्या निकालावरून दिसते. नऊ जागांच्या या निकालामुळे सत्ता समीकरणात काहीही फरक पडणार नसला, तरी भाजपच्या कार्यकर्त्यांचा लोकसभेच्या निवडणुकीनंतर कमी झालेला आत्मविश्वास परत मिळवून देण्यासाठी आणि दीड वर्षात होणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीसाठी हा निकाल उपयोगी पडणार आहे. या वेळी उत्तर प्रदेशमध्ये नऊ जागांवर होणाऱ्या पोटनिवडणुका योगी यांच्यासाठी जीवन-मरणाचा प्रश्न बनल्या होत्या. समाजवादी पक्षाचे बालेकिल्ले उद्ध्वस्त करताना अखिलेश यांना मोठे धक्के दिले. साठ टक्क्यांहून अधिक मुस्लिम असलेल्या मतदारसंघात भाजपचा उमेदवार सव्वा लाखपेक्षा अधिक मतांनी जिंकतो, हा मोठा संदेश आहे. लोकसभा निवडणुकीत भाजप आणि योगींना ज्या प्रकारच्या पराभवाला सामोरे जावे लागले होते, त्यातून बाहेर पडण्यास पोटनिवडणुकांचे निकाल पक्षाला मदत करू शकतील. योगींनी लोकसभा निवडणुकीनंतर लगेचच पोटनिवडणुकीत सर्व जागा जिंकण्याचा निर्धार केला होता. तो त्यांनी प्रत्यक्षात आणून दाखवला.

भारतीय जनता पक्षातील कथित अंतर्गत कलहाचा परिणाम या निवडणुकांमध्ये दिसून आला नाही. सर्वांनी संघटित होऊन जोमाने प्रचार केला. निवडणुकीच्या शेवटच्या टप्प्यात योगी यांनी पाच दिवसांमध्ये १५ सभा घेतल्या. यावरून याचा अंदाज लावता येतो. योगी सरकारने नऊ जागांवर ३० मंत्र्यांची टीम तयार केली होती. उपमुख्यमंत्री केशवप्रसाद मौर्य यांनीही सर्व नऊ जागांवर प्रत्येकी एका निवडणूक सभेला संबोधित केले. त्यांचा संपूर्ण जोर फुलपूर आणि माळवण या जागांवर होता. उपमुख्यमंत्री ब्रजेश पाठक यांनीही पोटनिवडणुकीत नऊ जागांवर प्रत्येकी एक सभा घेतली. दुसरीकडे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या वेळी पूर्ण ताकदीने भाजप उमेदवारांच्या प्रचारात उतरला होता. लोकसभा निवडणुकीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या गैरहजेरीमुळे भाजपचे नुकसान झाले होते. योगी आदित्यनाथ यांच्या 'बटेंगे ते कटेंगे' या घोषणेची उत्तर प्रदेशपेक्षा महाराष्ट्रात जोरदार चर्चा झाली; परंतु तिथल्या पोटनिवडणुकीत या घोषणेची अजिबात चर्चा नव्हती. असे असताना समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांनी या घोषणेला जीवदान दिले आणि त्यांच्या पक्षाने या घोषणाबाजीला थट्टा मानून खिल्ली उडवली. हे केवळ आपल्या मूळ मतदारांना खूश करण्यासाठी केले गेले; परंतु त्याचा उलटा परिणाम झाला. दुसरीकडे, योगी आदित्यनाथ यांनी कायदा आणि सुव्यवस्था तसेच बेरोजगारीवर लक्ष केंद्रित केले. योगी आदित्यनाथ सर्व टीकेला न जुमानता बुलडोझर चालवून न्याय मिळवून देण्यावर ठाम राहिले. त्यांची शैली लोकांना आवडते.



अजय तिवारी

लोकसभा निवडणुकीत अखिलेश यांचा 'पीडीए'चा फॉर्म्युला कामी आल्याचे बोलले जात होते. त्यामुळे ही लढतही अखिलेश यांच्या या फॉर्म्युल्यावर होती. भाजपच्या 'ओबीसी फर्स्ट' फॉर्म्युल्यावर ते तुटून पडताना दिसत होते. पोटनिवडणुकीत 'पीडीए'चा फॉर्म्युला यशस्वी झाला असता, तर २०२७ पर्यंत तोच पुढे नेला असता; पण आता भाजप आपला 'ओबीसी फर्स्ट' फॉर्म्युला पुढे नेणार आहे. या विधानसभा पोटनिवडणुकीत नऊ जागांवर ९० उमेदवारांमध्ये स्पर्धा होती. सर्व नऊ जागांवर भाजप-सप आणि बसप यांच्यात तिरंगी लढत झाली; मात्र थेट लढत भाजप आणि सपमध्येच राहिली. २०२२ च्या विधानसभा निवडणुकीत या नऊ जागांपैकी समाजवादी पक्षाकडे चार जागा होत्या तर 'एनडीए'कडे पाच जागा होत्या. त्यात भाजपकडे तीन तर मित्रपक्षांना दोन जागा होत्या. या पोटनिवडणुकांमध्ये अखिलेश यांनी मुस्लिम कार्ड खेळले तर भाजपने ओबीसींवर डाव लावला. भाजपने सर्वाधिक पाच ओबीसी, एक दलित आणि तीन सवर्ण दिले. भाजपने कोणत्याही मुस्लिम व्यक्तीला तिकीट दिले नव्हते, तर समाजवादी पक्षाने सर्वाधिक चार मुस्लिम उमेदवार उभे केले आहेत. याशिवाय तीन ओबीसी उमेदवार, दोन दलित उमेदवार दिले; परंतु एकाही सवर्णाला तिकीट दिले नाही. यामुळे समाजवादी पक्ष मुस्लिमसमर्थक असल्याचा संदेश गेला. ओबीसी जातींच्या जनगणनेबाबत जिथे विरोधक भाजपला कोंडीत पकडत आहेत, तिथे भाजपने ओबीसींच्या मुद्यावरच बाजी मारली.

उत्तर प्रदेशमधील लोकसभा निवडणुकीत विरोधी पक्षांमध्ये विशेषत: काँग्रेस आणि समाजवादी पक्षांमध्ये ज्या प्रकारची एकजूट दिसली, ती या वेळी नव्हती. पोटनिवडणूक आपण एकट्याच्याच जीवावर जिंकू, असा विश्वास अखिलेश यांना होता. उत्तर प्रदेशमध्ये काँग्रेसला अधिक संधी दिल्यास एक दिवस तो पक्ष आपल्याला खाऊन टाकेल, असे अखिलेश यांना वाटत असावे. उद्याची चिंता करून अखिलेश यांनी वर्तमानही खराब केले. लोकसभा निवडणुकीत रायबरेली आणि अमेठी आणि इतर लोकसभा जागांवर काँग्रेसला मिळालेली बंपर मते ही केवळ समाजवादी पक्षाच्या पाठिंब्यामुळे मिळाली नसल्याचा पुरावा आहे. काँग्रेसनेही या लढाईत रहावे अशी जनतेची इच्छा होती. उत्तर प्रदेशमध्ये अनेकजण काँग्रेसकडे भाजपला पर्याय म्हणून पाहतात. समाजवादी पक्षाने काँग्रेसला बरोबर घेतले असते, तर वेगळे चित्र दिसले असते. भारतीय जनता पक्षाने 'आरएलडी'ला सोबत घेऊन मोठ्या भावाची भूमिका निभावली; पण अखिलेश यांनी मनाचा असा मोठेपणा दाखवला नाही. कुंडरकीच्या जागेवर तर भाजपने आपला ३१ वर्ष जुना विक्रम मोडला. भाजपने ही जागा १९९३ मध्ये जिंकली होती. खरे तर मुरादाबाद जिल्ह्यात येणाऱ्या या जागेवर ६० टक्क्यांहून अधिक मुस्लिम मतदार आहेत. या जागेवर भाजपचे उमेदवार रामवीर सिंह ठाकूर आणि समाजवादी पक्षाचे उमेदवार हाजी रिझवान यांच्यात चुरशीची लढत व्हायला हवी होती; मात्र आश्चर्याची बाब म्हणजे या समाजवादी पक्षाच्या उमेदवाराने मोठ्या फरकाने ही जागा गमावली. ही जागा समाजवादी पक्षाचा बालेकिल्ला मानली जात होती.

भाजप सरकारमध्ये आठ वर्षांपासून सक्रिय कार्यकर्ता असलेले आणि जनतेला सर्वतोपरी मदत करणारे भाजपचे रामवीर सिंह ठाकूर यांना मुस्लिम समाजातील लोकांचा पाठिंबा मिळाला. त्यांचे कुटुंब मुस्लिमांमध्ये खूप लोकप्रिय होते. यापूर्वी मुस्लिम समाजातील नेत्यांनी भाजपच्या तिकिटावर निवडणूक लढवली; परंतु त्यांना या समाजाने नाकारले. या मतदारसंघात मुस्लिम मतांची विभागणी झाली. एकूण १२ उमेदवार होते. रामवीर सिंह वगळता सर्व मुस्लिम होते; परंतु मुस्लिम जनतेने त्यांच्यापैकी कोणालाच नेता म्हणून स्वीकारले नाही. या मतदारसंघामध्ये मुस्लिम जनताच अल्लाची शपथ घेऊन भाजपला मत देण्याचे वचन घेत होती. तुर्किक मुस्लिम विरुद्ध राजपूत मुस्लिम मतांचा उपयोग करण्यासाठी भाजपने त्यांच्या उमेदवारीचा डाव खेळला होता. येथिल बासित अली हा नेता मुस्लिम राजपूत आहे. त्याने ठाकूर रामवीर सिंह यांना आपला भाऊ संबोधून मुस्लिम मते मिळवली. कुंडरकीमध्ये सुमारे ४० हजार तुर्किक मुस्लिम तर सुमारे एक लाख १० हजार इतर मुस्लिम जाती आहेत. मुरादाबादमध्ये भाजपच्या एका कार्यकर्त्याच्या मृत्यूनंतर मोठ्या मशिदीच्या इमामने अंत्यसंस्कार करण्यास नकार दिला. कारण मृताचे कुटुंब भाजपसमर्थक होते.

एवढेच नाही तर, आजूबाजूच्या लोकांनीही या कुटुंबावर सामाजिक बहिष्कार टाकला होता. मृताच्या मुलाने जिल्हाधिकारी कार्यालय गाठून तक्रार दिली होती. मृताच्या मुलाच्या तक्रारीवरून इमामसह पाचजणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणात समाजवादी पक्षाच्या नेत्यांवर या कुटुंबाला धमकावल्याचा आरोपही करण्यात आला होता. याचा उलट परिणाम झाला आणि समाजवादी पक्षाच्या विरोधात अनेक लोकांचा मोर्चा निघाला. समाजवादी पक्षाने कुत्र्याच्या गळ्यात पट्टा बांधला, तरी कुंडरकी जागा जिंकू, अशी घोषणा केली होती. रामवीर सिंह यांनी हा मुद्दा उपस्थित केल्याचा फायदा भाजपला झाला. अशा प्रकारे भाजपने ताज्या पोटनिवडणुकीमध्ये उत्तर प्रदेशमध्ये केवळ लक्षवेधी जागाच जिंकल्या नाहीत, तर गमावलेली प्रतिष्ठाही कमावली आहे.

आजकाल

# त्यांना हलक्यात घेऊ नका !

गेली अनेक वर्ष जगात अमेरिकेची दादागिरी सुरू होतीच. डोनाल्ड ट्रम्प यांच्या राजवटीत दादागिरीचा ''स्केअर'' नाहीतर ''क्यूब'' अनुभवास येणार आहे अशी चिन्हे आहेत.

ब्रिक्स हा भारत, चीन, रशिया या त्रिकूटाने स्थापन केलेला काही देशांचा गट आहे. त्यात अनेक विकसनशील देश सामील होऊ लागले आहेत. त्यामुळे साहजिकच आंतरराष्ट्रीय पातळीवर या गटाचे वजन वाढू लागले आहे. डोनाल्ड ट्रम्प यांना त्याची कल्पना नक्कीच असावी.

कशात काही नसताना डोनाल्ड ट्रम्प यांनी आरोप केला आहे की ब्रिक्स समूह अमेरिकन डॉलरला पर्याय म्हणून स्वतःचे आंतरराष्ट्रीय चलन लॉन्च करत आहे. तसे केल्यास या समूहातील राष्ट्रांमधून अमेरिकेत येणाऱ्या आयातीवर शंभर टक्के आयात कर लावला जाईल अशी धमकी ट्रम्प यांनी दिली आहे.



संजीव चांदोरकर

काही तथ्ये

जगाच्या एकूण ठोकळ उत्पादनात मध्ये अमेरिकेचा वाटा: २५ टक्के

जगातील एकूण लष्करी खर्चात अमेरिकेचा वाटा ४० टक्के. जगभर विखुरलेले अमेरिकेचे छोटे मोठे २०० लष्करी नाविक तळ आहेत.

जगातील एकूण भांडवल बाजारमूल्यात मार्केट कॅपिटललायझेशन अमेरिकेचा वाटा : ५० टक्के आहे.

वॉल स्ट्रीट अजूनही आंतरराष्ट्रीय भांडवल बाजाराची राजधानी आहे.

दोन तृतियांश जागतिक व्यापार अजूनही डॉलरमध्ये होतो.

सर्व देशांच्या तुलनेमध्ये अमेरिकन डॉलर अजूनही सर्वात मजबूत चलन मानले जाते. आंतरराष्ट्रीय पातळीवर अनिश्चिततेचे ढग गोळा झाल्यानंतर आंतरराष्ट्रीय गुंतवणूकदार अमेरिकन डॉलरमध्ये आसरा घेतात.

अनेक विकसित आणि विकसनशील देशांमधील केंद्रीय बँका आपले व्याजदर अमेरिकन केंद्रीय बँकेच्या व्याजदरानुसार ठरवतात.

अनेक कटिंग एज टेक्नॉलॉजी, औषध निर्माण संरक्षण सामग्रीमध्ये अमेरिकन कंपन्या अग्रेसर आहेत.

अनेक आंतरराष्ट्रीय संस्था जागतिक बँक, नाणेनिधी, जागतिक व्यापार संघटना अमेरिकेच्या शब्दाबाहेर नाहीत. अनेक विकसित आणि विकसनशील देशांमध्ये अमेरिकेची सॉफ्ट पॉवर काम करत असते.

हे सर्व खरे, अर्ध खरे आहे. पण सगळे एखाद्या काळ्या घट्ट शिळेसारखे अपरिवर्तनीय देखील नाही.

गोष्टी झपाट्याने बदलत आहेत. त्याचे नेतृत्व चीन करत आहे. त्याला रशियाची साथ आहे. भारत तळ्यात मळ्यात करत आहे.

ब्रिक स्वतःचे चलन लाँच करेल की नाही ते भविष्यातच ठरेल. पण अनेक दशकांच्या अमेरिकन साम्राज्याला प्रति आव्हान देण्याची कुवत ब्रिक्स समूहामध्ये नक्कीच आहे.

अमेरिकेची अर्थव्यवस्था, अमेरिकेतील अर्थसंकल्प, अमेरिकेच्या डोक्यावरील कर्ज, अमेरिकेची व्यापारातील तूट, अमेरिकेतील भांडवली बाजार, अमेरिकेची तंत्रज्ञानातील आघाडी..हे सगळे दाखवले जातात तेवढे मजबूत नाहीत हे नक्की.

त्यांच्यातील कमकुवतपणा जेवढा उघडा पडेल त्या प्रमाणात चीन आणि रशिया प्रतिहल्ला करतील. आणि त्या प्रमाणात डोनाल्ड ट्रम्प चवताळतील .

ट्रम्प प्रत्यक्षात ब्रिक्ससाठी आयात कर वाढवतील की नाही हा दुय्यम मुद्दा आहे. ट्रम्प काहीही करू शकतात हा प्राथमिक मुद्दा आहे.

लोकांचा पाठिंबा, दोन्ही सदने त्यांच्या पक्षाकडे, सुप्रिम कोर्टात त्यांचे वकील. ट्रम्प काहीही करू शकतात.

त्यांना हलक्यात घेऊ नका. माथेफिरूंचे युग आहे.

लोकसंसद

## बांधकाम क्षेत्रातील धुळीचे साम्राज्य

मुंबईतील हवेचे प्रदूषण नित्याचीच बाब होऊ लागली आहे. यावर मात करण्यासाठी महापालिकेने धूळ मुक्त मुंबईसाठी बांधकाम ठिकाणी २७ नियम असलेली नियमावली २३ ऑक्टोबर २०२३ रोजी जारी केली होती. तसेच रस्ते धुणे, स्वच्छता अभियान राबविणे, इमारत बांधकामांच्या ठिकाणी डेब्रिज, माती उचलताना, इमारत बांधकाम करताना होणारे प्रदूषण रोखणे व त्यासाठी इमारतीच्या चारही बाजूला हिरवा कपडा लावणे, पत्रे लावणे, इमारत परिसरात , रस्त्यावर पाणी मारणे, धूळ खाली बसविणे आदी उपाययोजना करण्यास सुरुवात करण्यात आली होती. महत्त्वाचे म्हणजे मुंबईतील हवेचे प्रदूषण कमी करण्यासाठी मागील ३ डिसेंबरपासून बरोबर वर्षभरापूर्वी 'संपूर्ण स्वच्छता (डीप क्लिनिंग)' मोहीम मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत सुरू झाली होती. याद्वारे प्रत्येक आठवड्याला विभागाविभागातील रस्ते धुतले जात होते. सध्या ती मोहिम सुरु आहे की नाही याबाबत काही कळलेले नाही कारण आचारसंहिता लागू झाल्यापासून त्या मोहिमेबाबत महापालिका प्रशासनाकडून काहीही खुलासा झालेला दिसत नाही. तर आजही इमारत बांधकामांच्या ठिकाणी नियमांचे उल्लंघन करून इमारत बांधकामे सर्रासपणे सुरू असल्याचे दिसून येते. बांधकाम परिसरात, रस्त्यावर धुळीचे साम्राज्य दिसते. त्या ठिकाणी पाणी फवारणीही केली जात नाही. त्यामुळे हवा प्रदूषणाचे प्रमाण वाढले आहे. तरी संबंधित यंत्रणांनी या समस्येची त्वरित दखल घेऊन योग्य ती कारवाई करावी.

**- दीपक काशिराम गुंडये,** वरळी.

# मराठी साहित्यिक दिनविशेष

**४ डिसेंबर**

**१८९८ :-** दीनमित्रकार मुकुंदराव पाटील यांचा जन्म. सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते मुकुंदरावांनी १९१० साली दीनमित्रचे पुर्नरुज्जीवन केले. सत्यशोधक विचारांचा प्रसार करणाऱ्या या पत्राला कर्मठ ब्राह्मणांनी जोरदार विरोध केला. सत्यशोधक समाजाला दख्खन व विदर्भात पक्का ग्रामीण पाया मिळवून देण्यात या वृत्तपत्राची खूप महत्त्वाची कामगिरी. ग्रामीण भागातून हे वृत्तपत्र होत असल्यामुळे मुकुंदराव पाटील हे भारतातील पहिले ग्रामीण पत्रकार मानले जातात. **१८९८ :-** 'काव्यशेखर' या टोपणनावाने कविता लिहिणारे भास्कर काशीनाथ चांदूरकर यांचा जन्म. 'पुष्पराज' हा त्यांचा संग्रह. प्रेमपुर्नजीवन' ही विधवांच्या दुःस्थितीचे वर्णन करणारी कादंबरी त्यांनी लिहिली होती. **१९२० :-** लेखक, रसायनशास्त्राचे प्राध्यापक मुकूंद महादेव थत्ते यांचा जन्म. त्यांनी रसायनशास्त्रावर सुमारे पंचवीस एक पाठ्यपुस्तके लिहिलीत. त्यात उच्च माध्यामिक 'रसायनशास्त्र' हे १२वी साठी तर 'माध्यामिक रसायनशास्त्र' हे ८ वी पुस्तके लिहिली आहेत. **१९२२ :-** स्वातंत्र्यसेनानी, गोवा मुक्ती संग्राम संयुक्त महाराष्ट्र आदी आंदोलनात सहभागी झालेले लेखक, आमदार जी. डी. यांचा जन्म. ह्यांनी १९४७ च्या 'चलेजाव' चळवळीच्या पार्श्वभूमीवर पेटलेले पारतंत्र्य' व 'धुमसते स्वातंत्र्य' हा ग्रंथ लिहिला. **१९२५ :-** ग्रंथकार, आत्मकथनकार सीताराम गणेश देवधर यांचे निधन. आगरकरांच्या 'सुधारक' चे संपादक असणाऱ्या देवधरांचे 'माझा जीवनवृत्तांत या आत्मकथनातून १९ व्या शतकातील महाराष्ट्रातील सामाजिक लढयाचे तपशीलवार चित्रण केले आहे. **१९३१ :-** कथा - कादंबरीकार लीला श्रीवास्तव यांचा जन्म 'जखमा', 'फाशी गेलेली उन्हें', 'एक लेखणी सुळेवर' या कथासंग्रहासह 'अंधाराचं दुःख', 'गटार आणि गंगाजल', 'दोघी', 'अंतहीन' अशा अनेक कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. **१९३२ :-** लेखक, पत्रकार कमलाकर दिनकर धारप यांचा जन्म. मुग्धा' हा कथासंग्रह, 'पांगळा', 'हॉटेल ध्रुव' ही कादंबरी, 'अमिताभ आख्यान' हे अनुवादीत आणि 'साहसी दुक्कल', 'खजिन्याचा शोध', जोरावरसिंग' ही बालकांसाठी पुस्तके त्यांनी लिहिली. **१९४२ :-** निबंधकार आणि इंदुप्रकाशचे संपादक रावबहादुर दामोदर गणेश पाध्ये यांचे निधन. लो. टिळकांवर चरित्रात्मक निबंध तसेच पत्नीच्या मृत्यूनंतर 'दुःखाश्रमाला' हे काव्य आणि 'ब्रिटिश राजव्यवस्थेची वाढ व तिचे स्वरुप', 'आजच्या राजकीय सद्य:स्थितीसंबंधी विचार' इ. पुस्तके लिहिली. **१९४२ :-** कवी, समीक्षक निशिकांत धोडोपंत मिरजकर यांचा जन्म. 'श्री नामदेव दर्शन', 'श्री नामदेव चरित्र आणि काव्य', 'नामदेवांची अभंगवाणी' ही संपादने, 'कवितेची रसतीर्थे हे समीक्षात्मक पुस्तक अशी साहित्य संपदा. **१९४३ :-**लेखक, विचारवंत समाजसेवक आणि सुवार्ता मासिकाचे माजी संपादक फा. फ्रांसिस दिब्रिटो याचा जन्मः त्यांच्या साहित्यसंपदेत परिवर्तनासाठी धर्म' (वैचारिक), 'तेजाची पाऊले', 'ख्रिस्ती सण आणि उत्सव', सृजनाचा 'मोहर'(ललित), 'ओॲसिसच्या शोधात' (प्रवासानुभव), 'ख्रिस्ताची गोष्ट', 'मदर तेरेसा' (चरित्र), 'मुलांचे बायबल' (धार्मिक), 'शृंगार, मैत्री आणि प्रीती' (सामाजिक), 'कृतघ्न' (नाटक), पर्वतावरील प्रवचन', 'संघर्षयात्रा', 'पोप दुसरे जॉन पॉल', 'तरंग', 'पथिकाची नामयात्रा', 'आनंदाचे अंतरंग', 'ही वाट स्वर्गाची', 'आशेचा उंबरठा ओलांडताना', 'सामर्थ्य आहे प्रार्थनेचे', 'येशूसह चाळीस दिवस' (अध्यात्म) ह्या पुस्तकांसह 'सुबोध बायबल', 'दोन खंड' ही स्वतंत्र ग्रंथसंपदा. याशिवाय विविध वृत्तपत्रातून स्तंभ लेखन त्यांनी केले आहे.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

४ डिसेंबर

१) श्री. महादेव राघव शेळके
वेश्वी, अलिबाग, ४-१२-१९५२
२) श्री. अमृतराव तुकाराम थोरात
वेश्वी, अलिबाग, ४-१२-१९५०
३) डॉ. किरण वासुदेव नाबर
वरसोली, ४-१२-१९६८

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८
**(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५
**(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

# चिपळूणमध्ये राजरोस खैरतस्करी

## कोळसा भट्ट्यांकडे वन विभागाची डोळेझाक

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**

**पाऊस गेल्यानंतर टेरवच्या जंगलात धगधगणाऱ्या अवैध कोळसा भट्ट्या, सावर्डे परिसरातील कात फॅक्टरींवर नाशिक वन विभागाच्या दक्षता पथकाने टाकलेल्या धाडी यावरून वारंवार अपयशी ठरणाऱ्या जिल्हा वन विभागाला आता पर्यावरणप्रेमींसह नागरिकांनी लक्ष्य करण्यास सुरुवात केली आहे. सोशल मीडियावरही त्याचे पडसाद उमटू लागले असून, केवळ वृक्षतोड आणि वाहतूक परवाना यामध्ये अडकलेल्या अधिकाऱ्यांमुळे जिल्ह्यातील वन विभागाचे कार्यालयच बंद करा, असा संतप्त सूर उमटत आहे.**



गेल्या ऑक्टोबर महिन्यात सावर्डेत दहशतविरोधी पथकाने धाड टाकून ६ जणांना ताब्यात घेतल्याने जिल्ह्यात खळबळ उडाली. कर्नाटक राज्यातून चोरट्या मार्गाने १० लाख रुपयांचे खैराचे लाकूड आणून ते सावर्डे येथील एका ठिकाणी बेकायदेशीररीत्या साठवून ठेवल्याप्रकरणी स्थानिकांसह इतर पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. यातील एका संशयित आरोपीचा संबंध इसिस या दहशतवादी संस्थेसोबत काम करणाऱ्या एका व्यक्तीशी असल्याचा संशय व्यक्त केला गेला. खैर झाडाच्या लाकडाच्या बेकायदेशीर विक्रीतून मिळालेला हा पैसा दहशतवादी कामासाठी वापरला जात असल्याची शक्यता असल्याने दहशतवादविरोधी पथकाने ही कारवाई केल्याचे सांगण्यात आले.

### शासनाचे नियम धाब्यावर

**संपूर्ण कोकणात कोळसा भट्ट्यांवर उच्च न्यायालयानेच बंदी घातली आहे. तरीही पावसाळा सोडला तर ठिकठिकाणी जंगलात कोळसा भट्ट्या धगधगतात. अर्थात, वन विभागाकडे स्थानिक ग्रामस्थ तक्रार करत असतानाही कारवाई मात्र केली जात नाही. त्यामुळे या कोळसा भट्ट्यांना वन विभागाच्या अधिकाऱ्यांचा आशीर्वाद असल्याचा आरोप खुलेआमपणे केला जात आहे. चार दिवसांपूर्वी टेरव ग्रामस्थांनी या कोळसा भट्टांचे फोटो आणि कारवाई करण्यासाठीचे निवेदन येथील वन विभागाला दिले आहे. कारवाई न केल्यास आंदोलनाचा इशाराही दिला आहे.**

### नाशिक विभागाकडून मालकांना समन्स

**नाशिकमध्ये उघडकीस आलेल्या खैर तस्करीचा तपास करताना त्याची पाळेमुळे चिपळूणच्या सावर्डेपर्यंत पसरल्याचे चौकशी पथकाच्या समोर आल्यानंतर नाशिक वन विभागाच्या दक्षता पथकाच्या १६ अधिकारी, कर्मचाऱ्यांनी सावर्डे परिसरात कात तयार करणाऱ्या ३ फॅक्टरींवर धाड टाकली. या धाडीत फॅक्टरीमध्ये मोठ्या प्रमाणात अवैध खैर साठा केल्याचे निदर्शनास आल्याने एका फॅक्टरीला सील ठोकले. त्याची वाहतूक पासेससह अन्य कागदपत्रे, टॅबसह लाखो रुपयांचा अवैध खैर साठा जप्त केला. तीनही ठिकाणी मालक उपस्थित नसल्याने नाशिक वन विभागाने या मालकांना समन्स बजावले आहे.**



# लोकसहभागातून बांधणार हजारो वनराई बंधारे

**। सिंधुदुर्ग । प्रतिनिधी ।**

जिल्ह्यात एप्रिल-मेदरम्यान उद्भवणारी संभाव्य पाणीटंचाई टाळण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाने जिल्ह्यात लोकसहभागातून ६२०० कच्चे व वनराई बंधारे बांधण्याची मोहीम हाती घेतली आहे. सर्व तालुक्यात बंधारे बांधण्याचे नियोजन पूर्ण झाले असून, प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली असल्याची माहिती जिल्हा जलसंधारण अधिकारी सुदेश राणे यांनी दिली.

जिल्ह्यात यावर्षी मोठ्या प्रमाणात पाऊस झाला आहे. अद्यापही जिल्ह्यातील नदी -नाल्यांच्या पाण्याचा प्रवाह प्रवाहित असल्याचे दिसून येत आहे. तसेच पावसाचे सावट कायम आहे. तरीही जिल्हा परिषद प्रशासनाच्यावतीने जिल्ह्यात कच्चे व वनराई बंधारे बांधण्याचे नियोजन केले आहेण. त्यानुसार यावर्षी ६२०० बंधारे बांधले जाणार असून, प्रत्येक तालुक्यांना बंधारे बांधण्याचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. गतवर्षी जिल्हा परिषद प्रशासनाने कच्चे व वनराई बंधार्याचे उद्दिष्ट ७४ टक्के पूर्ण केले होते. त्यामुळे जिल्ह्यात कोठेही तीव्र पाणीटंचाई जाणवलेली नाही. बंधारे बांधल्याचे फलित जिल्ह्यात दिसून आले. यावर्षी जिल्ह्यात संभाव्य पाणीटंचाईला सामोरे जाण्याची वेळ येऊ नये यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाने जिल्ह्यात ६२०० वनराई व कच्चे बंधारे बांधण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. बंधारे बांधण्याच्या मोहिमेला सुरुवात झाली असून, सर्व तालुक्याचे नियोजन पूर्ण झाले आहे. यावर्षी जिल्ह्यातील कणकवली तालुक्यात १०००, कुडाळ तालुक्यात १०००, दोडामार्ग ४००, वेंगुर्ला ५००, मालवण १०००, देवगड ९००, सावंतवाडी १०००, वैभववाडी ४०० असे एकूण ६२०० बंधारे बांधण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

# वादपूर्व, दाखल प्रकरणे निकाली लागणार

### लोक अदालतीच्या माध्यमातून प्रकरणाचा करणार निपटारा

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

दाखलपूर्व व आणि प्रलंबित खटल्याचा जलद गतीने निपटारा व्हावा, यासाठी रायगड जिल्ह्यात राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन १४ डिसेंबरला करण्यात आले आहे. ५२ हजारांहून अधिक प्रकरणांचा निपटारा या माध्यमातून होणार आहे. त्यामध्ये भूसंपादन, बँक, कामगार, वीजचोरी यासारख्या प्रकरणांचा समावेश असल्याचे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव तथा न्यायाधीश अमोल शिंदे यांनी सांगितले.

जानेवारी ते डिसेंबर २०२४ या वर्षात चार लोक न्यायालय भरविण्याच्या सूचना आहेत. आतापर्यंत तीन वेळा लोक न्यायालय भरविले असून, चौथे लोक न्यायालय १४ डिसेंबरमध्ये घेतले जाणार आहे. यापूर्वी झालेल्या राष्ट्रीय लोक न्यायालयात २३ हजार ५२९ प्रकरणे निकाली काढण्यात आले आहेत. २५ कोटी ५८ लाख ६७ हजार ३६ रुपयांची तडजोड रक्कम वसूल करण्यात आली आहे. अनेक प्रकरणे सामंजस्याने मिटविण्यात यश आले आहे. मोटार अपघात प्रकरणामध्ये २५ मोटार अपघात प्रकरणामध्ये तडजोड झाली आहे. दोन कोटी ३९ लाख ७६ हजार ७०० रुपयांची भरपाई मंजूर करण्यात आली आहे. लोक अदालतीमध्ये न्यायालयात येण्याची सक्ती न करता, व्हीडीओ कॉलचा वापर करून ही प्रकरणे मिटविण्यात आली असल्याचे सांगण्यात आले आहे. जिल्ह्यात १४ डिसेंबरला होणाऱ्या लोक अदालतीमध्ये वकील व नागरिकांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## नामदेव कदम यांचे निधन

**। नागोठणे । वार्ताहर ।**

नागोठण्याजवळील वाघळी येथील रहिवासी नामदेव लक्ष्मण कदम (७९) यांचे रविवार दि. २४ नोव्हेंबर रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. वाघळी येथील सामाजिक कार्यकर्ते महेंद्र कदम यांचे ते वडील तर तुकाराम कदम यांचे मोठे काका होत. नामदेव कदम यांच्या पार्थिवावर सोमवार दि.२५ नोव्हेंबर रोजी वाघळी येथील वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी लक्ष्मीबाई कदम, दादू व महेंद्र ही दोन विवाहित मुले, सुनिता अनंत साळुंखे व शांता निलेश जाधव या दोन विवाहित मुली यांच्यासह सुना, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी बुधवार दि. ४ डिसेंबर रोजी उध्दर-पाली येथे, तर उत्तरकार्य शुक्रवार दि. ६ डिसेंबर रोजी वाघळी येथील राहत्या घरी होणार आहेत.



# काजुवाडी गडावर चंपाषष्ठी उत्सव



**। खोपोली । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्राचे कुलदैवत खंडोबा देवाचा चंपाषष्ठी उत्सव काजुवाडीतील धाकटी जेजुरी दरवर्षी मोठ्या उत्साहात संपन्न होत होता. गेल्या चार वर्षांपासून चंपाषष्ठी उत्सवाला खंड पडला होता. परंतु, यंदा काजुवाडीतील सर्व ग्रामस्थांनी एकत्रित येत मल्हारभक्त पांडुरंग बुवा सुतार यांच्या मार्गदर्शनाखाली चंपाषष्ठी उत्सव सुरू केला, त्यामुळे खंडोबा भक्तांना चंपाषष्ठी उत्सव पर्वणी ठरणार आहे.

गेल्या चार वर्षांपासून चंपाषष्ठी सोहळा होत नसल्यामुळे खंडोबा भक्त आणि काजुवाडीतील ग्रामस्थांची हिरमोड होत होता. यंदा सर्व ग्रामस्थांनी एकत्रित येत चंपाषष्ठी उत्सव सोहळा सुरू केला आहे. सोमवार, दि.२ नोव्हेंबर रोजी सकाळी खंडोबा देवाला अभिषेक पूजा घालून उत्सवाला प्रारंभ झाला. दररोज खंडोबाची आरती सकाळी ९ वा. व सायं. ७ वा होणार आहे.

चंपाषष्ठीच्या शेवटच्या दिवशी शनिवार, दि. ७ डिसेंबर रोजी दुपारी १२ वा. तळी भंडारा, दुपारी १२.३० वा. महाआरती, दुपारी १ ते ३ वा. महाप्रसाद, दुपारी ३ ते रा.१० वा. पालखी सोहळा (काजुवाडी, भाजी मार्केट, खालची खोपोली, मार्गे वरची खोपोली), रात्री १० ते पहाटे ०५ वा. खंडोबाचे जागरण गोंधळ असा कार्यक्रम होणार आहे.

# जिल्ह्यात पशुगणनेला प्रारंभ

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

केंद्र शासनाच्या आदेशानुसार पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागामार्फत दर पाच वर्षांनी पशुगणना करण्यात येते. यानुसार जिल्ह्यात या मोहिमेला सुरुवात झाली असून २८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत सुरु राहणार आहे.

जिल्ह्यात १८३ प्रगणक व ४० पर्यवेक्षकांमार्फत ही गणना सुरु आहे. ग्रामीण भागात प्रमुख कृषीपूरक व्यवसाय म्हणून पशुधनास संबोधले जाते. जिल्ह्यातील पाळीव पशुधनाची जात-प्रजातीसह अन्य माहिती संकलित करण्यासाठी पशुगणना केली जाते. या मोहिमेला जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी कीर्तीकिरण पुजार यांनी शुभारंभ केला. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी परीक्षित यादव, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. रामचंद्र नरुटे, डॉ. रोहित रानभरे, डॉ. आदिती कसारकर, डॉ. सुचिता शिंदे, विलास लोकरे, निकिता पवार आदी उपस्थित होते.



२१ वी पशुगणना करण्याकरिता ग्रामीण भागात ३ हजार कुटुंबामागे एक प्रगणक आणि पाच प्रगणकांमागे एक पर्यवेक्षक तसेच शहरी भागात ४ हजार कुटुंबांमागे एक प्रगणक आणि १० प्रगणकामागे एक पर्यवेक्षक नियुक्ती करण्यात आलेली आहे. जिल्ह्यात ग्रामीण व शहरी भागासाठी १८३ प्रगणक व ४० पर्यवेक्षकांमार्फत ही गणना सुरु आहे. पशुपालन हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मुख्य आधारस्तंभ आहे. पशुसंवर्धन विभागाची ध्येय धोरणे ठरवणे. दूध, अंडी, मांस आदींच्या उत्पादनामुळे पोषण सुरक्षेसोबत ग्रामीण उपजीविकेलाही चालना मिळते.

संपूर्ण जिल्ह्यात पशुगणना केली जाणार आहे. ही मोहीम जवळपास तीन महिने राबवण्यात येणार आहे. प्रगणक घरोघरी जाऊन माहिती घेणार आहेत. पशुगणनेतील पशुधनाच्या संख्येनुसार विभागाची पुढील ध्येय धोरणे आणि पशुसंवर्धनविषयक योजना निश्चित करण्यात येणार असल्याने याकरिता पशुपानलकांनी अचूक माहिती पुरवून प्रगणकांना सहकार्य करण्याचे आवाहन जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी कीर्तीकिरण पुजार यांनी केले आहे. पशुपालन क्षेत्राचा शाश्वत विकास घडवण्यासाठी विविध योजनांच्या माध्यमातून पशुपालकांना प्रोत्साहन देते. पशुगणनेत पशुधनाच्या १६ जातींचा म्हणजेच पाळीव प्राणी, कुक्कुटपालन, भटक्या प्राण्यांची पशुगणना करण्यात येणार आहे.

## इसमाची ५५ लाख २९ हजारांची फसवणूक

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

तुकाराम दुधे यांची ५५ लाख २९ हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात फजल रेहमान गुलाब नाबी अन्सारी (रा. बाळापूर, अकोला) आणि महाजनको कंपनीचे इंजिनियर यांच्याविरोधात ३० नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

फजल अन्सारी याने त्याच्या मेसर्स साई अँश पाँड् ट्रान्सपोर्टिंग कंपनीला महाजनको पारस या औष्णिक ऊर्जा प्रकल्पामध्ये टेंडर मिळाले असून, टेंडरच्या अनुषंगाने कंपनीने एकूण एक कोटी ८५ लाख ३९ हजार २०७ इतकी रक्कम भरलेली आहे असे सांगितले. आणि तेवढ्या रकमेच्या महाजनकोच्या पावत्या दाखवून तुकाराम दुधे यांच्याकडून कंपनीमध्ये ३० टक्के भागीदार म्हणून ५५ लाख २९ हजार रुपये मे. साई अँश पाँड् ट्रान्सपोर्टिंग कंपनीच्या बँक खात्यावर स्वीकारली. त्यानंतर आरोपीने डिसेंबर २०२३ ते जानेवारी २०२४ या कालावधीमध्ये महाजनकोमधून ४१९ रुपये दराने राखाडी विकत घेऊन ती पुढे ५४० रुपये या दराने विक्री करून एकूण ९ हजार २४६ मेट्रिक टन राखाडी विकली आणि दुधे यांनी गुंतवलेल्या रकमेवरती कमाई करून आणि तसे करण्यासाठी महाजनको कंपनीचे इंजिनियर यांनी खोट्या पावत्या, इतर कागदपत्रे बनवून देऊन त्याद्वारे दुधे यांचा विश्वास संपादन केला आणि गुंतवलेली रक्कम ५५ लाख २९ हजार रुपये आणि त्या बदल्यात कोणत्याही मोबदला न देता तुकाराम दुधे (रा. भारत गॅसजवळ, पनवेल) यांची फसवणूक केली. या घटनेबाबतचा अधिक तपास पनवेल शहर पोलीस करीत आहेत.

## क्रीडा संकुलात प्रशासनाचा 'खेळ'

व्यासपीठ मिळाले. या संकुलाच्या माध्यमातून धावणे, पोहणे, क्रिकेट आदी खेळाडूंना संधी मिळू लागली. पोलीस भरतीच्या पार्श्वभूमीवरदेखील अनेक खेळाडू सराव करण्यासाठी येतात. परंतु, २०१९ पासून जिल्हा क्रीडा संकुलाचा वापर निवडणूक व २०२० मध्ये कोरोनाच्या काळात कोव्हीड सेंटर म्हणून करण्यात आला. त्यानंतर २०२४ पर्यंत झालेल्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीत मतमोजणीसाठी वापर करण्यात आला. नुकतीच विधानसभा मतमोजणी पार पडली. या निवडणुकीच्या निमित्ताने संकुलामध्ये वेगवेगळे फलक लावण्यात आले होते. परंतु, मतमोजणी झाल्यावर क्रीडा संकुल उपेक्षित झाल्याचे चित्र पहावयास मिळाले आहे. क्रीडा संकुलामध्ये सरावासाठी येणाऱ्या खेळाडूंची प्रचंड गैरसोय होत आहे. या परिसरात पाण्याच्या बाटल्या, खाद्य पदार्थांचे खोके, फलक अस्ताव्यस्त टाकून दिले आहेत. त्यामुळे क्रीडा संकुलाचा परिसर विद्रुप दिसत असून, खेळाडूंकडून प्रशासनाच्या नावाने प्रचंड संताप व्यक्त होत आहे.

डिसेंबरमध्ये क्रीडा संकुलामध्ये वेगवेगळे खेळ भरविले जातात. त्यामध्ये क्रिकेट हा खेळ मोठ्या प्रमाणात खेळला जातो. क्रीडा संकुलाच्या या विद्रुपीकरणामुळे खेळाडूंच्या आनंदावर विरजण पडण्याची शक्यता वर्तविली जात आहे. निवडणुकीत क्रीडा संकुलाचा वापर झाल्यावर ते आता दुर्लक्षित झाले आहे. गरज सरो आणि वैद्य मरो या निवडणूक विभागाच्या भूमिकेबाबत वेगवेगळ्या स्तरातून नाराजी व्यक्त होत आहे.

**क्रीडा संकुलाला दुरुस्ती नूतनीकरणाची प्रतीक्षा**

क्रीडा संकुलाच्या इमारतीची अवस्था बिकट झाली आहे. येथील कार्यालयाला गळती लागली आहे. स्वीमिंग पूलची इमारत जीर्ण झाली आहे. त्यामुळे ती भिंत पडण्याच्या अवस्थेत आहे. खिडक्यांना पत्रा लावून ठेवल्याने हॉलमध्ये आतील-बाहेरील हवा येणे जाणे बंद झाले आहे. त्याचा खेळाडूंना प्रचंड त्रास होत आहे. खिडक्या नव्याने तयार करण्याची गरज आहे. त्यामुळे या क्रीडा संकुलाला दुरुस्ती व नूतनीकरणाची प्रतीक्षा लागून राहिली आहे.

**२५ लाख रुपयांचे भाडे थकले**

कोरोना काळात कोव्हीड सेंटर म्हणून जिल्हा क्रीडा संकुलचा वापर करण्यात आला होता. जिल्हा परिषद आरोग्य विभागच्या कार्यालयाकडून २५ लाख रुपयांचे भाडे देणे बाकी होते. याबाबत तत्कालीन जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी बैठक घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना सूचना करीत दुरुस्ती करा अन्यथा निधी उपलब्ध करा, असे सांगितले होते. मात्र, त्यांची बदली झाल्यानंतर हे प्रकरण लाल फितीतच अडकून राहिले आहे. त्यामुळे २५ लाख रुपयांचे भाडे थकले असल्याची माहिती समोर येत आहे.

## मानकुळेतील पाणीप्रश्न पेटला

पाण्यासाठी रात्र जागून घालवावी लागत असल्याने महिलावर्गामध्ये प्रचंड संताप निर्माण झाला आहे. पाण्याचे नळ

## पान १ वरुन

गावापासून एक किलोमीटर अंतरावर दूर असल्याने महिलांना डोक्यावर हंडा घेऊन पाणी आणावे लागत आहे. प्रशासनाच्या दुर्लक्षपणामुळे महिलांना रात्रीच्यावेळी पाणी भरावे लागत आहे. त्यामुळे महिला सुरक्षेचा प्रश्नदेखील गंभीर होऊ लागला आहे.

मानकुळे येथे पाण्याच्या अनेक योजना राबविल्या आहेत. परंतु, आजही या गावांतील नागरिकांना पाण्यासाठी प्रतीक्षा करावी लागत आहे. मागील काही महिन्यांपूर्वी जलजीवन योजनेचे काम करण्यात आले आहे. पाईट टाकण्यात आले आहे. परंतु, घरांना पाणी अद्यापही मिळाले नसल्याची नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. मानकुळे येथील पाणीप्रश्न पेटला असून, येथील शेकडो महिला व ग्रामस्थांनी एकत्र येत मंगळवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर पाण्यासाठी हंडा मोर्चा काढला. हातात, डोक्यावर हंडा घेऊन पाण्यासाठी महिलांनी जिल्हाधिकारी कार्यालय गाठले. पावसाचा हंगाम संपून एकच महिना पूर्ण झाला असताना आता ही परिस्थिती आहे, तर मार्च ते मे महिन्याच्या कालावधीत कसा निभाव लागणार, असा सवाल उपस्थित केला जात आहे. याकडे जिल्हा प्रशासन लक्ष देईल का, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

## राज्यात गुटखाबंदी केवळ कागदावर

तरीही सर्रासपणे उरण, पनवेलमधील शहरी भागासह ग्रामीण भागातील टपऱ्या व दुकानांवरही सर्रास खुलेआम गुटखा विक्री जोरात सुरू आहे. या ठिकाणी दुप्पट, तीनपट वाढीव किमतीला गुटखा विक्री केली जाते. अन्न व औषध प्रशासन विभागापुढे गुटखा विक्री रोखणे आव्हान ठरत आहे. गुटखा विक्रेत्यांनी किराणा दुकान, पानपट्टी व शाळा-महाविद्यालयाच्या परिसरात दुकाने थाटली असून, सर्रास गुटखा विक्री केली जात आहे. गुटखा खाऊन रस्ते, शासकीय कार्यालय, चौक, बसस्थानक, वर्दळीच्या ठिकाणी थुंकून परिसर अस्वच्छ केला जातो.

**दुप्पट, तिप्पट किंमत**

टपऱ्या व दुकानदार गुटख्याची मागणी करताच विमल गुटख्याची पाच रुपये किमतीची पुडी १० रुपयाला, तर काही कंपन्यांच्या गुटख्याची सात रुपये किमतीची पुडी ३० रुपयांना विकत आहेत. इतर वेळेस घासाघीस करणारे ग्राहक गुटखा विकत घेताना मात्र कोणतीही तक्रार करताना दिसत नाही.

**परराज्यातून पुरवठा**

परराज्यातून चोरट्या मार्गाने गुटख्याची वाहतूक सुरू आहे. कर्नाटक, आंध्र प्रदेश त्याचप्रमाणे गुजरातहून आणलेल्या गुटख्याची महामार्गालगतच्या गोदामात साठवणूक करून रात्रीच टपऱ्या व दुकानदारांना विकला जातो. तर, ग्रामीण भागात विक्रेत्यांच्या सहाय्याने पाठविला जातो.

**पोलिसांचे सहकार्य?**

खुलेआम गुटखा विक्री करणाऱ्यांवर पोलिसांची कोणतीही दहशत नसल्याचे पहायला मिळत आहे. पोलिसांना या गुटखा विक्रीबाबत विचारले असता, गुटखा विक्रेत्यांवर कारवाई करणे आमचे काम नाही, ते अन्न व औषध प्रशासन विभागाचे आहे, असे सांगण्यात येते.पोलिसांच्या या भूमिकेमागे मोठे अर्थकारण असल्याचे सांगितले जाते.

## तरुणावर मद्यधुंद पर्यटकांचा हल्ला

यापूर्वीही पुणे पर्यटकांकडून खूप वेळा अशा प्रकारच्या वागण्याचे प्रकार घडले असून, याला आळा न बसल्यास यापुढे पुण्यातील पर्यटकांना म्हसळा-श्रीवर्धन तालुक्यात येण्यास बंदी घालणार, असा इशारा नागरिकांनी दिला आहे

## वृद्धाची हत्या करणारे जोडपे गजाआड

दोघांना उचलण्यात आले.त्यामध्ये एका महिलेचादेखील समावेश आहे. त्यांना ताब्यात घेऊन कसून चौकशी केली. पोलिसी दणका मिळाल्यावर दोघेही बोलके झाले. वयोवृध्दाच्या एकटेपणाचा फायदा घेत त्यांना लुबाडण्याच्या उद्देशाने लगट करीत आरोपी महिलेने विवाह करण्याचे आमिष दाखविले. त्यांच्या घरात राहून तिने विश्वास संपादन करून घरातील दागिने व पैसे घेऊन पसार झाली. त्यानंतर त्या महिलेने साथीदाराच्या मदतीने वयोवृद्धास ठार मारण्याचा कट आखला. २९ नोव्हेंबर रोजी रात्री जेवणामध्ये कीटनाशक देऊन बेशुद्ध करून कोणत्यातरी हत्याराने वार करून जखमी केले. उशीने तोंड व नाक दाबून ठार केले. घरातील साफसफाई करून मोबाईल, दागिने व पैसे घेऊन दोघेही पसार झाले. या गुन्ह्यातील आरोपी हर्षल कचर अंकुश याच्यासह महिलेविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. त्यांना श्रीवर्धन पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले असून, उपविभागीय पोलीस अधिकारी सविता गर्जे अधिक तपास करीत आहेत.

## धोकादायक इमारतीतून कारभार

उप अभियंता, दोन शाखा अभियंता, दोन कार्यालयीन कारकून, एक शिपाई असे कर्मचारी असून, साईडवर काम करणारे कर्मचारीदेखील या कार्यालयात हजेरीसाठी ये-जा करत असतात. तसेच वेगवेगळ्या साईडवर काम करणाऱ्या एजन्सीचे कर्मचारीदेखील या कार्यालयात येत असतात. त्यामुळे दुर्दैवाने काही घटना घडल्यास कर्मचारी मोठ्या संकटात येऊ शकतात. या इमारतीला महिन्याला पंधरा ते वीस हजार रूपये भाडे शासन देत आहे. मात्र, सुरक्षततेच्या दृष्टीने धोकादायक प्रथमदर्शी ही इमारत दिसत आहे. त्यामुळे कर्मचारी एक वेगळ्या दडपणाखाली काम करत असल्याचे समजले.

## शेतकरी नको, व्यापारी बनुया

किमतीत मिळत आहे. शेंगदाणा पेंड २५ ते ३५ रुपये किलो दरात मिळत होती. आता ५० ते ६० रुपये किलो दरात मिळत आहे. मत्स्य तरंगते खाद्य १० वर्षांपूर्वी २५ ते ३५ रुपये किलोने मिळत होते. त्यासाठी आता ५५ ते ६५ रुपये दर मोजावा लागत आहे. मत्स्यबीजाची किंमत वाढली, रोगराईचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे मत्स्यशेती तोट्यात जाऊ लागली आहे. भातशेती परवडत नाही म्हणून मत्स्यशेतीकडे वळलेल्या शेतकऱ्यांच्या पदरी निराशा येऊ लागली आहे.अलिबाग तालुक्यातील शेत तलावात तयार होणारा मासा हा अतिशय रुचकर असून, त्यातील तिलापिया जातीच्या माशात प्रोटीनचे प्रमाण जास्त असून, ओमेगा-३ हे फॅटी ॲसिड औषधी गुण असलेला हा मासा आहे. तालुक्यातील अनेक खाड्या आहेत, ज्या खाडीत खारे पाणी येते आणि त्याच परिसरात हजारो शेततलाव आहेत. या तलावातील पाणी हे निम खारे असल्यामुळे या तलावात वाढणारा कोणताही मासा अतिशय रुचकर लागत आहे. त्यामुळे अनेक पर्यटकांना या माशाची भुरळ पडू लागली असून, या माशांवर ताव मारण्यासाठी मुंबई, पुणे व इतर शहरांतून अनेक खवय्ये हे अलिबागला येत असतात. मत्स्य पालनाविषयी मार्गदर्शन हवे असल्यास प्रवीण परशुराम म्हात्रे, धामणपाडा -अंबेवाडी ९२७०१५००७६ यांच्याशी संपर्क साधा, असे यावेळी सांगण्यात आले.

## यंदा लग्नसराईची जोरात धामधूम

व्यवसायांना एक प्रकारे सुगीचे दिवस येतात. मंगल कार्यालये, कापड दुकाने, सोने-चांदीच्या पेढ्या गजबजून जातात. खरेदीची लगबग वाढून सगळीकडे उत्साहाचे वातावरण पसरते. मंगल कार्यालये आगाऊ नोंदणी करण्यासाठी अक्षरशः स्पर्धा दिसून येते. संपूर्ण लग्नसराईत एकही दिवस खाली जात नसल्याने नेमकी हीच संधी साधत, संबंधितांकडून मंगल कार्यालयांचे भाडेही वाढविले जाते. अनेकदा लहान मंगल कार्यालयेही मिळत नाही. अशीच काहीशी परिस्थिती लग्न सराईत निर्माण होत असते. त्यामुळे ही बाब लक्षात घेत, लग्न जुळलेल्या वधू-वराच्या कुटुंबाकडून आतापासूनच मंगल कार्यालये आरक्षित करण्यास सुरुवात केली असल्याचे दिसून येते. तसेच बँड, हॉल, वाजंत्री, फोटो ग्राफर यांच्या बुकिंगसाठी आतापासूनच वेग वाढू लागला आहे. लग्न सोहळ्यानिमित्त वधूसह तिच्या मैत्रिणी व इतर नातेवाईक महिला यांच्यामध्ये आपल्या हातावर आकर्षक अशी मेहंदी काढण्याकडे विशेष कल असतो. त्यामुळे मेहंदी काढण्यासाठी लागणाऱ्या कलाकारांनासुद्धा आतापासून मागणी येऊ लागली असल्याचे दिसून येते.

## माणगावमध्ये जबरी घरफोड्या

लाख किमतीचे सोने चांदीचे दागिने ८० हजार रोख रक्कम चोरीला गेली असल्याचे त्यांनी सांगितले आहे. तसेच त्यांच्यासमोर राहणारे हे शासकीय कर्मचारी असून, ते बॅचलर असल्याने त्यांनी आपल्या घरातून काय गेले, हे सांगणे टाळले आहे. मात्र, लाखोंचा ऐवज अज्ञात चोरट्यांनी बंद दरवाजांचे कडी कोयांडा तोडून लंपास केला आहे, अशी माहिती समोर यामध्ये प्रसिद्धी माध्यमासमोर अनेक सीसीटीव्ही फुटेज व व्हिडिओ समोर आले आहेत. पोलिसांनी याकडे गांभीर्याने लक्ष देऊन चोरट्यांना गजाआड करावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

निवडक

## बल्लाळ जोशी यांचा सन्मान

**कर्जत :** कर्जत वैजनाथ येथे सद्गुरू श्री वामनराव पै यांचे जीवनविद्या मिशन विद्यापीठ आहे. याठिकाणी सध्या आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून याठिकाणी काही महान अनुभूती यांना स्वतः संस्थेचे विश्वस्त प्रल्हाद पै यांच्या हस्ते गौरविले जात आहे. याठिकाणी नुकतेच नेरळ येथील माजी उपसरपंच, वृत्तपत्र विक्रेते बल्लाळ जोशी यांचा विशेष सन्मान करण्यात आला आहे. याप्रसंगी विवेक पोतदार यांचादेखील सन्मान करण्यात आला.

## विद्यार्थ्यांनी बांधला बंधारा

**माणगाव :** अभिनव ज्ञानमंदिर उसर खुर्द विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी जोपासत नदीवर वनराई बंधारा बांधला. अभिनव ज्ञान मंदिर उसर खुर्द विद्यालयाच्या वतीने प्रतिवर्षी वनराई बंधारा बांधण्यात येतो. या वनराई बंधाऱ्यामुळे लगतच्या हंगामी शेतीसाठी तसेच वन्य प्राणी व गाईगुरांसाठी मार्च महिन्यापर्यंत पाणी उपलब्ध राहणार आहे. त्याच पद्धतीने भूजल पातळी वाढण्यासाठी या वनराई बंधाऱ्याचा निश्चितपणे उपयोग होणार आहे.

## कर्जतमध्ये हुतात्म्यांना अभिवादन

**कर्जत :** कर्जत प्रेस क्लब संचालित हुतात्मा स्मारक समितीच्या वतीने आज हुतात्मा भाई कोतवाल यांच्या जयंतीनिमित्त हुतात्मा चौक येथे हुतात्मा भाई कोतवाल यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी हुतात्मा भाई कोतवाल आणि हुतात्मा हिराजी पाटील अमर रहे म्हणून घोषणा देण्यात आल्या. हुतात्मा भाई कोतवाल आणि हुतात्मा हिराजी पाटील यांच्या शौर्याची माहिती सांगण्यात आली.याप्रसंगी प्रेस क्लबचे सदस्य उपस्थित होते.

## काजू वाडीत वनराई बंधारा

**खरोशी :** काजूच्या वाडी शेजारी असलेल्या नाल्यावर तीस मीटर लांबीचा वनराई बंधारा बांधून लाखो लिटर पाणी अडविण्याचे कार्य केले आहे. एकीकडे पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष्य असतानाही काजूच्या वाडीतील आदिवासी बांधव अतिशय मेहनत करून भाजीपाला लागवडीतून आपला उदरनिर्वाह चालवतात त्यांना मदतीचा हात म्हणून वाडी शेजारी असलेल्या नैसर्गिक जल स्रोतावर ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेने वनराई बंधारा बांधून दिला.

## एकता दिंडीचे आयोजन

**आगरदांडा :** मुरुड सोमवंशीय क्षत्रिय माळी समाज संकल्प युवा अभियानाला आज २५ वर्ष पूर्ण झाले असून त्याचे औचित्य साधून श्री संतश्रेष्ठ सावता माळी एकता दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. दिंडीला मुरुड मसाल गल्ली येथुन सुरुवात करण्यात आली. या दिंडीत अबालवृद्ध वेगवेगळ्या पारंपारिक वेशात सहभागी झाले. या दिंडीमध्ये लेझीम पथक मसाल महिला मंडळ तर भोगेश्वर आळी व सुभाषचंद्र रोड शेगवाडा येथील महिलांनी भजन सादर केले.

# उरणच्या दोन्ही रो-रो सेवा अपूर्णच

- **मोरा जेट्टीचा खर्च गेला ७५ कोटींवर**
- **रेवस जेट्टीसाठी ३० कोटींचा झाला खर्च**



**। उरण । वार्ताहर ।**

उरणला जलमार्गाने जोडणाऱ्या मोरा ते मुंबईतील भाऊचा धक्का आणि करंजा ते रेवस या दोन्ही रो-रो सेवांचे काम रखडले आहे.

रो-रो सेवांसाठी जवळपास १०५ कोटी रुपये राज्य सरकार खर्च करणार आहे. सुरुवातीला मोरा जेट्टीसाठी ५० कोटी; तर करंजा-रेवससाठी २५ कोटी मंजूर झाले होते; मात्र कामाच्या दिरंगाईमुळे खर्चात वाढ होऊन मोरा जेट्टीचा खर्च ७५ कोटींवर गेला आहे; तर रेवस जेट्टीसाठी ३० कोटींचा खर्च झाला आहे.

**कुचकामी ठरण्याची शक्यता**

दोन्ही रो-रो सेवांच्या उपयुक्ततेविषयी नागरिकांच्या मनात शंका आहेत. रेवस-करंजा हा पूल झाल्यानंतर थेट पुलावरून आपली वाहने नेता येणार आहेत. त्यामुळे या रो-रोचा वापर नागरिक करतील का? तसेच, करंजा रो-रो जेट्टीपर्यंत जाण्यासाठी सुसज्ज रस्ता नसल्यामुळे ही रो-रो सेवा कुचकामी ठरण्याची शक्यता आहे, तर मोरा ते भाऊचा धक्का या जलमार्गावर असणारी लॉन्च सेवा ही उरण लोकल आणि अटल सेतूमुळे बंद पडायला आली आहे. त्यामुळे जलमार्गाचा वापर कमी झाला आहे. त्यामुळे ही रो-रो सेवा किती उपयुक्त ठरेल, अशी शंका व्यक्त करण्यात येत आहे.

> **केंद्र सरकारच्या सागरमाला योजनेतून रस्त्यावरील वाहनांचा भार कमी करण्यासाठी जलवाहतुकीला प्रोत्साहन दिले जात आहे. करंजा ते रेवस रो-रो सेवेची नव्याने निविदा काढण्यात आली आहे. मोरा जेट्टीचे काम लवकरच सुरू करण्यात येऊन मे महिन्याच्या अखेरपर्यंत पूर्ण करण्यात येईल.**
>
> **- सुधीर देवरे, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र मेरिटाइम मंडळ.**

गेल्या वर्षी सुरू झालेल्या मोरा-भाऊचा धक्का या रो-रो सेवेचे कामदेखील याच धर्तीवर आहे. मागील सहा महिन्यांपासून हे काम बंद आहे.२०१८ला मंजूर झालेल्या मोरा ते भाऊचा धक्का या रो-रो सेवेच्या कामासाठी वर्षभरापासून एकही दगड रचलेला नाही. सागरमाला योजनेतून हा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. यातील करंजा बंदरावरील जेट्टीचे काम पूर्ण होऊन पाच वर्षे झाली आहेत. यातील जेट्टीची दुरवस्था होऊ लागली आहे, मात्र या जलमार्गावरील रेवस जेट्टीचे काम अनेक कारणांनी रखडले आहे. हे काम पूर्ण करण्यासाठी नव्याने निविदा मागवण्यात आल्या आहेत, तसेच मोरा ते मुंबईतील भाऊचा धक्का या रो-रो मार्गावरील भाऊचा धक्का ही जेटी कार्यान्वित झाली आहे, मात्र मोरा जेट्टीचे काम चार वर्षांपासून रखडले आहे. हे काम रखडल्याने ५० कोटींच्या कामाची रक्कम ७५ कोटींवर पोहोचली आहे.

# माणगाव शहरावर सीसीटीव्ही कॅमेऱ्याचा वॉच

## गुन्हेगार प्रवृत्तीवर राहणार करडी नजर



**। माणगांव । वार्ताहर ।**

माणगांव शहरात गुन्हेगारीचे प्रमाण वाढत चालले आहे. घरफोड्या, चोऱ्या व इतर गुन्हे माणगांव शहरात घडत आहेत. गुन्हेगारांचा तत्काळ तपास लावण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची काळाची गरज होती. गेली अनेक दिवस माणगांवकर सीसीटीव्हीच्या प्रतीक्षेत होते. आता माणगावात सीसीटीव्ही कॅमेरे बसविले असून त्याचे काम अंतिम टप्प्यात आहे.

माणगाव नगरपंचायत स्थापन होवून १० वर्ष लोटली शहरीकरणा बरोबरच नागरिकीकरण ही वाढू लागल्याने विविध गुन्हेगारी डोके वर काढू लागली आहे. त्यामुळे नागरिकांच्याही सुरक्षिततेचा मुद्दा हळूहळू पुढे येवू लागला आहे. नागरिकांची सुरक्षेसाठी पोलीस सदैव रस्त्यावर असतात. माणगाव नगरपंचायतीने नागरिकांच्या सुरक्षितेसाठी व गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी माणगाव शहरात महत्त्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव दिला होता.

जिल्हा नियोजन समितीमधून ९३ लाख रुपये सीसीटीव्ही कॅमरे बसविण्यासाठी मंजूर झाले होते. हे सीसीटीव्ही कॅमरे बसविण्याचे काम पूर्ण झाले आहे. माणगाव शहरातील महत्त्वाच्या ४७ ठिकाणी हे तब्बल १२२ कॅमरे बसविले असून गुन्हेगारीवर आता वॉच राहणार आहे. सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची परवानगी पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून मिळाली असूनहेसीसीटीव्हीकॅमेरेमहत्त्वाच्या असणाऱ्या मुंबई गोवा महामार्गावर बाजारपेठेत ठिकठिकाणी हे सीसीटीव्ही कॅमरे बसविले आहेत. त्यामुळे गुन्हेगारासह सार्वजनिक ठिकाणी नगरपंचायतीच्या जागेत तसेच निजामपूर रोड, मोर्बा रोड, महामार्गलगत, कचेरी रोडलगत कचरा टाकणाऱ्यावर सीसीटीव्ही कॅमेऱ्याची करडी नजर राहणार आहे. त्यामुळे माणगाव व परिसरात गुन्हेगारीला आळा बसणार असून एखादी गुन्ह्याची घटना घडल्यास पोलिसांना तपास करण्यात मदत होणार आहे.

> **जिल्हा नियोजन समिती मार्फत सुमारे ९३ लाख रुपये निधीतून माणगांव नगर पंचायत हद्दीत महत्वाच्या ४७ ठिकाणी १२२ कॅमेरे लावण्यात आले असून पुढील आठवड्यात डेमो देण्यात येणार असून सदरील कार्यप्रणाली माणगांव पोलिसांच्या अधिपत्याखाली देण्यात येणार आहे. सीसीटीव्हीमुळे माणगांव शहरात येणाऱ्या जाणाऱ्या गाड्या व गुन्हेगारीवर करडी नजर राहणार आहे.**
>
> **- संतोष माळी, मुख्याधिकारी नगरपंचायत, माणगांव**

# गुरुवारी दत्तमंदिराला १०८ प्रदक्षिणा

- **नवनाथ आरती मंडळाचा उपक्रम**

**। चौल । प्रतिनिधी ।**

चौल-भोवाळे येथील दत्तमंदिराला मार्गशीर्ष महिन्याच्या पहिल्या गुरुवारी (दि. ५) १०८ प्रदक्षिणा घालण्यात येणार आहेत. सायंकाळी ५ वाजता या सोहळ्यास प्रारंभ होईल, अशी माहिती नवनाथ आरती मंडळ, चौलच्यावतीने देण्यात आली आहे.

दत्त मंदिराला १०८ प्रदक्षिणा घालण्याचा सोहळा दरवर्षी मार्गशीर्ष महिन्यातील पहिल्या गुरुवारी वार्डे गुरुजी आरती मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात येतो. यावर्षी ५ डिसेंबरला हा सोहळा पार पडणार आहे. दरवर्षी या कार्यक्रमास चौल पंचक्रोशी आणि विविध ठिकाणचे दत्तभक्त मोठ्या संख्येने उपस्थित असतात. त्यानिमित्त दत्त महाराजांची एकत्रित प्रार्थना, महाआरती करण्यात येते. शेवटी महाप्रसादाचे वाटप करुन या सोहळ्याची सांगता होते. सध्या या सोहळ्याची जय्यत तयारी आयोजकांकडून सुरू आहे. या सोहळ्यास दत्तभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.



**१२ डिसेंबरला दत्त परिक्रमा**

**दत्तमहाराजांचे स्वयंभू स्थान असलेल्या दत्त डोंगराला प्रदक्षिणा घालण्यात येणार आहे. त्यानिमित्त पायी पालखी मिरवणूक काढण्यात येणार आहे. परिक्रमेस दुपारी दोन वाजता दत्तमंदिरातून प्रारंभ होईल. स्वामी समर्थ मंदिरमार्गे चौल अशी मार्गक्रमणा करीत दत्त मंदिराचे मुख्य प्रवेशद्वार, पायरीमार्गे मंदिराकडे मार्गस्थ होईल, असे नवनाथ आरती मंडळाच्यावतीने सांगण्यात आले आहे.**


# म्हसळ्यात माकडांचा उपद्रव

**। म्हसळा । वार्ताहर ।**

म्हसळा शहरासह संपूर्ण तालुक्यात माकडांनी उच्छाद मांडला असून तालुक्यातील बागायतदार मोठ्या प्रमाणात त्रस्त झाले असून हा उपद्रव दिवसेंदिवस वाढत आहे.

आंबा, काजूचा हंगाम जवळ येत असून काही भागात काजू, आंबा या पिकांना मोहर येण्याच्या मार्गांवर असून कोवळा मोहोर माकडांकडून उध्वस्त होण्याची भीती बागायत दारांकडून होत असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

तालुक्याच्या काही भागात सुपारी पिकांच्या बागा सध्या फुलण्याच्या तयारीत असून माकडांकडून नासधूस होण्याची भीती सुरु असून बागायतदार शेतकरी २४ तास आपल्या बागांमध्ये कष्ट करून हाती काहीच न लागत असल्यामुळे बागायतदारांमध्ये नाराजीचा सुरु आहे. वनविभागाकडून ठोस उपाययोजना व्हावी अशी बागायतदारांमधून मागणी केली जात आहे. तालुक्यात फळबागा आणि शेतीपिकांचे माकडांकडून सातत्याने मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्यामुळे शेतकरी, बागायतदार हवालदिल झाला आहे.



# आरोपीवर पोलिसांची धाड

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

तिघर येथील तरुणावर अनेक गुन्हे दाखल आहेत. त्या तरुणाला तडीपार केले असून त्या आरोपीला कर्जत तालुक्यात राहण्यास मनाई आहे, असे असताना देखील सदर तरुण कर्जत शहरातील पंचशील नगर मध्ये राहत असल्याचे उघड झाले असून कर्जत पोलिसांनी त्या ठिकाणी धाड टाकून अटक केली आहे.

तिघर गावात राहणाऱ्या तरुणाने अनेक गुन्ह्यात आपला सहभाग नोंदविला आहे. तशी नोंद पोलीस ठाण्यांमध्ये असून रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी त्या आरोपीला तडीपार केले आहे.मात्र हा आरोपी छुप्या मार्गाने कर्जत शहरात वास्तव्य करीत असल्याचे माहिती मिळाली होती.

# घोडीवलीत दोन घरांची घरफोडी

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

खालापूर पोलीस ठाणे हद्दीतील घोडीवली गावामध्ये पहाटेच्या सुमारास २ घरांची घरफोड्या झाल्याने घोडीवली गावकऱ्यांसह परिसरातील नागरिक भीतीच्या सावटाखाली वावरत आहेत.

काही महिन्यापूर्वी घोडीवली गावात पाच ठिकाणी घरफोडीची घटना घडली होती, परंतु त्या घरफोडीमध्ये कोणतीही मोठ्या प्रमाणात नुकसान झाली नसताना या चोरीच्या घटनेला काही दिवस उलटून गेल्या नंतर घोडीवली गावात मध्ये २ डिसेंबरच्या पहाटेच्या सुमारास २ बंद घराचे लॉक तोडून चोरटे घरामध्ये घुसले असून घरातील मंडळी कामानिमित्ताने बाहेर गेली असता चोरट्यानी संधीचा फायदा घेत गणेश दुधाजी पिंगळे यांच्या घरातील कपाट तोडून काही किंमती वस्तू, गंठण, हार, चेन व काही रक्कम लंपास केल्या असून अशी माहिती घरातील लोकांनी दिली असून चोरट्यांनी दुसरा घर शशीकांत काळुराम पिंगळे फोडला चोरट्यांच्या हाती या घरात काहीच लागले नाही.

तर गावामध्ये काही ठिकाणी सीसीटीव्ही आहेत, परंतु चोरी ही आड साईट असलेल्या ठिकाणी झाली असल्यामुळे त्या ठिकाणी कोणतीही व्यक्ती निदर्शनास आढळून आली नसल्यामुळे पुढील तपास खालापूर पोलीस करत आहेत.

मुंबई पुणे हायवेवरील खालापुर नजदीक घोडीवली गाव जवळपास अडीच ते तीन हजार लोकसंख्या असलेले गाव असून हे गाव नेहमीच वेगवेगळ्या चर्चे ने तालुक्यात चर्चेचे असताना गेल्या काही महिन्यात या गावात चोरीचा सुळसुळाट निर्माण झाल्याने नागरिकांमध्ये भीती निर्माण झाली असता या चोरीच्या घटना ताज्या असताना २ डिसेंबरच्या पहाटेच्या सुमारास चोरट्यांनी पुन्हा एकदा दोन घरांची घरफोडी करत लाखोंचा ऐवज लंपास केल्याने नागरिक भीतीच्या सावटाखाली वावरत आहेत. तर येथील चोरटे शोधणे पोलिसांसमोर मोठे आव्हान असले तरी नागरिकांनी सतर्क करणे गरजेचे आहे.

# सिडकोच्या सागरी महामार्गावर खड्डे

**। उरण । वार्ताहर ।**

सिडकोच्या द्रोणागिरी ते पागोटे या सागरी महामार्गावर खड्डे पडले आहेत. या मार्गाची दुरुस्ती मे २०२४ मध्ये करण्यात आली आहे. मात्र अवघ्या काही महिन्यांतच हा मार्ग नादुरुस्त झाला आहे. यात जड कंटेनर वाहनांची संख्या जास्त असल्याने खोपटे पूल चौकात पडलेले खड्डे धोकादायक बनले आहेत.

नवी मुंबईत जाणाऱ्या दुचाकीस्वाराचा तोल गेल्याने कंटेनर वाहनाखाली तो येता येता वाचला. तर याच चौकात एसटी बस आणि रिक्षा यांचा अपघात झाला होता. द्रोणागिरी नोड ते खोपटे पूल चौक या मार्गावरही खड्डे पडले आहेत. या मार्गावरील पथदिवे बंद असल्याने प्रवाशांना अंधार आणि खड्डे यांचा सामना करावा लागत आहे. उरणच्या जेएनपीटी ते पळस्पे या राष्ट्रीय महामार्गाला हा सागरी महामार्ग जोडण्यात आला आहे. त्यामुळे जेएनपीटी बंदरातून खोपटे आणि उरणच्या पूर्व विभागातील अनेक गोदामात ये-जा करणाऱ्या हजारो जड कंटेनर वाहनांमुळे हा मार्ग सतत वर्दळीला बनला आहे.

त्याचप्रमाणे या मार्गावरून उरण, द्रोणागिरी नोड, खारपाडा किंवा अलिबागला जाणारी लहान प्रवासी वाहनेही याच मार्गाचा वापर करीत आहेत. त्यामुळे जड व प्रवासी वाहनांसाठी महत्वाचा असलेल्या या मार्गावरचे खड्डे हे अपघाताचे कारण ठरू लागले आहेत.

# कर्जतमध्ये सात डिसेंबर रोजी अवतरणार पेशवाई

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

१८५७ च्या स्वातंत्र्य संग्रामाचे प्रमुख नानासाहेब पेशवे स्मारक समिती कडून नानासाहेब पेशवे यांची २००वी जयंती साजरी करण्यात येणार आहे. सात आणि आठ डिसेंबर रोजी साजऱ्या होणाऱ्या जयंती सोहळ्यात नानासाहेब पेशवे तसेच संपूर्ण पेशवाईचे दर्शन पाहायला मिळणार आहे.

१८५७ चे उठावाचे प्रमुख असलेले दुसरे नानासाहेब पेशवे यांचा मोठा सहभाग होता.त्यांचा २०० वा जन्मशताब्दी महोत्सव देशभर साजरा होत असून त्यांचे मूळ गावी कर्जत जवळील वेणगाव येथे हा सोहळा दोन दिवस चालणार आहे.या सोहळ्याची माहिती देण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या स्मारक समितीच्या वतीने वेणगाव येथे पत्रकार परिषद घेण्यात आली.त्यावेळी स्मारक समितीचे उपाध्यक्ष भाई गायकर, सचिव रमेश मुंढे, कोषाध्यक्ष नितीन कांदळगावकर यांच्यासह रायगड समारक मंडळाचे राजेश मोरे आणि इतिहास प्रेमी मोहन शेटे आदी उपस्थित होते.

८ डिसेंबर रोजी नानासाहेब यांची २०० वी जयंती केली जाणार यासाठी स्मारक समिती काम करीत आहेत.उत्तर भारतात भव्य स्मारक आणि भव्य पुतळा आहे.आपल्या येथे जन्मगावी वेणगाव येथे सात डिसेंबर रोजी कर्जत शहरात सर्व शाळांचे विद्यार्थी यांची रॅली काढली जाणार आहे.पुण्यातून नानासाहेब पेशवे रथ यात्रा निघणार असून या यात्रेचे स्वागत १५ गावात होणार आहे. पुण्यातून शनिवार वाडा आणि किल्ले रायगड येथून पवित्र जल आणले जाणार आहे. त्यासाठी शिवाजी स्मारक मंडळ कार्य करीत आहे.वेणगाव येथे शस्त्र प्रदर्शन,तसेच राष्ट्र वीर मंडळ मर्दानी खेळ करणार आहेत.



**कोण होते नानासाहेब पेशवे..**

कर्जत तालुक्यातील वेणगाव मध्ये महादेव भट यांचे कुटुंब अत्यंत गरिबीत जीवन जगत होते.त्यावेळी आपल्या कुटुंबाला घेवून महादेव भट हे उत्तर प्रदेशातील विठुर या ठिकाणी पेशव्यांचे आश्रित म्हणून राहायला गेले.१८२४ मध्ये जन्म झालेले धोंडोपंत महादेव भट हे त्यात चुणचुणीत.थोरवे नानासाहेब पेशवे यांना तीन मुली आणि एक मुलगा होता,मात्र त्यांचा मुलगा अल्पवयात वारल्याने मुलगा नव्हता आणि गादीला वारस म्हणून आपल्याकडे आश्रित असलेल्या भट कुटुंबातील धोंडोपंत यांना १८२७ मध्ये म्हणजे वयाच्या तिसऱ्या वर्षी त्यांच्या संपूर्ण कुटुंबासह दत्तक घेतले. त्यानंतर धोंडोपंत महादेव भट हे पेशव्यांचे दत्तक घेतलेले वारसदार झाले. त्याच नानासाहेब पेशवे यांनी १८५७ मध्ये ब्रिटिशांविरुद्ध देशव्यापी आंदोलन सुरू केले.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- पाहिजेत : वॉटर पंप मॅकेनिक (पाण्याचे पंप कारागीर), फिटर, हेल्पर (बाहेर गावच्या व्यक्तींसाठी राहण्याची सोय) त्वरीत भेटा. मे. हजारे एन्टरप्रायजेस, अलिबाग. संपर्क : ९८२२००१८५३
- पाहिजे- रिसोर्टवर स्वयंपाक करणे, वाडीची साफ सफाई करणेसाठी पुरूष/ स्त्री/अनुभवी केअर टेकर पाहिजे. संपर्क : ८३२९१७५७९१
- LIC ऑफिस कामासाठी मुलगी हवी आहे. विजयनगर- वरसोली, अलिबाग मो. ९४२२४९४५९०/७५०७९२९१२८
- इलेक्ट्रिशन पाहिजे ३ ते ४ वर्षाचा अनुभव. संपर्क : ८८८८६०५२५९

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## फुले आणि फळांच्या दरात २० टक्क्यांनी झाली वाढ

# मार्गशीर्ष महिन्याच्या व्रतासाठी बाजार सजला

**। रायगड । प्रतिनिधी ।**

सोमवारपासून मार्गशीर्ष महिन्याला सुरुवात झाली आहे. या महिन्यामधील गुरुवारी महालक्ष्मीचे व्रत केले जाते. कुटुंबात धन, धान्य आणि समृद्धी राहावी. सगळ्यांचे आरोग्य उत्तम रहावे म्हणून विवाहित महिला हे व्रत करतात.

मार्गशीर्ष महिन्यातील दर गुरुवारी प्रतीकात्मक स्वरूपात महालक्ष्मीचा घट बसवण्याची परंपरा आहे. यासाठी बाजारात खास महालक्ष्मी देवीचा मुखवटा आणि पोशाख उपलब्ध आहे. दर गुरुवारी घट बसवून महालक्ष्मीची पूजा करून हार-वेणी किंवा गजरा अर्पण केला जातो. मार्गशीर्षच्या महालक्ष्मी व्रतासाठी बाजारात देवीच्या मुखवट्यापासून साजशृंगाराचे साहित्य, पूजा साहित्याने बाजारपेठ सजली आहे. यंदा पूजेसाठी एकविरा, तुळजाभवानी, अंबा मातेचे मुखवटे बाजारात आले आहेत. मार्गशीर्ष सुरू झाल्याने अनेक जण व्रत-वैकल्य, उपवास करीत असल्याने फळांना मागणी वाढली आहे. सध्या बाजारात फळांची मोठ्या प्रमाणात आवक सुरू आहे. पूजेसाठी फळांची मागणी वाढल्याने भावही वाढले आहेत. बाजारात संत्री, मोसंबी, पेरू, सफरचंद, पपई, कलिंगड, अननस, सीताफळ यांसारख्या देशी फळांची आवक वाढली आहे.



● (छायाचित्र : राजेश डांगळे)

**रेखीव दागिने, साडी-चोळी उपलब्ध**

**महालक्ष्मीला वेगवेगळ्या आकर्षक चोळीने सजवले जाते. यासाठी यंदा खनाच्या आणि कोल्हापुरी साड्या १८० रुपयांमध्ये उपलब्ध आहेत. चुनरी आणि चोळी ३५ रुपयांना मिळत आहे. महालक्ष्मीला सजवण्यासाठी लागणाऱ्या संपूर्ण साहित्याचा सेट हा २०० ते ३०० रुपयांपर्यंत उपलब्ध आहे. यामध्ये चुनरी, चोळी, नथ, हिरव्या बांगड्या, छोटे मंगळसूत्र आणि गजरा, रांगोळी उपलब्ध आहे, तसेच दागिन्यांमध्ये मोहन माळ, मंगळसूत्र, लक्ष्मीहार अशा प्रकारचे आकर्षक छोटे-छोटे रेखीव दागिने २० रुपयांपासून उपलब्ध आहेत.**

# पत्रकार अजय शिवकर यांना मातृशोक

**। उरण । वार्ताहर ।**

लेखक, कवी, पत्रकार अजय शिवकर यांच्या मातोश्री गं.भा. अयोध्या गणेश शिवकर यांचे सोमवार, दि. २ डिसेंबर रोजी वयाच्या ७६ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात, मुले, मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर केळवणे स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मोठा जनसमुदाय उपस्थित होता. त्यांचा दशक्रिया विधी गुरुवार, दि. १२ डिसेंबर रोजी सकाळी ७.३० वाजता उरण माणकेश्वर येथे होणार आहे, तर उत्तरकार्य शुक्रवार १३ डिसेंबर रोजी राहत्या घरी होणार आहे, असे त्यांच्या कुटुंबियांनी सांगितले.



## जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक सौ. माणिकबाई मधुकर घरत श्री. कुसुम कृष्णा घरत, श्री. मल्हारी महादु खडे, श्री. संतोष महादु खडे, श्री. जनार्दन महादु खडे, श्री रमाकांत महादु खडे, श्री भास्कर पांडुरंग म्हसे यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे वारे, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं ९८/१ एकुण ०.२०.२० गुंठे विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखत, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यानी आमचे अशिलाच्या लाभात सोडुन दिलेला असून त्यांनी आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक ०४/१२/२०२४

**ॲड. देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

## जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री इंग्रेशिअस व्हिक्टर डलगाडो यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे गौळवाडी, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं ३९/६ श्री. इंग्रेशिअस व्हिक्टर डलगाडो यांचे हिश्याचे एकुण क्षेत्र ०.३३.०० गुंठे विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखत, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक ०४/१२/२०२४

**ॲड देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी मौजे हातनोली, ता. खालापूर, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या बिनशेती वापराच्या जमिन मिळकती भोगवटादार रकान्यामधील नमुद इसमांच्या सुद्द मालकीच्या मिळकती असुन त्यांनी सदर मिळकतींचे विकसनाचे हक्क आमचे अशिलांस प्रदान करण्याचे ठरविले आहे.

**बिनशेती जमिन मिळकतींचे वर्णन**

**मौजे - हातनोली, ता. खालापूर, जि. रायगड येथील**

| भोगवटादाराचे नाव | भुमापन क्र. | हि.नं | क्षेत्र आर.चौ.मी. से.मी | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| मोतीराम दत्तात्रेय ठोंबरे | ४६ | १/अ/१ | १२-००.०० | २४०.०० |
| | ४६ | १/ब/१ | २०-८०.०० | ४१६.०० |
| | ४७ | अ/२/२ | १७-२८.०० | १७२.८० |
| सुधीर दत्तात्रेय ठोंबरे | ४७ | अ/२/१ | ८-५०.०० | ८५.०० |
| | ४७ | अ/२/३ | २५-५५.०० | ५११.०० |

त्याअर्थी सदर मिळकतीमध्ये अगर तिचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, एम.ओ.यू, हुकुमनामा मनाई आदेश जप्ती, वहिवाट, हिस्सा अगर तत्सम कोणतेही हक्क - हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर विकसनाचे व्यवहारास कुणाचीही कोणत्याही प्रकारे हरकत असल्यास अशा हितसंबंधी व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरूर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतींवरील सदरील श्री. मोतीराम दत्तात्रेय ठोंबरे आणि श्री. सुधिर दत्तात्रेय ठोंबरे यांचे मालकी हक्क हितसंबंध निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा विकसनाचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि.: ०३/१२/२०२४

**श्री. तुषार द. देवरे, ॲडव्होकेट**
पत्ता : फ्लॅट नं. ए - २, जय नगर को. ऑप हौ. सोसा. लि. फोर्ट रोड, ५२ बंगला, पनवेल ४१० २०६ जि. रायगड. मोबाईल नं. ९३२५००४००८
tushar.deore82@gmail.com

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुंद केलेली जमीन खालील जमीन मालक यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे खरेदीदारांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

**मौजे हातोंड, ता.सुधागड, जि.रायगड. येथील जमीन मिळकत.**

**मिळकतीचे वर्णन :-**

| जमिन मालकाची नांवे | गट/स.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| स्वाती प्रशांत तेरे. | ३३० | ०-७३-०० | ०-२६ |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोझा, भाडेपट्टा, जप्ती, लिज, लीएन जाणे येणेचे मार्ग अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १० दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासह समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. त्याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन त्यासंबधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी ते जाणीवपुर्वक सोडुन दिले आहेत, असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करून आमचे खरेदी घेणार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही. हे कळावे.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

दिनांक :- ०३/१२/२०२४

सही/-
खरेदीदारांचे लेखक,
राठोड एण्ड एसोसिएट्स
श्री.सरदारमल जोरावरमल राठोड स्टॅम्प व्हेंडर,
श्री. राजेश एस. राठोड
२८६ अ राठोड सदन ऑफिस नं.७ पाली,
ता. सुधागड, जि. रायगड.
मो. ९४२११६८७६३/९२७०३६७२९०

## महाराष्ट्र शासन
## अलिबाग वन विभाग
## जाहिर सुचना

या द्वारे सुचना देण्यात येते की, श्री भिमसेन गुरुमुखदास रेखी, रा. कल्पतरु रिव्हर साईड, तक्का. पनवेल, जि.रायगड यांचे पनवेल येथील त्यांचे मालकीची असलेली सॉमील परवाना क्रं. १७/२०१३, नविन परवाना क्र.१५/२०१४ID No.MH२२१५THAL ४२ इंच उभा यंत्र व ४२ इंच आडवा यंत्र त्यांचा मुलगा श्री. विजय भिमसेन रेखी, रा.२ डी-१०४, कल्पतरु रिव्हर, फेस नं.१, बिल्डींग नं.१ आणि २ को-ऑपरेटिव्ह, हौसिंग सोसायटी, तक्का पनवेल, जि. रायगड यांचे नावे हस्तांतरण करणेबाबत प्रस्ताव उप वनसंरक्षक, अलिबाग यांचे कार्यालयास प्राप्त झाला आहे.

श्री. भिमसेन गुरुमुखदास रेखी, रा.पनवेल यांना श्री. संजय, श्री. विजय व श्रीमती उषा अशी तीन मुले आहेत. श्री. भिमसेन गुरुमुखदास रेखी यांना त्यांचा मुलगा श्री. विजय भिमसेन रेखी यांचे नांवे करणेकामी विनंती केली आहे.

तरी उक्त मालमत्तेवर वारस, गहाणखत, विक्री, लिज कायदेशीर हक्क, भेट किंवा अन्य कोणत्याही स्वरुपाचा हितसंबंध हस्तांतरण व स्थानांतरण पुर्नस्थान निश्चयन व विक्री संबंधात कोणताही आक्षेप असणाऱ्या व्यक्तीने व दावा करण्याच्या व्यक्तींनी या सुचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १५ दिवसांत हितसंबंधीची माहिती निम्नस्वाक्षरी कारांना खालील कार्यालयाचे पत्त्यावर लेखी कळवावे. अन्यथा उक्त संबंधीत कोणताही दावा वा आक्षेप नसल्याचे समजण्यांत येईल त्यानंतर कोणताही दावा व आक्षेप विचारात घेतला जाणार नाही.

अलिबाग
दिनांक-०३/१२/२०२४

सही/-
**(राहुल पाटील, भा.व.से.)**
**उप वनसंरक्षक,**
**अलिबाग वनविभाग अलिबाग.**

कार्यालय
उप वनसंरक्षक, अलिबाग वनविभाग अलिबाग
यांचे कार्यालय हिराकोट तलावापुढे
जिल्हाधिकारी रायगड यांचे कार्यालयशेजारी
अलिबाग ४०२२०१

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, मौजे थळ, ता. अलिबाग, जि. रायगड येथील भुमापन क्र. २७१/१ क्षेत्र ०-१७-०० हे. आर, आकार ४ रुपये ८२ पैसे, ही बागायती मिळकत मिळकतीचे विद्यमान कबजेदार १) श्री सुभाष दत्ताराम मयेकर २) श्री सुनिल दत्ताराम मयेकर ३) श्री सदाशिव दत्ताराम मयेकर ४) सुशिला मोहन पडवळ यांचे सामाईक खुद्द मालकीची व ताबा कबजा वहिवाटीची असुन ७/१२ दफ्तरी वरील कबजेदारांमध्ये मिळकतीचे वाटप झालेले आहे. वाटपाप्रमाणे प्रत्येकाच्या हिश्यास मिळकत आलेली आहे. सदरचे वाटणीपत्र नोंदणीकृत करण्यात आलेले आहे. परंतु सदर मिळकती पैकी श्री सदाशिव दत्ताराम मयेकर व सुशिला मोहन पडवळ यांनी सदरची मिळकत विक्रीस काढलेली आहे. असे मला म्हणजेच मिळकतीचा कबजेदार (श्री सुनिल दत्ताराम मयेकर) समजले आहे. सदरची संपुर्ण मिळकत माझे ताबा कबजा वहिवाटीत असुन मीच म्हणजेच (श्री सुनिल दत्ताराम मयेकर) गेली ४० वर्षे कसत आहे. तसेच सदर मिळकतीसंदर्भात सदाशिव दत्ताराम मयेकर व सुशिला मोहन पडवळ यांना त्यांचे हिश्याची मिळकत विक्री करावयाची असल्यास माझ्या परवानगीशिवाय किंवा संमती शिवाय विक्री करणेची नाही. या संदर्भात संमतीपत्र मला लिहुन दिलेले आहे. त्याप्रमाणे श्री सदाशिव दत्ताराम मयेकर व सुशिला मोहन पडवळ यांनी त्यांचे हिश्याची मिळकत सर्वांच्या संमतीशिवाय विक्री केल्यास त्यास माझी हरकत राहणार आहे. सबब सदर मिळकतीची विक्री श्री सदाशिव दत्ताराम मयेकर व सुशिला मोहन पडवळ यांना अन्य तिऱ्हाईत इसमांस करता येणार नाही. किंवा अन्य तिऱ्हाईत इसमांचा हस्तक्षेप करता येणार नाही. किंवा तसे केल्यास मी मिळकतीचा एक सहमालक म्हणुन मला कायदेशीर कारवाई करणेचा हक्क राहणार आहे. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
ता. ३/१२/२०२४

सही/-
**सुनिल दत्ताराम मयेकर**
रा. थळ- पालथी, ता. अलिबाग

## जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री. चंद्रशेखर सदाशिवराव निंबाळकर यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे कामतपाडा, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं २२/४ एकुण १.३७.०० गुंठे पैकी लिहुन देणार याचे हिश्याचे ०.२१.०० गुंठे विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखत, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हित संबध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलाच्या लाभात सोडुन दिलेला असून त्यांनी आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक ०४/१२/२०२४

**ॲड देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता. कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, माझे अशिल अमित आनंद ठाकूर, रा. मु. नागांव-हटाळे, ता. अलिबाग, जि. रायगड या नोटीशीने कळवितो की,

मी श्री. चिंतामण तानाजी परब, रा. मु. साताड बंदर, पो. नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिलाने खरेदी करणेचे ठरवून तसा साठेकरार उभयतांत दि. ८/८/२००८ रोजी करणेत आलेला होता. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र.व उपविभाग क्र. | क्षेत्र हे.आर. |
|---|---|---|
| नागांव | ४२० | ०-०४-०८<br>०-०१-००<br>०-०५-०८ |

वर नमूद मिळकतीमधील अलिबाग-रेवदंडा रस्त्याच्या बाजूकडील ०-०१-४ हे. आर. मिळकत व सदर मिळकतीमध्ये असलेली ग्रुप ग्रामपंचायत नागांव घर क्र. ६२९ ची मिळकत. वर नमूद मिळकत ही आमचे अशिलांनी श्री. चिंतामण तानाजी परब यांचेकडून रक्कम रु. ३,५०,०००/- मात्र रक्कमेस खरेदी करण्याचे ठरवून सदरची खरेदीची संपूर्ण रक्कम रु. ३,५०,०००/- मात्र अलिबाग को. ऑप. अर्बन बँक लि., शाखा अलिबाग यांचेकडील धनादेश क्र. ३४०२०७ अन्वये अदा केलेली आहे. वर नमूद मिळकतीचा साठेकरार हा मे. पब्लीक नोटरी सो. अलिबाग यांचेकडे नोंदविण्यात आलेला होता व आहे. सदर साठेकरारावरती चिंतामण तानाजी परब यांचा मुलगा म्हणून हेमंत चिंतामण परब आणि मुलगी संगिता कांतिलाल निकम यांच्या सुद्धा सह्या आहेत. वर नमूद मिळकतीचे खरेदीखत हे न्यायालयाचा निकाल लागल्यानंतर करुन देण्याचे आमचे अशिलांस श्री. चिंतामण तानाजी परब यांनी मान्य व कबूल केले होते. आमचे अशिलांनी वेळोवेळी संपर्क साधून खरेदीखत करुन देण्याचे सांगून सुद्धा आजतागायत वर नमूद मिळकतीचे खरेदीखत श्री. चिंतामण तानाजी परब यांनी करुन दिलेले नाही. आमच्या अशिलांचे अपरोक्ष नमूद मिळकतीची विक्री श्री. चिंतामण तानाजी परब हे परस्पर त्रयस्थ विकण्याच्या तयारीत असल्याची खात्रीलायक बातमी आमचे अशिलांस मिळालेली आहे.

सबब वर नमूद केलेली मिळकत आमचे अशिलांनी खरेदी केलेली असून व ती आमचे अशिलांचे ताबेकब्जा वहिवाटीत असून वर नमूद मिळकतीचा कोणीही कोणत्याही प्रकारचा खरेदी-विक्रीचा व्यवहार आमचे अशिलांचे अपरोक्ष करु नये. जर तसा कोणताही खरेदी-विक्रीचा व्यवहार आमचे अशिलांचे अपरोक्ष केल्यास सदरचा खरेदी-विक्रीचा व्यवहार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही व ते प्रामाणिक खरेदीदार होणार नाहीत व त्या खरेदी-विक्रीच्या विरुद्ध आमचे अशिल दिवाणी व फौजदारी स्वरुपाची कारवाई करतील हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक : ०३/१२/२०२४

सही/-
**ॲड. ऋषिकेश रमेश माळी**
**जिल्हा न्यायालय, रायगड-अलिबाग**

ने. ता. ०४/०१/२०२५

अर्जदार तर्फे वकील : ॲड. सिद्धेश र.म्हात्रे

**अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधीश व- स्तर यांचे न्यायालयात**

दि.चौ.अ.नं २०१/२०२४

१.श्रीमती. शैलजा प्रकाश वाडेकर
वय. ५९, धंदा. गृहिणी,
आधार नं. ५५४८-११०२-१४५५
मो.नं. ९९७०३९०९२९
२. सौ. जुईली प्रकाश वाडेकर
लग्नानंतरचे नाव : जुईली हरिदास जाधव
वय. ३१, धंदा. गृहिणी,
आधार नं. ५९१८-८९७५-१४९९
मो.नं. ९८३४७९०६९१.
३. सौ. सायली प्रकाश वाडेकर. — अर्जदार
लग्नानंतरचे नाव : सायली प्रदीप मोकल
वय. २७, धंदा. गृहिणी
आधार नं.४७४०-४४०४-०५८६
मो.नं. ७७५७००८८८६.
नं १ ते ३ सर्व रा.
रा. आरआईएल टाऊनशिप,
बेणसे, ता. पेण, जि. रायगड, महाराष्ट्र

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

अर्जदार यांनी मे. कोर्टात इंडियन सक्शेशन ॲक्ट चे कलम ३७२ नुसार कै. प्रकाश महादेव वाडेकर यांचे मृत्यू पश्चात वारसदाखला मिळणे करिता अर्ज केला आहे. अर्जदार नं. १ ह्या कै. प्रकाश महादेव वाडेकर यांची पत्नी आहे. अर्जदार नं. २ व ३ ही कै. प्रकाश महादेव वाडेकर यांच्या मुली आहेत. अर्जदारांच्या व्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाहीत.

तरी या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, अर्जदार यांचे शिवाय नुसार कै. प्रकाश महादेव वाडेकर यांस अन्य कोणीही वारस असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत कोर्टात हजर व्हावे. मुदतीत हजर न झाल्यास नुसार कै. प्रकाश महादेव वाडेकर यांस अर्जदार हेच वारस आहेत असा वारस अर्जदार यांचे लाभात देण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
तारीख :

सही — सही
**अधीक्षक**
**लिपिक सही** — **कोर्टाचा शिक्का** — **दिवाणी न्यायालय**
**दिवाणी न्यायालय** — **व-स्तर अलिबाग**

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## दि रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.अलिबाग

मे.वसुली व विक्री अधिकारी यांचे कार्यालय,
द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.
अलिबाग केंद्र कार्यालय अलिबाग निलीमा हॉटेल
शेजारी चेंढरे ता.अलिबाग जि. रायगड
फोन क्र. ०२१४१-२२४३१५-१६

### मिळकतीचा जाहीर लिलाव विक्री जाहीरनामा

महाराष्ट्र संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७ अन्वये लवाद वसुली दाखल्यानुसार खालील नमुद केलेल्या कर्जदाराच्या जप्ती आदेशाने जप्त केलेल्या स्थावर मिळकतीचा जाहीर लिलाव शुक्रवार दिनांक ०३.०१.२०२५ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता बँकेचे केंद्र कार्यालय अलिबाग जि. रायगड येथे केला जाईल. लिलावाच्या अटी व शर्ती विक्री जाहीरनामा केंद्र कार्यालय अलिबाग येथे बँकेच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात आलेला आहे. या करीता जाहिर लिलावात भाग घेण्याकरीता अनामत रक्कम रु.१,००,०००/- (अक्षरी एक लाख मात्र) भरणे आवश्यक आहे. अनामत रक्कम स्विकारण्याची अंतीम मुदत रविवार व सुट्टीचे दिवस वगळुन दिनांक ०२.०१.२०२५ रोजी सायंकाळी ३.३० वाजे पर्यंत राहील. परंतु लिलावाच्या दिवशी १ तास अगोदर एखाद्या इसमाने जाहिर लिलावात भाग घेण्याची इच्छा प्रदर्शित केल्यास त्याचे कडुन अनामत रक्कम भरुन घेवून त्यास जाहिर लिलावात बोली लावण्यास अनुमती देण्याबाबत विचार करण्यात येईल. अनामत रक्कम भरणा केल्याशिवाय जाहिर लिलाव प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. तसेच ज्या स्थावर मालमत्तेच्या लिलाव प्रक्रियेत भाग घ्यावयाचा आहे त्याच्या स्थावर मालमत्तेचा उल्लेख असणे आवश्यक आहे.

**कर्जदार व स्थावर मालमत्तेचा तपशिल खालीलप्रमाणे..**

| अ. क्र | कर्जदार व जामिनदारांची नावे | वसुली दाखला क्र. व दिनांक | राखीव किंमत | जप्त केलेल्या व लिलावात विक्री करणेत येणाऱ्या स्थावर मालमत्तेचा तपशिल |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | **कर्जदार**<br>१. मे. सिस्टीमेटीक प्लास्टिक प्रा.लि.,<br>२.श्री. अजिंक्य अशोक शहा, कर्जदार<br>पत्ता:- मु.मंगल बंगला, प्लॉट नं. ४, रोड नं. ५, से.१९, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड | अर्ज क्र. २६९८/सन २०२३, दिनांक ११.१२.२०२३ | रु.२,५१,७५,०००/- | १. मोजे पनवेल महानगरपालिका हद्दीतील मंगल बंगला, प्लॉट नं.४, रोड नं.५, से.१९, न्यू पनवेल, क्षेत्र १८२९ चौ. फुट. |
| | ३. कु. नीमा अशोक शहा, कर्जदार<br>पत्ता:- मु.मंगल बंगला, प्लॉट नं. ४, रोड नं. ५, से.१९, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड | | रु. २०,१६,०००/- | २. जुई आर्केड बिल्डींग, प्लॉट नं.५५, सेक्टर ६ ए, कामोठे, शॉप नं. १, क्षेत्र ३३६ चौ. फुट |
| | ४. श्री. अजिंक्य अशोक शहा, जामीनदार<br>पत्ता:- मु.मंगल बंगला, प्लॉट नं.४, रोड नं.५ से. १९, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि. रायगड | | रु. ६०,५०,०००/- | ३. जुई आर्केड बिल्डींग, प्लॉट नं.५५, सेक्टर ६ए, कामोठे, शॉप नं. २, क्षेत्र ५५० चौ. फुट |
| | ५. कु. नीमा अशोक शहा, जामीनदार<br>पत्ता:- मु. मंगल बंगला, प्लॉट नं. ४, रोड नं.५ से. १९, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड | | रू. १,९८,३४२/- | ४. जुई आर्केड बिल्डींग, प्लॉट नं.५५, सेक्टर ६ए, कामोठे, कार पार्किंग नं.१३, क्षेत्र ९९ चौ. फुट |
| | ६. सुधा अशोक शहा, तारणदार<br>पत्ता:- मु.मंगल बंगला, प्लॉट नं. ४, रोड नं.५ से. १९, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड | | रू. १,६९,७२३/- | ५. जुई आर्केड बिल्डींग, प्लॉट नं.५५, सेक्टर ६ए, कामोठे, कार पार्किंग नं. १४, क्षेत्र ८५.२० चौ. फुट |
| | ७. श्री. अशोक हिराचंद शहा, तारणदार<br>पत्ता:- मु.मंगल बंगला, प्लॉट नं.४. रोड नं.५, से.१९, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड | अर्ज क्र. २६९८/ सन २०२३, दिनांक ११.१२.२०२३ | रू.१,७४,७१,९९६/- | ६. माहेश्वरी सॉफ्ट सोल्युशन प्रा.लि., प्लॉट नं.३०, से.५ अ. न्यू, पनवेल, शॉप नं. १ ते ५ एकूण क्षेत्र १५८५ चौ. फुट |
| | ८. मे. माहेश्वरी सॉफ्ट सोल्युशन प्रा.लि. तर्फे संचालक श्री. अशोक हिराचंद शहा,<br>पत्ता:- मु.मंगल बंगला, प्लॉट नं. ४, रोड नं. ५, से.१९, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड | | रू.१,८८,०९,८२६/- | ७. माहेश्वरी हाईटस्, प्लॉट नं.इ-२७. से. ६, न्यू. पनवेल, फ्लॅट नं.७०१ व ७०२, क्षेत्र २०१० चौ.फुट |

**स्थावर मालमत्ता जाहिर लिलावाच्या अटी व शर्ती**

**अटी व शर्ती :-**

१) सोबतचे यादीत वर्णन केलेली स्थावर मालमत्ता आहे त्या ठिकाणी आहे त्या परिस्थितीत विकणेंत येईल.
२) लिलावात भाग घेणेसाठी व बोली बोलणेसाठी रक्कम रू.१,००,०००/- मात्र अनामत भरावी लागेल.
३) वाजवी किंमतीपेक्षा कमी बोली नोंदल्या जाणार नाहीत.
४) शासन मान्यता प्राप्त अधिकृत व्हॅल्यूअर (सक्षम अधिकारी) यांचे मुल्यांकन दाखल्याच्या किंमतीपेक्षा व वाजवी किंमतीपेक्षा स्थावर मालमत्ता विक्रीची रक्कम कमी स्विकारली जाणार नाही.
५) सर्वात जास्त बोली स्विकारणे अथवा न स्विकारणे हे बँकेचे विशेष वसुली व विक्री अधिकारी यांचेवर अवलंबून राहील.
६) ज्यांचे नावे लिलाव पूर्ण करणेत येईल त्याने बोली रक्कमेच्या किमान २५ टक्के रक्कम ताबडतोब अनामत भरली पाहिजे, तसे न केल्यास लिलाव केला जाईल.
७) ज्याचे नावे लिलाव पुरा करणेत येईल त्याने उरलेली बोली रक्कमेच्या ७५ टक्के रक्कम लिलावाचे तारखेपासून ३० दिवसांचे आत भरणा करणे आवश्यक आहे. तसे न केल्यास आधी भरलेली २५ टक्के रक्कम (लिलावाचा खर्च वजा करून) सरकारी खजिन्यांत जमा करणेत येईल.
८) विक्री केलेल्या मालमत्तेवरील कर, विमा इत्यादी कर खरेदी दराने भरले पाहिजे. तसेच विक्री केलेल्या मालमत्ते संदर्भात मोजणी व त्या अनुषंगाने इतर कामे खरेदीदाराने करावयाचे आहेत.
९) बोली किमान किती रक्कमेने वाढवावयाची ती रक्कम लिलावाचे वेळी बँकेचे विशेष वसुली व विक्री अधिकारी ठरवतील.
१०) खरेदीदाराने कसूर केल्यास लिलाव करण्याची वेळ आल्यास त्यासाठी होणारा खर्च व खरेदीदाराने बोललेल्या किमतीपेक्षा लिलावाचे दुसऱ्या खरेदीदाराने बोललेली रक्कम कमी आल्यास अशी कमी होणारी रक्कम पहिल्या खरेदीदाराकडून वसुल केली जाईल.
११) पहिल्या विक्री पेक्षा दुसऱ्या विक्रीची किंमत जास्त असल्यास पहिल्या खरेदीदारास त्या जास्त असलेल्या किंमतीवर हक्क सांगता येणार नाही.
१२) ज्यावेळी स्थावर मालमत्तेची विक्री नियमाप्रमाणे कोणत्याही कारणास्तव कायम करणेत आली असेल त्यावेळी खरेदीदाराने भरलेली अनामत रक्कम लिलावाच्या रक्कमेतून कमी करणेत येईल.
१३) थकबाकीदाराने लिलाव उद्घोषणे प्रमाणे होणारी सर्व रक्कम आणि लिलाव किंमतीच्या ५ टक्के रक्कम अर्जासह विक्री अधिकारी यांच्याकडे सुपूर्त केल्यास विक्री अधिकारी लिलाव रद्द करतील आणि लिलाव रद्द झाल्यास किंमतीच्या ५ टक्के रक्कम अधिक लिलावात खरेदी दाराने भरलेली सर्व रक्कम खरेदीदारास परत केली जाईल.
१४)स्थावर मालमत्ता ज्या बोलीदाराचे नावाने अंतिम आदेशाने देण्याचा आदेश होईल त्या बोलीदाराने खरेदीखताच्या स्टॅम्प ड्युटीचा व इतर अनुषंगिक खर्च करावयाचा आहे.
१५) खरेदीदाराने लिलाव कायम केल्यास स्थावर मालमत्तेचा ताबा ३० दिवसांचे आत घेतला पाहिजे,
१६) सकारण लिलाव रद्द करणेचा अगर एखादी अट शिथिल करणेचा अधिकार विशेष वसुली व विक्री अधिकारी यांनी राखून ठेवलेला आहे.
१७) महाराष्ट्र अधिनियम १९६० व नियम १९६१ चे नियम १०७ मधील संबंधीत तरतुदी लिलाव खरेदीदारावर बंधनकारक राहतील.
१८) जाहीर लिलावात भाग घेणाऱ्या इसमाने जास्तीत जास्त बोली बोलून लिलाव घेतला असेल तरी कर्जदाराने ३० दिवसांच्या आत संपुर्ण रक्कम भरून विनंती केल्यास सदरचा लिलाव रद्द होईल व लिलाव घेण्याऱ्या इसमास त्याने भरलेल्या रक्कमेवर १२ टक्के दराने व्याजासह रक्कम परत केली जाईल.

**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**दि रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.अलिबाग**

अलिबाग
दिनांक : ०४.१२.२०२४

## वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशीप फायनल

# चौघांमध्ये रंगली चुरस

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

**भारत बॉर्डर गावसकर ट्रॉफीतील ५ सामन्यांच्या कसोटी मालिकेत १-० ने आघाडीवर आहे. भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया यांच्यातील दुसरा कसोटी सामना हा ६ डिसेंबरपासून एडलेड येथे खेळवण्यात येणार आहे. भारत गेल्या वेळेस ऑस्ट्रेलियाविरुद्ध एडलेडमध्ये ३६ धावांवर ऑलआऊट झाली होती. त्यामुळे भारतासाठी दुसरा सामना हा आव्हानात्मक असणार आहे. इतकंच नाही तर भारतासाठी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशीप फायनल २०२५ च्या हिशोबाने या मालिकेतील प्रत्येक सामना हा निर्णायक असा आहे. त्यामुळे विजयी घोडदौड सुरु ठेवून वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशीप फायनलचा मार्ग आणखी सुकर करण्याच्या प्रयत्न भारताचा असणार आहे.**




भारताने पर्थमध्ये ऑस्ट्रेलियाला दुहेरी झटका दिला. ऑस्ट्रेलियाचे पराभवासह पॉइंट्स कमी झाले. त्यानंतर दक्षिण आफ्रिकेने श्रीलंकेला पराभूत करत वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशीप २०२३-२०२५ पॉइंट्स टेबलमध्ये थेट दुसऱ्या स्थानी झेप घेतली आणि कांगारुंना दणका दिला. त्यामुळे ऑस्ट्रेलिया तिसऱ्या स्थानी फेकली गेली. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशीप फायनलला अजून ६ महिन्यांपेक्षा अधिक कालावधी आहे. मात्र २ जागांसाठी आतापासूनच जोरदार चुरस पाहायला मिळत आहे.

वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशीपच्या शर्यतीत एकूण ५ संघ आहेत, मात्र त्यापैकी एका टीमचं पॅकअप झाल्यात जमा आहे. भारत, दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिया आणि श्रीलंका हे ४ संघ मुख्य शर्यतीत आहेत. तर न्यूझीलंडचं आव्हान जवळपास संपुष्टात आलं आहे. इंग्लंड, विंडिज, पाकिस्तान आणि बांगलादेश अधिकृतरित्या बाहेर झाले आहेत. मात्र इंग्लंड आणि पाकिस्तान इतर संघांचं समीकरण बिघडवू शकतात. इंग्लंडने न्यूझीलंडला पहिल्या कसोटीत पराभूत केलं आणि त्यांचं समीकरण बिघडवलं. तसेच पाकिस्तान दक्षिण आफ्रिकेविरुद्ध खेळणार आहे. दक्षिण आफ्रिकेने पाकिस्तानविरुद्ध एकही सामना गमावला तरी अडचणी वाढतील.

भारताला स्वबळावर अंतिम सामन्यात पोहचायचं असेल तर ऑस्ट्रेलियाविरुद्ध ५-०, ४-१, ४-०, ३-० अशा फरकाने मालिका जिंकावी लागेल. असं झालं तर भारत अंतिम फेरीत पोहचेल आणि ऑस्ट्रेलियाचा पत्ता कट होईल.

भारताने कसोटी मलिका ३-१ ने जिंकली तरीही शक्यता आहे. मात्र अशात भारताला दुसऱ्यांच्या भरोशावर रहावं लागेल. श्रीलंकेचा दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या दुसऱ्या कसोटीत पराभव न व्हावा, अशी प्रार्थना भारताला करावी लागेल. दक्षिण आफ्रिकेने दुसरा कसोटी सामना जिंकला तर भारत ३-१ ने मालिका जिंकूनही या अंतिम फेरीच्या स्पर्धेतून बाहेर होईल.श्रीलंका-दक्षिण आफ्रिका दुसरा कसोटी सामना अनिर्णित राहिल्यानंतरही भारत अंतिम फेरीसाठी पात्र ठरेल.

भारताने कसोटी मालिका ३-२ ने जिंकल्यास परिस्थिती अवघड होईल. भारताला अशा परिस्थितीत श्रीलंकेकडून मदतीची अपेक्षा असणार आहे. श्रीलंका विरुद्ध ऑस्ट्रेलिया यांच्यात २९ जानेवारीपासून २ सामन्यांची कसोटी मालिका होणार आहे. श्रीलंकेने ही मालिका ड्रॉ केल्यास भारताला फायदा होईल. बॉर्डर गावसकर ट्रॉफी कसोटी मालिकेचा निकाल २-२ असा लागल्यास भारताच्या शक्यता फार कमी होतील. त्यानंतर भारताचं भवितव्य दक्षिण आफ्रिका आणि श्रीलंकेच्या हातात असेल. दक्षिण आफ्रिकेने श्रीलंकेविरुद्ध २-० ने मालिका जिंकावी. तसेच श्रीलंकेने ऑस्ट्रेलियाविरुद्ध २ कसोटी सामन्यांची मालिका जिंकली तर भारताची शक्यता वाढेल.

## नवशक्ती स्पोर्टस्,बालमित्र मंडळ दुसऱ्या फेरीत

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबई उपनगर कबड्डी असोसिएशनने आयोजित केलेल्या जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत नवशक्ती स्पोर्ट्स यांनी महिला गटात, तर बालमित्र मंडळ यांनी पुरुष गटात ५-५ चढायांच्या डावात दुसऱ्या फेरीत धडक दिली.

महिलांच्या पहिल्या फेरीच्या सामन्यात नवशक्तीने ५-५ चढायांच्या डावात विशाल स्पोर्टस्‌चा कडवा प्रतिकार २५-२० असा मोडून काढला.

पहिल्या डावात ७-८ अशा पिछाडीवर पडलेल्या नवशक्तीने दुसऱ्या डावात आपला खेळ उंचावत १७-१७ अशी बरोबरी साधली आणि जादा डावात ५ गुणांनी आपल्या विजयावर शिक्कामोर्तब केले.

रविना थोरात, गायत्री देवळेकर यांच्या संयमी खेळाला या विजयाचे श्रेय जाते.

पुरुषांच्या प्रथम श्रेणी(अ) गटात बालमित्र मंडळाने ५-५ चढायांच्या डावात एस.के. कबड्डी संघावर २३-२० अशी मात केली. अत्यंत चुरशीने खेळला गेलेल्या या सामन्यात पूर्वार्धात ७-५ अशी एस.के. संघाकडे आघाडी होती. उत्तरार्धात बालमित्रच्या किरण मोरे, ओमकार पाटील यांनी आपला खेळ उंचावत संघाला १५-१५ अशी बरोबरी साधून दिली आणि पाच चढायांच्या डावात ३ गुणांनी विजय देखील मिळवून दिला. ओवळी(ब) मंडळाने देऊळवाडी ओवळी संघाचा २०-११ असा सहज पाडाव केला तो ऋतिक सोनावणे, विराज कदम यांच्या चतुरस्त्र खेळाच्या जोरावर. देऊळवाडीचा विघ्नेश कासार बरा खेळला. केदारनाथ मंडळाने निर्विघ्न स्पोर्टस्‌चा ३२-०४ असा धुव्वा उडविला. महिलांच्या सामन्यात महात्मा गांधी स्पोर्टस्‌ने संघर्ष मंडळाचा ४१-२५ असा पाडाव केला. विश्रांतीला १३-०७ अशी महात्मा गांधी संघाकडे आघाडी होती. विश्रांतीनंतर खेळ अधिक गतिमान खेळाला गेला.

प्रबोधन मंडळाने जगदंब मंडळाचा ४६-१९ असा पराभव केला. पूर्वार्धात २३-१४ अशी आघाडी घेणाऱ्या प्रबोधनने उत्तरार्धात देखील खेळाचा जोश कायम राखत २७ गुणांच्या मोठ्या फरकाने आपला विजय साकारला.

## संजूचा धमाकेदार शो!

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**




भारतीय यष्टीरक्षक संजू सॅमसन सध्याच्या घडीला टी-२० क्रिकेट करिअरमध्ये अगदी शिखरावर आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेत भारतीय संघाकडून मालिकेत दोन शतके झळकावल्यानंतर तो आता देशांतर्गत क्रिकेटमधील सय्यद मुश्ताक अली टी-२० स्पर्धेत खेळताना दिसतोय.

केरळा संघाचे नेतृत्व करताना या स्पर्धेतील काही सामन्यात त्याला लौकिकाला साजेसा खेळ करता आला नाही. पण गोवा विरुद्धच्या सामन्यात त्याची बॅट पुन्हा तळपली. या सामन्यात त्याने २०० पेक्षा अधिकच्या स्ट्राइक रेटनं १५ चेंडूत ३१ धावांची धमाकेदार खेळी केल्याचे पाहायला मिळाले. विकेट किपर बॅटरची ही खेळी ४ चौकार आणि २ उत्तुंग षटकाराने बहरलेली होती. पावसाच्या व्यत्ययामुळे पद्धतीने निकाली लागलेल्या या सामन्यात संजूच्या नेतृत्वाखाली केरळ संघानं ११ धावांनी विजय नोंदवला. पावसाच्या व्यत्ययामुळे केरळ विरुद्ध गोवा यांच्यातील सामना हा १३-१३ षटकांचा करण्यात आला होता.

## वावेदिवाळी केंद्रात क्रीडा, व्यक्तिमत्त्व विकास स्पर्धा

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

वावेदिवाळी केंद्राच्या केंद्रस्तरीय क्रीडा व व्यक्तीमत्व विकास स्पर्धा रा.जि.प.शाळा विठ्ठलवाडी येथे अतिशय उत्साहात पार पडल्या.

यावेळी उद्घाटनप्रसंगी ग्रुप ग्रामपंचायत भुवन सरपंच दिपक जाधव, उपसरपंच जयेश पवार, भास्कर यादव, तळा तालुका नायब तहसीलदार जितेंद्र टेंबे, सामाजिक कार्यकर्ते गोविंद शिंदे, राम शिंदे, राम कसबले, निकेश पवार आदि उपस्थित होते. सुरुवातीला मान्यवरांचे हस्ते दिपप्रज्वलन व सरस्वतीपूजन करण्यात आले.

प्रास्ताविकात वावेदिवाळी केंद्राचे प्रभारी केंद्रप्रमुख सुधीर निकम यांनी स्पर्धेचे स्वरुप स्पष्ट केले. यावेळी आपल्या मनोगतात सरपंच दिपक जाधव यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्व विकासात क्रीडा स्पर्धांचे अनन्यसाधारण महत्त्व असून या स्पर्धांमधूनच विद्यार्थ्यांचे जीवन समृद्ध होते. आम्ही सुध्दा अशाच विविध स्पर्धांमधून घडलो असून आमच्या शिक्षकांचे ऋण आम्ही कधीही विसरु शकत नाही. सर्व विद्यार्थ्यांनी प्रामाणिकपणे खेळात सहभागी होऊन खेळाडूवृत्ती जोपासावी, असे प्रतिपादन त्यांनी केले. यावेळी उपसरपंच जयेश पवार, गोविंद शिंदे, तळा नायब तहसीलदार जितेंद्र टेंबे यांनीही समयोचित मनोगत व्यक्त करुन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या



स्पर्धेचे संयोजक रा.जि.प.शाळा विठ्ठलवाडी मुख्याध्यापिका लता दांडेकर व उपशिक्षिका शितल बामुगडे यांनी स्पर्धा यशस्वी करण्यासाठी अपार मेहनत घेतली. माध्यमिक विद्यामंदिर रातवड हायस्कूलचे सहशिक्षक अजित शेडगे यांनीही स्पर्धांना भेट देऊन विद्यार्थ्यांचे कौतुक केले. यावेळी दोरीउडी स्पर्धा- प्रथम क्रमांक सांची किरण कानाडे, द्वितीय क्रमांक स्वरा संदेश पवार, तृतीय क्रमांक सिध्दिका संजय वाघमारे, बेचकी स्पर्धा - प्रथम क्रमांक आशिष सुरेश वाघमारे, द्वितीय क्रमांक शैलेश सुरेश हिलम, तृतीय क्रमांक निलेश गणेश जगताप, नृत्यस्पर्धा - प्रथम क्रमांक शाळा घोटवळ, द्वितीय क्रमांक धरणाची वाडी, तृतीय क्रमांक रातवड, माती शिल्प स्पर्धा - प्रथम क्रमांक कैवल्य कल्पेश पवार, द्वितीय क्रमांक साक्षी बाळाराम वाघमारे, तृतीय क्रमांक नील सूचन कदम, समुहगीत स्पर्धा - प्रथम क्रमांक घोटवळ, द्वितीय क्रमांक रातवड, तृतीय क्रमांक शाळा वडाची वाडी तर पथनाट्य स्पर्धा - रा,जि.प. शाळा घोटवळ हि विजेती ठरली. सर्व शाळांचे मुख्याध्यापक,शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

## नांदगावमध्ये केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धा संपन्न

**। कोर्लई । वार्ताहर ।**

मुरुड तालुक्यातील नांदगाव भवानी पाखाडी येथील रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा क्रमांक २ च्या भव्य क्रीडांगणावर नांदगाव केंद्राच्या केंद्रस्तरीय क्रीडा व व्यक्तीमत्व स्पर्धा उत्साहात पार पडल्या.



सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करण्यात येऊन नांदगाव शाळा क्रमांक २ चे शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष निलेश नागांवकर, उपाध्यक्षा रिया चोरघे मान्यवरांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात येऊन कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. यावेळी केंद्रप्रमुख दिनेश म्हात्रे, मुख्याध्यापक प्रकाश नांदगावकर (काशिद), हेमकांत गोयजी (मजगांव), श्रद्धा म्हात्रे (व्हावे), संगीता खानावकर (नांदगाव -१) व शिक्षक वृंद उपस्थित होते.

यास्पर्धेत दोरी उडी स्पर्धेत इ.१ ते ४ गटात स्वरा गुंड (चिकणी), इ.५ ते ७ गटात कस्तुरी दिवेकर (काशिद) यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. बेचकीने नेम धरणे या स्पर्धेत १ ते ४ च्या गटात आयुष जाधव (शाळा-वाळवटी) प्रथम क्रमांक व इ.५ ते इ.७ च्या गटात किशोर वाघमारे (शाळा म जगाव मराठी) प्रथम क्रमांक तसेच मातीकाम या स्पर्धेत इ.१ ते इ. ४ च्या गटामध्ये गार्गी जितेश मेंगाळ (शाळा बेलीवाडी) प्रथम क्रमांक व इ.५ ते इ.७ च्या गटात कु. हार्दिक सिताराम पतेने (शाळा वावे) यांनी प्रथम क्रमांक पटकावला. लगोरी स्पर्धेत इ.१ली ते ४ थी गटात उसरोली शाळेने प्रथम क्रमांक तर इ.५वी ते इ.७वी. गटात वावे शाळेने प्रथम क्रमांक पटकाविला तर लंगडी स्पर्धेत इ.१ ते ४ च्या गटान नांदगांव नं. १ शाळा प्रथम क्रमांक व इ.५वी ते ७ वीच्या गटात शाळा काशिद यांनी प्रथम क्रमांक पटकाविला.सर्व विजेत्या संघास व शैक्षणिक स्पर्धेतील प्रत्येक स्पर्धकास बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

तसेच केंद्रप्रमुख दिनेश म्हात्रे यांनी उत्तम आयोजन केले. मुख्याध्यापक संगीता खानावकर, श्रद्धा म्हात्रे, हेमकांत गोयजी, प्रकाश नांदगावकर, प्रमोद म्हात्रे, मंगेश गोयजी राजेंद्र साळावकर, बाळासाहेब फुंदे, आकाश मंडले, सागर बागडे, रविंद्र राठोड, अनंता थळे, राजेंद्र बुल्लू, मन्मथ मठपती, गौरव पाखरे, ओमकार भोई, संदीप भगत, पल्लवी भोईर आदी शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले. सुत्रसंचालन हेमंत नांदगावकर यांनी केले.

## भारताने साकारला धमाकेदार विजय

**नवी दिल्ली :** मोहम्मद अमान याच्या नेतृत्वात अखेर भारताने अंडर १९ आशिया कप २०२४ स्पर्धेत विजयाचं खातं उघडलं आहे. टीम इंडियाने आशिया कप २०२४ स्पर्धेच्या मोहिमेतील दुसऱ्या सामन्यात जपानवर २११ धावांनी मोठा विजय मिळवला आहे. टीम इंडियाने जपानला ३४० धावांचं आव्हान दिलं होतं. जपानने टीम इंडियाच्या गोलंदाजांचा सामना करत पूर्ण ५० षटकं खेळून काढली. मात्र त्यांना १५० पारही पोहचता आलं नाही. जपानला ५० ओव्हरमध्ये ८ विकेट्स गमावून १२८ धावाच करता आल्या. भारताने अशाप्रकारे हा सामना २११ धावांनी आपल्या नावावर केला. तर जपानचा हा सलग दुसरा पराभव ठरला.

## पी.व्ही. सिंधू अडकणार लग्नाच्या बेडीत

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**



भारताची प्रसिद्ध बॅडमिंटनपटू आणि दोन वेळा ऑलिम्पिक पदक विजेती पी.व्ही. सिंधू लवकरच विवाहबंधनात अडकणार आहे. तिचा विवाह २२ डिसेंबर रोजी राजस्थानमधील उदयपूर येथे होणार आहे. सिंधू ही व्यंकट दत्ता साईशी लग्न करणार आहे. ते वरिष्ठ आयटी व्यावसायिक आणि पोसाइडेक्स टेक्नॉलॉजीजचे कार्यकारी संचालक आहेत. पी.व्ही. सिंधूचे वडील पी.व्ही. रमणा यांनी सांगितले की, दोन्ही कुटुंबे एकमेकांना आधीच ओळखत होते, परंतु एक महिन्यापूर्वीच लग्न ठरले आहे. त्यांनी पीटीआयला सांगितले की, सिंधूचे जानेवारीपासून बॅडमिंटनचे खूप व्यस्त वेळापत्रक असेल, त्यामुळे डिसेंबर लग्नाचा सर्वोत्तम काळ आहे. २२ डिसेंबरला उदयपूरमध्ये लग्न होणार आहे.

### कोण आहे व्यंकट दत्ता साई?

**व्यंकट दत्ता साई हे पोसाइडेक्स टेक्नॉलॉजीजचे कार्यकारी संचालक आहेत. त्यांचे वडील जी.टी. व्यंकटेश्वर राव हे या कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक आहेत आणि ते भारतीय महसूल सेवेत (आएरएस) अधिकारी आहेत. विशेष म्हणजे गेल्या महिन्यात पी. व्ही. सिंधूने या कंपनीचा नवीन लोगो लॉन्च केला होता.**






## घारापुरी ते करंजा जेट्टी अंतर निर्धारित वेळेआधी पोहून पार

# मयंकने रचला इतिहास

**। उरण । प्रतिनिधी ।**

करंजा येथील जलतरणपटू मयंक म्हात्रे याने घारापुरी बंदर ते करंजा जेट्टी हे सागारी १८ कि.मी. अंतर निर्धारीत वेळेपेक्षा कमी वेळेत पोहून पार करत, पुन्हा एकदा नवा इतिहास रचला आहे. मयंकने ३ डिसेंबर रोजी धरमतर ते करंजा हा प्रवाह पोहून पार केला होता. ज्यामुळे तो हा प्रवाह पोहून जाणारा पहिला जलतरणपटू ठरला होता. तर, यावेळी घारापुरी ते करंजा जेट्टी हा प्रवाह पोहून जाणारा मयंक पहिला जलतरणपटू ठरला असून, त्याने यानिमित्ताने नवा इतिहास रचला असल्याचे त्याच्या प्रशिक्षकांकडून सांगण्यात येत आहे.






उरणच्या सेंट मेरीज कॉन्व्हेंट शाळेतील सहाव्या इयत्तेत शिकणारा मयंक हा उत्कृष्ट जलतरणपटू असून, समुद्रीय जलतरण हा त्याचा आवडता प्रकार आहे. समुद्र किनारी लागून असणाऱ्या करंजा, कोंढारीपाडा येथे राहणाऱ्या या ११ वर्षीय चिमुकल्याने आज नवा विक्रम केला आहे. ३ डिसेंबरच्या मध्यरात्री १.०४ मिनिटांनी मयंकने जगविख्यात घारापुरी बंदर येथून समुद्राच्या लाटांना आव्हान देत करंजा जेट्टी गाठली आणि पुन्हा एकदा नवा विक्रम प्रस्थापित केला. सागरी १८ किमी अंतर त्याने निर्धारीत वेळेपेक्षा अर्धा तास आधी पोहून पूर्ण केले आहे. हा प्रवाह पोहून जाण्यासाठी ६ तासाचा अवधी अपेक्षित होता. तर मयंकने हे अंतर ५ तास २९ मिनिटात पोहून पार करत सर्वांनाच चकित केले आहे. रायगड, मुंबई विभागातील समुद्रीय जलप्रवाहातील दोन प्रवाहांवर मयंकने आपले नावं कायमस्वरूपी कोरले आहे.

यावेळी मयंकचा सत्कार शेकापचे युवा नेतृत्व प्रीतम म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र हौशी जलतरण संघटनेचे रायगड जिल्हा अध्यक्ष राजू कोळी, शैलेश सिंग, सचिन डाऊर, नितीन कोळी, एल.बी. पाटील, सीमा घरत यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

### प्रीतम म्हात्रेंकडून सत्कार

**मयंकच्या या यशाबद्दल शेकापचे युवानेते प्रीतम म्हात्रे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह, शाल व गुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी अनेकांनी उरणकरांसाठी खेळाचे मैदान नसल्याची खंत व्यक्त केली होती. त्यानुसार आपण उरणकरांसाठी हक्काचे खेळाचे मैदान मिळावे यासाठी पाठपुरावा करून तो नक्कीच मार्गी लावू, असा विश्वास व्यक्त करून मयंक म्हात्रे याचे अभिनंदन करून यापुढे कोणत्याही क्षेत्रातील खेळाडूने उरणचे नाव उज्वल करण्यासाठी प्रयत्न करावेत. यासाठी आपणही पुढाकार घेऊ असे सांगितले. यावेळी मयंक म्हात्रे याच्या यशाबद्दल त्याचे अनेकांनी सत्कार व अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.**

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)